गतकालीन

गोमंतकीय मुत्सद्दी

❖

— ना. भा. नायक

ॐ

गतकालीन
गोमंतकीय मुत्सद्दी

★

लेखक
नारायण भास्कर नायक
संपादक 'भारतमित्र'
रिवण, गोवा.

★

सन १९६२

मूल्य : रु. ३-५०

विषयानुक्रम

५९ जगन्नाथ रा. केरकर
६० नीळ नाईक देसाई
६१ गणा शेट
६२ आत्माराम प्र. देशप्रभु
६३ आ. वा. प्र. देशप्रभु
६४ केशव प्रभु देसाई
६५ केशव नाईक देसाई
६६ खवळू शेणवीं देसाई
६७ फोंड नाईक सरदेसाई
६८ विठ्ठल नाईक सरदेसाई
६९ खवळ नाईक सरदेसाई
७० दुलबा प्र. सरदेसाई
७१ नारबा प्र. सरदेसाई
७२ लक्ष्मण भास्कर नायक
७३ व्यंकटेश वामन नायक
७४ मायीन्देव
७५ अच्युत नायक
७६ विठ्ठल शेणै
७७ मल्लाप्पा महाले
७८ नारायण महाले
७९ नारायण आ. नाडकर्णी
८० आपाजी रा. वागळे
८१ जिवाजी रा. वागळे
८२ नारो राम वागळे
८३ कृष्णराव राणे
८४ म्हादबा देसाई
८५ सरदार शंकरराय

प्रास्ताविक

आपली गोमंतक भूमाता जशी निसर्गरम्य आहे, तशीच ती अन्य गुणांनींहि परिपूर्ण आहे. निसर्गरत्नांप्रमाणेंच विविध क्षेत्रांत चकाकणाऱ्या अनेक कर्तबगार नररत्नांनाहि तिनें जन्म दिला आहे.

अशा गतकालीन गुणी गोमंतकीयांपैकीं ज्यांनीं आपल्या मुत्सद्दीपणाच्या और गुणानें किंवा शौर्यानें जनतेचें लक्ष वेधून घेतलें त्यांचा प्रत्यक्ष परिचय करून देणें शक्य नसलें, तरी शब्दचित्राच्या सहाय्यानें या पुस्तकांत त्रोटक परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत यशस्वी झाला आहे हें ठरविण्याचें काम सुबुद्ध वाचकांवरच संपविणें इष्ट आहे.

प्रस्तुत पुस्तकांत शिलाहार, कदंब, यादव, विजयनगरचे राय, मराठे, पेशवे, शिंदे, पोर्तुगीज वगैरे राज्यकर्त्यांच्या राजवटींतील निरनिराळ्या पंचांयशीं गोमंतकीय मुत्सद्यांचीं संक्षिप्त चरित्रें आलीं असून माहिती शक्य तों साधार दिली आहे.

त्याचप्रमाणें सदरील चरित्रनायकांचा आधुनिक गोमंतकीय घराण्याशीं संबंध दाखविण्याचाहि प्रयत्न केला आहे. त्यांपैकीं कित्येकांनीं महत्वाचीं राजकारणें केलीं, तर कित्येकांनीं तरवार बहाद्दरी करून दिल्लीपर्यंत दरारा बसविला. कित्येक प्रधान, कित्येक सेनापति, कित्येक सरदार, तर कित्येक दरबारी (राजकारणी) वकील म्हणून चमकले.

एकच गोष्ट घाईमुळें व्यवस्थित करतां आली नाहीं व ती म्हणजे विषयाची कालवार रचना. त्याचें कारण, एका बाजूनें संशोधन–अभ्यास-कार्य सुरु होतें, तर दुसरीकडून लिहीण्याचें व तिसरीकडून प्रसिद्धीचें. त्यामुळें माहिती मिळविल्यावर ती तारीखवार जुळवून लिहिणें, लेखन पूर्ण झाल्यावर पुन्हां हात फिरवून त्याची मुद्रणप्रत तयार करणें आणि नंतर ती मुद्रणासाठीं मुद्रणालयांत देणें असे पद्धतशीर संस्कार करण्यास पुरा काल लाभला नाहीं. दुसऱ्या आवृत्तीचा योग आल्यास इतर आवश्यक सुधारणांच्या आधीं या गोष्टीकडे लक्ष देण्यांत येईलच.

या ऐतिहासिक पुस्तकामुळें नवीन पिढीस गतकालांत होऊन गेलेल्या गोमंतकीया मुत्सद्दी व शूर पुरुषांची माहिती तर मिळेलच; शिवाय स्वतःच्या कर्तबगारीनें सर्वसाधारण मनुष्यहि महत्वाचें उच्च स्थान कसें पटकाऊं शकतो यांचीहि मार्गदर्शक उदाहरणें दृष्टीसमोर येतील.

—ना. भा. नायक
लेखक

गतकालीन गोमंतकीय मुत्सद्दी

मनुष्यप्राणी उपजतच कांहीं निसर्गदत्त देणग्या बरोबर घेऊन जन्माला येतो आणि त्या देणग्यांना परिस्थितीची योग्य साथ मिळाली म्हणजे त्या मनुष्याकडून जीं अद्वितीय कृत्यें घडतात तीं केवळ चलाख बुद्धीच्या भांडवलावर परिस्थिति हवी तशी निर्माण करून करूं म्हटलें तर बरेंच कठिण जातें. तथापि केवळ नैसर्गिक बुद्धीच्या जोरावर परिस्थितीला आपल्यापुढें हवी तशी नमवून ज्यांनीं विलक्षण कार्यें केलीं आणि देशाची अमूल्य सेवा बजावली त्यांची कुशलता केव्हांहि पहिल्यापेक्षां और आहे. या दोन्हीं वर्गांतील अनेक व्यक्तींना आपल्या पवित्र गोमंतक भूमातेनें जन्म दिला, अंगाखांद्यावर खेळविलें व लहानाचें मोठें करून त्यांना कार्यतत्पर बनवलें. अशा व्यक्तींपैकीं ज्यांनीं आपल्या कर्तृत्वानें आपल्या मायभूमीची प्रत्यक्ष सेवा बजावली किंवा आपल्या कार्यानें तिचें नांव गाजविलें अथवा ज्यांनीं आपल्या देशबंधूंच्या हितासाठीं आपलें आयुष्य घालविलें त्या आपल्या गतकालीन गोमंतकीय हिंदु मुत्सद्दी बंधूंचा अल्प परिचय देण्याचें ठरविलें आहे.

—१—

प्र. वसंत माधव वागळे

यांचें घराणें मूळचें कुशस्थळीचें. सासष्टींतील आजची कुठ्ठाळ तीच गतकालीन कुशस्थळी होय. त्या वेळीं वागळे घराण्यांत कित्येक मुत्सद्दी होऊन गेले. कदंब राजवटींत अधिकारी या नात्यानें कित्येक गोव्याबाहेरहि गेलेले आहेत. कदंबांचे अधिकारी म्हणून तिकडे गेलेले खानापूरचे वागळे या कुशस्थळींतील वागळ्यांचे वंशज होत.

याच वागळे घराण्यांत वसंत माधव वागळे यांचा जन्म झाला. यांची चरित्रविषयक माहिती उपलब्ध नसल्यानें जे कांहीं धांवते उल्लेख मिळतात त्यांवरूनच निरुपायानें भागवावें लागतें. हे मोठे मुत्सद्दी, तसेच शूरहि होते. हे विजयनगरच्या राजवटींत उदयास आले. विजयनगर दरबारांत यांचा कसा प्रवेश झाला याची माहिती मिळत नाहीं; तथापि लहान अधिकारांतून वाढत वाढत ते पुढें मोठे हुद्देदार झाले.

सन १३५२ सालीं कदंबांवर जबरदस्त हल्ला करून बहामनी राज्याचा संस्थापक हसन गंगू यानें गोमंतक बळकावला. तो चौदा वर्षें मुसलमानी सत्तेंत राहिला. त्या वेळीं लोकांना फार त्रास सहन करावे लागले. विशेषत: अखेरच्या आठ वर्षांतील बहामनी कारकीर्द प्रजेला अत्यंत जाचक झाली. परिस्थितीबद्दल विजयनगर दरबारांत पुन: पुन: कळवून दरबारचें इकडे लक्ष वेधून घेण्याची कामगिरी वागळे यांनीं छान केली. इतकेंच नव्हे तर दक्षिण कोंकण घेण्याच्या बाबतींत माधव मंत्री यांना वागळे यांनी बरेंच सहाय्य केलें. अशा रीतीनें सन १३६६ सालीं गोमंतकासह सारें कोंकण व बेळगांव वगैरे बराच मुलूख विजयनगरच्या सत्तेंत आला आणि तो स. १४७० पर्यंत त्याच अंमलाखालीं राहिला. दक्षिण कोंकणच्या सरसुभ्यावर माधव मंत्र्यांच्या मागें जे प्रतिहस्त (व्हॉइसरॉय) म्हणून मुख्याधिकारी आले त्यांपैकीं एक वसंत माधव वागळे हे होते.

—२—

प्र. माइन् शेणै वागळे

विजयनगर साम्राज्याचे दक्षिण कोंकणचे प्रतिहस्त म्हणून गोमंतकीय राजधानीवर यांची नेमणूक झाली होती. यांची कारकीर्द सन १४०३ पासून १४०७ पर्यंत चालली. राजकारणांतील यांचा दर्जा, बुद्धि व कौशल्य असामान्य होतें. विजयनगर साम्राज्याचे शूर सेनापति माधव मंत्री यांना फार मानीत. दक्षिण कोंकणवर विजयनगरची सत्ता प्रस्थापित करण्यांत यांची मुत्सद्देगिरी व सहाय्य फार उपयोगीं आलें. यांची राजकारणी कुशलता फार महत्वाची आहे.

बांदिवडें येथील नागेश देवालयासमोर असलेल्या सन १४१३ सालच्या शिलालेखांत 'पुरुसु सेणवैया सुतु माइं सेणवैया' असा ज्यांचा उल्लेख आहे तेच हे माइन् पुरसो शेणै वागळे होत.

बांदिवडें येथील श्री. राम नायक, नागण नायक, राम प्रभु, मंगेश प्रभु हे गृहस्थ कांहीं मंडळीसह अंत्रूजमधील कुंकळ्यें गांवांत वास्तव्य करीत असलेल्या या श्री. माइन् शेणै यांकडे जाऊन त्यांनी नागेशींच्या कांहीं जमिनी तेथील श्रीनागेश देवालयास मिळवून देण्याबद्दल विनंति केली व ती त्यांनी मान्य केली. त्या वेळीं गोमंतकासह सबंध दक्षिण कोंकणवर विजयनगरची सत्ता चालू होती. आणि विजयनगरच्या सिंहासनावर पहिला देवराय विराजमान होता. त्याच गोमंतकांतील तत्कालीन प्रतिहस्त नंजण गोसावी हे होते. माइन् शेणै हेहि त्या वेळीं एक विजयनगरचे वडे अधिकारी होते व पुढें कांहीं कालानें ते प्रतिहस्तपदावर आले. त्यांनी वेदखंडिकेचें कुळागर; नागझरीमळा शेत व खो कुळागर या जमिनी श्रीनागेश व श्रीमहालक्ष्मी देवस्थानांस देण्याची व्यवस्था केली. त्याबद्दलचाच हा शिलालेख आहे. तेव्हांपासून नागेश देवस्थानांत वागळे यांना प्रथम मान आहे.

माइन् शेणै हे बांदिवडें येथील नायक सरदेसाई यांचे जामात होते व त्यांचें वास्तव्य कुंकळ्यें येथें होतें. ते वसंत माधव वागळे यांच्याच घराण्यांतील असून त्यांचा कुलदेवहि श्रीमंगेश हाच आहे. यापेक्षां यांच्यासंबंधींची जास्त माहिती मिळत नाहीं.

विजयनगरच्या राजवटींत बरेच गोमंतकीय हिंदु मोठमोठ्या अधिकारावर होते. मुलकी खात्याप्रमाणेंच लष्करांतहि त्यांची मोठी संख्या होती. विजयनगर सम्राटानें मुसलमान राज्यकर्त्यांशीं दिलेल्या कित्येक लढायांत गोमंतकीय हिंदु फौजेनें भाग घेतल्याचा आणि लष्करी अधिकारी या नात्यानेंहि कित्येक शूर हिंदूंनीं मर्दुमकी गाजविल्याचा इतिहासांत ओझरता उल्लेख मिळतो. तथापि त्या आपल्या गोमंतकीय वीर पुरुषांचा नामनिर्देश मिळत नाहीं. त्यामुळें विजयनगर साम्राज्यसत्तेंत मर्दुमकी गाजवून उदयास आलेल्या या लोकांचा योग्य रीतीनें परिचय करून देतां येत नाहीं याचें वाईट वाटतें.

—३—

तिमय्या नाईक

पोर्तुगीज कागदपत्रांत 'तिमोज' या नांवानें ज्याचा उल्लेख मिळतो तेच हे सरदार तिमय्या नाईक. यांचा जन्म गोमंतकांत कोणत्या गांवांत झाला हें कळत नसलें तरी ते गोमंतकीय आहेत यांत संशय नाहीं. गोव्यांत त्यांचें राहातें घर, जमिनी, नातलग व इष्टमित्र होते असा उल्लेख मिळतो. त्यांच्या बंधूचें वास्तव्यहि गोव्यांत होतें. त्यांची एक बहीण गोव्यांतील माय नाईक यास दिली होती. हा माय नाईक लष्करी वृत्तीचा व हुशार होता. गोमंतकीय राजकारणांत तिमय्या नाईक यांना त्यानें सक्रिय सहाय्य दिलें आहे.

मार्शल गोमिश् द कोश्त यानें आपल्या आल्बुकेर्कवरील ग्रंथांत तिमय्यांचा ब्राह्मण म्हणून उल्लेख केला आहे; तथापि ते ब्राह्मण नव्हते. "तिमोज ब्राह्मण असता तर सोळाव्या शतकांतील पोर्तुगीज ऐतिहासिक साधनांत एक वेळ तरी त्याचा ब्राह्मण म्हणून उल्लेख यावयास पाहिजे होता" असें इतिहाससंशोधक डॉ. पिसुर्लेकर म्हणतात.

"तिमोज याचें लग्न गेरसप्पा येथील राणीच्या कन्येशीं झालें होतें" असें गाश्पार कुन्हैय, इयेरोनिमु ओझोरियु इ. सोळाव्या शतकांतील पोर्तुगीज इतिहासलेखकांनीं लिहिलें आहे. गेरसप्पा येथील राणी विजयनगरच्या 'तुळुवा' वंशांतील होती. पुढें 'तिमोजच्या कुटुंबीय मंडळींचें ख्रिस्तीकरण झाल्यावर त्यांचा अंतर्भाव चाड्डी जातींत करण्यांत आला.' (Promptuário das Diffinições Indicas) त्यावरून ते क्षत्रिय किंवा मराठे असण्याचा संभव दिसतो. तिमय्या नाईक कोणत्याहि ज्ञातींतील का असेनात पण ते गोमंतकीय हिंदु असून शूर आणि महान् मुत्सद्दी होते यांत संशय नाहीं.

सन १५१० त आफोंस द आल्बुकेर्क यानें गोवें बेट काबीज केलें. त्या पूर्वीं या बेटावर स. १४७१ पासून मुसलमानी अंमल चालू होता. ११-२-१४७१ रोजीं १०८ गलबतें व अफाट सैन्य घेऊन बहामनी सरदार महमद गवान यानें गोव्यावर स्वारी केली व तें बळकावून घेतलें. त्या वेळीं विजयनगरसत्तेचा काल उतरता होता व दुसरीकडे लढाई चालू असल्यानेंहि त्याला चांगलें फावलें. अशा रीतीनें गोवें मुसलमानी सत्तेत गेल्यावर त्यांच्या जाचक कारकीर्दीमुळें हिंदु जनतेवर फार परिणाम झाला.

स. १७४२ त विजयनगरचे राजे विरुपाक्षराय यानें गोवें परत घेण्याचा बेत केला. आणि ती कामगिरी वंकापूर येथील आपल्या मांडलीक राजावर संपवून त्याच्या सहाय्यास सैन्य पाठविण्यास बेळगांवचा राजा विक्रमराय याला हुकूम केला. तोहि विजयनगरचा मांडलीक व सुभेदार होता. त्याकडून कांहीं सैन्य रवाना झालें व आणखी फौजेनिशीं तो स्वतः गोव्यांत जाण्याची तयारी करीत असल्याचें कळून महमदशहा मोठ्या सैन्यानिशीं बेळगांव किल्ल्यावर आला. किल्ला फार बळकट व भोंवतीं पाण्यानें तुडुंब भरलेला खोल खंदक होता. तथापि तटास सुरुंग लावण्याचें तंत्र शहानें दक्षिणेंत प्रथम येथेंच उपयोगांत आणून आपल्या दोन हजार लोकांचा प्राण देऊन भगदाड पाडलें व किल्ला घेतला. अशा रीतीनें सहाय्याभावीं गोव्यावरील मोहीम तर फिसकटलीच आणि इकडे बेळगांव राज्यहि मुसलमानांकडे गेलें.

सन १४८९ मधील गोमंतकाचा सत्ताधारी युसूफ आदिलशहा हिंदूंकडे सहिष्णुतेनें पहाणारा असा होता. त्याच्या कारकीर्दींत हिंदु लोक मोठमोठ्या हुद्यांवर होते हें सोळाव्या शतकांतील पोर्तुगीज कागदपत्रांवरून कळून येतें. असें जरी असलें तरी हिंदु संस्कृति व इस्लामी संस्कृति यांच्यांत जी साहजिक तेढ होती तीमुळें हिंदूंच्या सांस्कृतिक आकांक्षा मुसलमान सत्ताधाऱ्यांकडून पूर्ण होणें अशक्य होई. शिवाय जुनी राजवट जाऊन त्या जागीं निराळ्या संस्कृतीची नवी राजवट आल्यानें नवी आशा दिसणें साहजिकच ठरतें. आदिलशहाच्या सैन्यांतील रूमी, तुर्क इ. लोकांकडून प्रजेवर फार जुलूमहि होई. आदिलशाहींत ग्रामसंस्थांकडून घेण्यांत येणारी कराची रक्कमहि दुप्पट करण्यांत आल्यानें लोकांत असंतोष पसरून तत्कालीन हिंदूंनीं मुसलमानांविरुद्ध आल्बुकेर्क यास मदत केली.

सन १५१०त पोर्तुगिजांचा गोवा बेटांत प्रवेश होण्यास कारणीभूत होणारा प्रमुख राजकरणी हिंदु म्हणजे तिमय्या नाईक हे होय. तत्कालीन पोर्तुगीज ग्रंथकारांनीं त्यांची योग्यता फार वाखाणली आहे. त्यांनीं गोवें घेण्यास फिरंग्यांस फार मदत केली.

तिमय्या ऊर्फ तिमोज हे विजयनगरचे सरदार होते. आल्बुकेर्कच्या एका पत्रांत त्यांचा उल्लेख Capitão do rei de Bisnaga म्हणजे विजयनगरच्या राजाचा कॅप्टन असा आहे. त्यांच्याजवळ दहाएक लढाऊ गलबतें असून त्यांचें ठाणें होनावर या विजयनगरच्या बंदरांत होतें. तिमोजचा व फिरंगी लोकांचा संबंध व्हास्कु द गामाच्या हिंदुस्थानांतील दुसऱ्या सफरीपासून म्हणजे स. १५०२ पासून आला. यानंतर तिमोजचीं कारस्थानें दों फ्रांसिस्कु द आल्मैद व आल्बुकेर्क या पोर्तुगीज प्रमुख सरदारांकडे सुरू झालीं.

गोवें घेण्याबद्दल पोर्तुगिजांना इतका आग्रह व भरपूर मदत करण्याची तयारी तिमोज कां दाखवितो याचें मर्म लक्षांत न आल्यानें पोर्तुगीज ग्रंथकार 'बाऱ्हुश्' म्हणतो कीं, 'तिमोजला तशी देवाचीच प्रेरणा झाली असावी !'

गोवें फिरंग्यांनीं घेतल्यावर गोव्याची जहागीर आपणांस द्यावी अशी तिमोजनीं त्यांकडे मागणी केली व त्याबद्दल दरसाल वीस हजार 'पार्दाव' खंडणी देण्याची तयारी दाखविली. बंकापूर राजानेंहि तशीच मागणी केली होती. त्या वेळीं मिरजन, होनावर, भटकळ, बारकूर, बसरूर, मंगलोर, गेरसप्पा इ. गोव्यालगतचीं मांडलीक राज्यें विजयनगरच्या साम्राज्यांत होतीं व तीं सम्राटास दरसाल ठराविक खंडणी देत. हीच कल्पना गोव्याबद्दलहि तिमोजची असावी. तथापि ती मागणी आल्बुकेर्कनें मान्य केली नाहीं.

गोव्याची जहागीर फिरंग्यांकडून आपणांस मिळाल्यावर योग्य वेळीं त्यांचें मांडलिकत्व झुगारून आपण विजयनर साम्राज्यांत सामील व्हावें असाहि कदाचित् तिमोजचा हेतु असणें असंभवनीय नाहीं.

गोवें पोर्तुगिजांच्या ताब्यांत आल्यावर तिमय्या नाईकांची कुटुंबीय मंडळी तेथेंच राहूं लागली. आणि त्यानंतर ख्रिस्ती झालेले त्यांचे वंशजहि तेथेंच वसती करून राहिले. नंतरचें त्यांचें आडनांव मेरगुल्यांव असें होतें.

म्हाड पै

म्हाड पै यांनाच म्हाळ पै असेंहि म्हणत. हे गौड सारस्वत वैष्णवसंप्रदायी असून त्यांची कुलदेवी श्रीम्हाळसा-नारायणी होती. विजयनगरच्या राजवटींत सासष्ट प्रांतांतील वेर्णे येथें म्हाळसेच्या सुंदर देवालयाजवळच यांचा मोठा वाडा होता. याच वाड्यांत ते सहकुटुंब राहत असत. त्यावेळीं त्यांकडे सरदेशमुखीचे अधिकार असून सबंध सासष्टी, चंद्रवाडी, जांबावली पंचमहाल, शिवेश्वर (काणकोण), गोवें वगैरे भागांवर सरदेसाई या नात्यानें त्यांचा अधिकार चाले.

म्हाड पै यांच्याजवळ कांहीं घोडेस्वार व इतरहि फौज होती. या फौजेच्या बळावर त्यांनी गोव्यांत पुनः पुनः त्रास देणाऱ्या कित्येक नायक्यांस मार देऊन व कांहींकांस कापून काढून धुडकावून लावलें होतें. ते शूर तसेच मुत्सद्दीहि होते. त्याचप्रमाणें ते अंतःकरणानें प्रेमळ, दयाळु व दानशूरहि होते. त्यांच्या वाड्यांत गरीबांना नेहमींच अन्नछत्र चालू असे.

इ. सं. वर्दे वालावलीकर हे 'गोंयकारांची गोंयाभायली वसणूक' या पुस्तकांत आल्बुकेर्क यास गोवें घेण्यास तिमोजमार्फत म्हाड पै यांनीच आग्रह केल्याचें लिहितात; परंतु त्याबद्दल सोळाव्या शतकांतील एकाहि पोर्तुगीज इतिहास-लेखकानें म्हाड पै यांचा उल्लेख केल्याचें दिसत नाहीं असें इ. सं. डॉ. पां. स. पिसुर्लेकर म्हणतात (पो. अ. रा. हिंदु. भारतमित्र व. १७, पृ. ६८). तथापि त्यावरून म्हाड पै यांनी त्या बाबतींत खटपट केली नसावी असें मात्र म्हणतां येत नसल्याचें ते आपल्या लेखांत पुढें लिहितात.

स. १५९१ मधील 'तोंबु दश् रेंदश्' यांत Marpoi असा उल्लेख असून त्याला इनाम दिलेली एक जमीन गोवें बेटांत होती अशी ओझरती माहिती मिळते. तेव्हां हेच ते म्हाड पै असावेत असें म्हणतां येतें. त्यांची इनाम जमीन करंबळी या गांवांत असून तेथेंहि त्यांचा वाडा होता आणि या वाड्यांतहि ते कधीं कधीं सहकुटुंब येऊन राहत.

गोवें घेण्यासाठीं पोर्तुगीजांना पाचारण करण्यांत ज्यावरून अनेक हिंदु पुढाऱ्यांचें तिमय्या नाईक यांच्याशीं संगनमत होतें त्यावरून त्यांत म्हाड पै यांचाहि प्रमुखत्वानें समावेश असणें साहजिक आहे.

पोर्तुगीजांचा गोवा बेटांत प्रवेश झाला त्यावेळीं म्हाड पै आपल्या मंडळीसह आपल्या करंबळी येथील वाड्यांत राहत होते. गोवा बेटांत पोर्तुगीज लोकांचा प्रवेश झाल्यापासूनच्या पंचवीस वर्षांच्या अवधींत जो अनुभव तेथील लोकांना आला त्यामुळें म्हाड पै प्रभृति हिंदु पुढाऱ्यांनीं आदिलशहाशीं पुनः मैत्री जोडण्याची तयारी चालविली आणि कित्येकजण सन १५३६ च्या पोर्तुगीज व विजापूरकर यांच्या लढाईंत पोर्तुगीजांविरुद्ध विजापूरकरांस फितूर झाले. यावेळीं म्हाड पै यांनी पोर्तुगीजांविरुद्ध कित्येक कारस्थानें केल्याचें पोर्तुगीज अधिकाऱ्यांना कळून आल्यानें त्यांच्यावर त्यांची इतराजी झाली आणि त्यामुळेंच म्हाड पै यांना गोव्यांतून सहकुटुंब निसटून जाणें भाग झालें. ते जातांच रागानें त्यांची जमीन सरकारजमा करण्यांत आली. पुढें पोर्तुगीज गव्हर्नर नूनु द कुंज्य यानें ही जमीन दियोग मुनिज नांवाच्या एका ख्रिस्ती मनुष्याला इनाम दिली.

म्हाड पैप्रमाणेंच त्यावेळीं अनेक पुढारी गोंवें सोडून बाहेर निघून गेले होते.

म्हाड पै गोव्यांतून सहकुटुंब निसटून जाऊन कोचीन येथें वास्तव्य करून राहिले. ते वजनदार, धनिक आणि गरीबांना वेळोवेळीं सहाय्य करणारे असल्यानें पुष्कळांना त्यांच्या जाण्यामुळें दुःख झालें.

कोचीन संस्थानांतील बारापंकी हें गांव त्यांनी आपल्या वास्तव्यासाठीं पसंत केलें व तें तेथील तत्कालीन संस्थानाधिपति याकडून विकत घेतलें. गांवच्या लोकांवर यजमान या नात्यानें म्हाड पै यांचा अधिकार चाले पण त्याहिपेक्षां त्यांच्या प्रेमळ वागणुकीनें लोकांचीं मनें त्यांनी जास्त जिंकलीं होतीं. त्यांच्या गांवाबाहेरचे इतर लोक देखील गोड वागणुकीमुळें त्यांना फार मानीत. तिकडील साऱ्या लोकांनी त्यांना 'कर्ताब' असें बहुमानदर्शक नांव दिलें होतें. अजून त्यांचे वंशज तें वापरतात. त्यांचें घराणें आजहि वैभवसंपन्न असून त्यांच्या वंशजांना संस्थानी दरबारांत मानाची खुर्ची आहे.

श्रीकाशीमठाधीश श्रीमत् सुधिंद्रतीर्थ स्वामींच्या हस्तें सन १५९८त ज्या श्रीव्यंकटेश मूर्तीची स्थापना झाली ती मूर्ति मिळविण्यांत म्हाड पै यांनीच पुढाकार घेतला होता. ती मूर्ति मूळची विजयनगरची. विजयनगरच्या अखेरच्या कालांत ती एका शिष्यानें आणून कुंभकोणम मठाधीशांच्या स्वाधीन केली. ते संचारावर असतां कोचीनला आल्यावेळीं म्हाड पै यांनी ती मूर्ति पाहिली आणि इतर सारस्वत पुढाऱ्यांच्या संगनमतानें तिच्या वजनाचीं सुवर्णनाणीं देऊन ती घेतली. पुढें लवकरच श्रीकाशीमठाधीशांच्या हस्तें तिची विधिपूर्वक मोठ्या थाटानें स्थापना झाली. हें देवस्थान आज ऐश्वर्यसंपन्न असून त्याच्या कार्यकारी मंडळाच्या अकरा सभासदांतील दोन प्रमुखांपैकीं एक म्हाड पै यांच्या घराण्यांतील असतो.

म्हाड पै यांच्या मृत्यूनंतर कांहीं कालानें त्याचा मुलगा विठ पै हा कोचीन येथून मुद्दाम विजापुरास गेला आणि आपल्या बापाच्या गोव्यांतील देशमुखीचे हक्क आपणांस मिळावे म्हणून त्यानें एक विनंतिअर्ज लिहून आदिलशहाकडे मागणी केली. आदिलशहानेंहि त्याची विनंति मान्य करून त्याला देशमुखीची सनद दिली. तथापि त्यावेळीं विजापूरचा अंमल गोंवें व सासष्टीवर चालत नव्हता आणि इतर ठिकाणचेहि अधिकार स्वीकारण्याच्या बाबतींत बरेच अडथळे येऊन अखेरीस विजापूरकराच्या त्या सनदेचा त्याला कांहींच उपयोग झाला नाहीं. त्यानंतरच्या कालांत विठ पै पुनः कोचीन येथें जाऊन राहिला.

या म्हाड पै व विठ पै यांच्या संबंधींची त्रोटक माहिती कॅ. बहुगुण कामत वाघ यांनी स. १८०१ सालीं लिहिलेल्या व स. १९१५ च्या 'प्राचीप्रभा' मासिकाच्या एका अंकांत प्रकाशनांत आलेल्या 'गोमंतकाची बखर' यांत मिळते.

—५—

कॅ. कृष्ण शेणै

कृष्ण शेणै हे गोंवें बेटांतील वजनदार प्रमुख रहिवाशांपैकीं एक असून ते शूर, मुत्सद्दी, धनिक

व हिंदुधर्माचे फार अभिमानी होते. यांच्या-संबंधींची माहिती इ. सं. डॉ. पिसुर्लेंकर यांनी आपल्या Agentes da Diplomacia Portuguesa या ग्रंथांत ठीक दिली आहे.

तिमय्या नाईक व म्हाड पै प्रभृति हिंदूंनी पोर्तुगीजांना जसें तिसवाडी बेट मिळवून दिलें किंवा तें घेण्याच्या बाबतींत अनेक प्रकारें सहाय्य केलें, त्याचप्रमाणें कृष्ण शेणै यांनी त्यांना सासष्ट व बार्देश हे प्रांत मिळवून देण्याच्या बाबतींत फार श्रम केले.

सोळाव्या शतकांतील पोर्तुगीज इतिहासकार दामियांव द गोइश् यानें आपल्या इतिहासग्रंथांत लिहिलें आहे कीं—"आल्बुकेर्क यानें गोवें शहर घेतल्यावर दुसऱ्याच दिवशीं कृष्ण त्याला भेटला आणि तिसवाडींतील ब्राह्मणांबद्दल व इतर रहिवाशांबद्दल त्यानें त्याच्याशीं संरक्षण मागितलें."

सन १५१२ ते १५१४ सालीं कृष्ण शेणै हे गोव्यांतील हिंदी सैन्याचे कॅप्टन होते. त्यावेळीं त्यांच्यावर आल्बुकेर्कची इतकी बहाल मर्जी होती कीं, १५१४ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत त्यानें पोर्तुगालच्या राजास जें एक पत्र लिहिलें त्यांत कृष्ण शेणैबद्दल त्यानें फारच गौरवपर मजकूर लिहिला होता. पोर्तुगीजांच्या हिताची त्यांकडून फार महत्वाची कामगिरी घडून आल्यानें त्यांना एकदां पोर्तुगालला येण्याबद्दल निमंत्रण करावें अशीहि त्यांत आग्रहाची विनंति केली होती.

पुढें त्यांना आमंत्रण येऊन त्याप्रमाणें ते पोर्तुगाललाहि जाऊन आले. सन १५२० च्या ऑक्टोबर महिन्यांत कृष्ण शेणै पोर्तुगाल येथें होते अशी माहिती मिळते. त्यावेळीं पोर्तुगालच्या राजानें त्यांचा मोठा गौरव करून त्यांना कॅप्टन, मुख्य ठाणेदार इत्यादि अधिकार बहाल केल्याचा कागदपत्रांतून उल्लेख मिळतो.

सन १५३६ त विजापूरकराशीं झालेल्या लढाईत कॅप्टन कृष्ण शेणै यांनी जें शौर्य व धैर्य प्रकट केलें त्यानें खूष होऊन गोव्याचा तत्कालीन मुख्य कॅप्टन दों जुआंव पेरैर यानें त्यांना 'काव्हालेयरु' (सरदार) चा किताब व अधिकार दिला.

कृष्ण शेणै यांनी आल्बुकेर्क यास गोव्यांतील सर्व प्रकारच्या उत्पन्नाच्या बाबी व स्थानिक राज्यकारभार यांची बारीकसारीक माहिती दिल्यानें, गोव्याचें खरें महत्व आल्बुकेर्क याच्या लक्षांत आलें आणि त्यावरून गोव्याचा राज्यकारभार स्वत: चालविण्याचा त्यानें संकल्प केला असणें संभवनीय आहे.

सन १५४२ त सां. फ्रां. शाव्हियेर गोव्यांत आला. सामोपचारानें ब्राह्मणवर्ग ख्रिस्ती होत नसल्याचें पाहून त्यानें पा. मिगेल व्हाज याला पोर्तुगालला पाठविलें व त्याच्यातर्फे ही तक्रार राजेसाहेबांस सादर केली. पा. व्हाज यानें राजे दों जुआंव (३रे) यांना सांगितलें कीं, "कृष्ण आमच्यांत इतका मिसळत असूनहि त्याचा आपल्या धर्मावर फार विश्वास आहे. कैदेंत असलेल्या हिंदूंसाठीं तर तो खास तयार अन्न पाठवून देतो इ."

तथापि कृष्ण शेणैंच्या पोर्तुगीजांबद्दलच्या हितकारक अशा कर्तबगारीमुळें व फिरंग्यांस त्यांची हरघडी आवश्यकता असल्यानें पा. व्हाज याच्या सांगण्याचा विशेष उपयोग झाला नाहीं.

सन १५४२ च्या सुमारास आदिलशहा व पोर्तुगीज यांच्यांत मिलायतखानासंबंधाचें जें राजकारण झालें तें सर्व कृष्ण शेणै यांच्यामार्फतच झाल्याचें गास्पार कुऱ्हे यानें लिहिलें आहे. त्या राजकारणासाठीं त्यांना फिरंगी सरकारतर्फे विजापुरास पाठविण्यांत आलें होतें. पुढें आदिलशहानें तेथेंच त्यांना कैदेंत टाकलें.

ता. ६ डिसेंबर १५४६ रोजीं त्यांनी विजापूरच्या कैदखान्यांतून पोर्तुगालच्या राजास जें पत्र लिहिलें त्याची नक्कल मिळवून ती डॉ. पिसुर्लेकर यांनी 'इंस्तितूत व्हा. द गाम' च्या त्रैमासिकांत प्रसिद्ध केली आहे. त्या पत्रावरून कृष्ण शेणै यांनी सासष्ट व बार्देश पोर्तुगीजांस मिळण्यासाठीं विजापूरकरांकडे केवढें मोठें राजकारण केलें हें स्पष्ट कळून येतें.

कृष्ण शेणै विजापूर येथें असतांना त्यांच्या अधिकाराच्या जागीं फिरंगी सरकारनें त्यांचा मुलगा दादाजी शेणै याची नेमणूक केली होती असें त्यांच्या एका पत्रावरून कळून येतें. त्यावेळीं दादाजी शेणै यांचें वय चाळीसएक वर्षांचें असावें असें अनुमान करतां येतें. हा हुद्दा त्यानें स. १५४८ पर्यंत चालविला. पुढें चोडण येथील लखू शेणै या गोव्यांतील कृष्ण शेणै यांच्यामागील हिंदु पुढाऱ्यानें प्रसंग पाहून ख्रिस्ती धर्म स्वीकारला आणि 'लुकस् द सा' हें नांव घेऊन कृष्ण शेणै यांच्या अधिकाराच्या जागीं स. १५४८त तो मुख्य ठाणेदार झाला. अर्थात् दादाजी शेणै याला त्या जागेवरून कमी करण्यांत आलें.

पाद्रि मिगेल व्हाज यानें स. १५४५त पोर्तुगालच्या राजास जो अर्ज पाठविला होता त्यांत त्यानें धर्मप्रसाराबाबतच्या इतर मजकुरासोबतच असेंहि लिहिलें होतें कीं—"कृष्ण शेणै याचा मुलगा जो भाषांतर करण्याच्या कामावर असतो त्यास त्या जागेवरून कमी करावें; कारण एक तर तो हिंदु असल्यानें दरबारी गुप्त माहिती फुटण्याचा संभव आहे आणि दुसरें तो आपण ख्रिस्ती नसल्याचा फार अभिमान बाळगतो इ."

सदर अर्जास अनुसरून पोर्तुगालच्या राजानें जें आज्ञापत्र पाठविलें त्यांत तो म्हणतो कीं — "कृष्ण शेणै याच्या मुलास त्याच्या हुद्यावरून काढून पेन्शन द्यावें." या राजाज्ञेवरूनच दादाजी शेणै याला अधिकारावरून कमी करण्यांत आलें असें वाटतें.

ता. २२ ऑगस्ट सन १५४८ रोजीं झालेल्या तहान्वयें आदिलशहाच्या कैदेंतून सुटल्यानंतर कृष्ण शेणै हे गाल्व्हांव व्हियेगस् यांच्यासोबत परत गोव्यांत आले कीं नाहींत, किंवा त्यांचें काय झालें हें कळत नाहीं; तथापि ते सुटकेनंतर फार करून विजापूर येथेंच कालवश झाले असावे असें वाटतें (—डॉ. पिसुर्लेकरकृत आ. इं. द. दि. पु.).

सन १५४८ नंतरच्या पोर्तुगीज कागदपत्रांत कृष्ण शेणै किंवा त्यांचा मुलगा दादाजी शेणै यांच्यासंबंधींची कोणतीच माहिती मिळत नाहीं.

— ६ —

रवळू कामत

रवळू कामत यांचा उल्लेख पोर्तुगीज कागदपत्रांत 'रवळू कामती' असा मिळतो. पोर्तुगीज गव्हर्नर आफोंस द आल्बुकेर्क यांचा सन १५१२ ते १५१४ या कालांतील कित्येक पत्रांतून रवळू कामती यांचें नांव आढळून येतें.

रवळू कामत हे दिवाडी बेटांतील एक सारस्वत प्रमुख गांवकर होते. फिरंग्यांविरुद्ध त्यांच्या शत्रूंनी रचलेल्या अनेक कारस्थानांची माहिती उघडकीस आणून यांनी आल्बुकेर्क यांकडून चांगला मान पटकावला होता.

गोव्यास आदिलशहाचा वेढा पडला त्याप्रसंगीं रवळू कामत यांनी फिरंग्यांच्या बाजूनें बरीच कामगिरी केली. हे बोलण्याचालण्यांत चतुर होते. जनतेबद्दलचाहि त्यांना बराच कळवळा असल्यानें कित्येक प्रसंगीं लोकांच्या वर्णीहि त्यांनी गव्हर्नरपर्यंत पोंचविल्या आहेत.

— ७ —

अज्जू नाईक

सन १६१० पासून १६२२ पर्यंतच्या १३ वर्षांच्या कालांत अज्जू नाईक हे गोवा सरकारच्या दुभाषाच्या जागेवर होते. हे जातीनें सारस्वत असून ख्रिस्तीकरणापूर्वी यांचें घराणें लोटली येथें होतें. अर्थात् हे लोटलीकर व श्रीरामनाथ देवाच्या महाजनांपैकींच असणें संभवनीय आहे.

अज्जू नाईक कुशल राजकारणी व धडाडीचे गृहस्थ होते. सन १६१३ सालीं जहांगीर बादशहाच्या दरबारांत पोर्तुगिजांचा वकील म्हणून पोर्तुगीज सरकारनें यांची नेमणूक केली होती. त्यावेळीं मोठ्या मुत्सद्देगिरीनें उभय राज्यकर्त्यांच्या महत्वाच्या राजकारणी गोष्टी यांनी हाताळल्या आहेत.

पुढें कांहीं कालानंतर मोंगल व पोर्तुगीज यांच्यांत कांहीं कारणानें वितुष्ट येऊन मोंगल बादशहा जहांगीर यानें सुरत शहरांत वास्तव्य करणाऱ्या सर्व पोर्तुगीज लोकांना कैद करण्याचा हुकूम दिला. त्याप्रसंगीं अज्जू नाईक यांचें वास्तव्य सुरतला असल्यानें त्यांनाहि मोंगल शिपायांनी कैद करून नेलें. त्यावेळीं कांहीं दिवस त्यांना मोंगलाच्या कैदेंत राहावें लागलें. सन १६१५ सालीं मोंगल व पोर्तुगीज यांच्यांत तह झाल्यानें अज्जू नाईक मोंगली कैदेंतून सुटले व गोव्यांत परत आले.

— ८ —

कृष्ण शेणवीं

हे गृहस्थहि पोर्तुगीज सरकारांत दुभाषाच्या अधिकारावर होते. सन १६४६ सालीं गोव्याचे व्हिसिरै दों फिलिप द मास्कारेंज्यस् यांनी दुभाषा कृष्ण शेणवीं यांना पोर्तुगीज सरकारचा वकील म्हणून महत्वाच्या राजकारणी कामासाठीं आदिलशहाकडे विजापूरला पाठविलें होतें. तें अत्यंत नाजूक व गुंतागुंतीचें काम त्यांनी कुशलतेनें पार पाडलें.

व्हिसिरै कोंदि द लिंज्यारिस् हे आपण स. १६३० सालीं एका महत्वाच्या राजकारणी कामगिरीवर पाठविलेल्या बुद्धिमान ब्राह्मणासंबंधीं लिहितात; पण त्या लिहिण्यांत त्यांच्या नांवाचा

उल्लेख नाहीं, व तें समजून घेण्याचीं साधनेंहि उपलब्ध नाहींत. (आइर्येतिश् द दि. पुर्तुगेझ – – डॉ. पिसुर्लेंकर).

तथापि तो उल्लेख या कृष्ण शेणवीं संबंधींचाच असावा असें अनुमान करणें गैर नाहीं.

— ९ —

नारायण शेणवीं

सन १६५४ ते १६७२ पर्यंत हे पोर्तुगीज सरकारच्या दुभाषाच्या अधिकारावर होते. हे चांगले मुत्सद्दी होते. यांचें पोर्तुगीज भाषाज्ञान व पोर्तुगीज अक्षरहि चांगलें होतें.

सन १६७४ सालीं श्रीशिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकाच्या महोत्सवास मुंबई येथील इंग्रजांचा Oxniden नांवाचा जो वकील रायगडावर गेला होता त्याच्याबरोबर नारायण शेणवीं नांवाचे एक गृहस्थ दुभाषी या नात्यानें होते. त्यांनी त्या महोत्सवाचें सुंदर वर्णन पोर्तुगीजमध्यें लिहिलें होतें. तें आज उपलब्ध नाहीं; तथापि त्याचें तत्कालीन इंग्रजी भाषांतर लंडनच्या इंडिया ऑफिसमध्यें आहे. हे नारायण शेणवीं पोर्तुगिजांचे दुभाषीच असावे व इकडील नोकरी सोडून ते पुढें इंग्रजांच्या नोकरीस राहिले असावे असें दिसतें. (आ. द. दि. पु.— डॉ. पिसुर्लेंकर).

— १० —

रामोजी शेणवीं कोठारी

सन १६४५ ते १६७४ पर्यंतच्या कालांत रामोजी सांतू शेणवीं कोठारी हे पोर्तुगिजांच्या दुभाषाच्या व इतर अधिकारांवर होते. कोठारी हे मूळचे सासष्टींतील केळशीचे राहणारे. ख्रिस्तीकरणप्रसंगीं ते डिचोली येथें गेले व तेथेंच राहूं लागले. तेथूनच रामोजी शेणवीं यांचा पोर्तुगिजांकडे संबंध जुळला. व्हिसिरै कोंदि द ओबिदुश् यांनी त्यांना गोवें येथें आणलें. यांच्या मुत्सद्दीपणामुळें पोर्तुगीज गव्हर्नर मेलु द कास्त्र व सौझ कुतींज्य यांनी त्यांना धार्मिक सर्व सवलती देऊन पोर्तुगीज हद्दींत निर्भयपणें राहाण्याचें खास फर्मान दिलें.

कोठारी यांचें नांव पोर्तुगीज, डच व इंग्रजी कागदपत्रांतूनहि प्रसिद्ध आहे. हे राजकारणामुळें डच, विजापूरकर, मराठे यांच्या दरबारांत प्रसिद्ध होते. फिरंग्यांचे बुद्धिमान वकील या नात्यानें आदिलशहा, बेदनूरचे राजे, छत्रपति शिवाजीमहाराज यांच्या दरबारांत यांना चांगला मान असे. स. १६५४ त विजापूरकरांकडून साष्ट, बार्देसवर स्वारी झाल्यानंतर जो तह झाला तो यांच्याच कुशलतेनें घडून आला. त्या तहावर रामोजी शेणवीं कोठारी यांची कानडी सही आहे.

मेलु द कास्त्र व सौज कुतींज्य या गव्हर्नरांनी कोठारीसंबंधीं आपल्या २ डिसेंबर १६५८ च्या पत्रांतून असा उल्लेख केला आहे — "...Tambem vay Ramogy Sinay Cotthary em quem se tem conhecido muita fidelidade e amor à nação Portuguesa, há de fazer oficio de lingoa e assistirvos, tem muito conhecimento dos gr.des da corte de Visapor aonde há hido E estado em

varios tempos, entendemos vos será de muito alivio, e procurará os meyos mais acomodados por donde se possa conseguir a retteficação da paz."

सन १६६१ त जूनमध्यें रामोजी शेणवीं यांना फिरंग्यांचे वकील म्हणून विजापूरकराचा सरदार रुस्तुमजमान याला भेटण्यास फोंडें येथें पाठविण्यांत आलें होतें.

सन १६६३ साली छत्रपति श्रीशिवाजीमहाराज कुडाळ येथें आले त्यावेळींहि पोर्तुगिजांचे वकील या नात्यानें हे त्यांच्या भेटीस गेले होते.

मेलु द कास्त्र व सौज कुतींज्य या उभय हंगामी गव्हर्नरांनी जीं पत्रें पोर्तुगालच्या राजास पाठविलीं त्यांपैकीं ता. १८ डिसेंबर सन १६५९ च्या पत्रांत रामोजी शेणवीं कोठारी यांच्या संबंधींचा पुढील मजकूर आढळून येतो. "...foy em sua companhia Ramogy Sinay Cotthary bragmane fiel que cõ muito amor serve a este Estado no que occupa; sua vivenda hé em Dicholim, ynda que assiste aquy o mais do tempo; foy ao Canará cõ o Pe. Gonçalo Martins no tempo da guerra, e a Vizapor enviado por alguns dos V. Reys, e Governadores próximos de que deo muy boa Conta..."

रामोजी शेणवीं कोठारी हे विद्वान् महान् मुत्सद्दी, चतुर, प्रसंगावधानी व स्वभावानें प्रेमळ असल्यानें पोर्तुगीज व्हिसिरै त्यांना फार मानीत असत. पोर्तुगीज दरबारांत त्यांचें वजन इतकें होतें कीं, इतरांना अशक्य वाटणाऱ्या गोष्टीहि ते शक्य करीत.

कोठारी यांचें लोकांतहि चांगलें वजन होतें. परिस्थिति नाजूक असली, तरी तशाहि प्रसंगीं वेळ काळ व संधि पाहून त्यांनी लोकांसाठीं दरबारांत आपलें वजन खर्च करण्यास कधींच कसूर केली नाहीं.

कोठारी यांच्या राजकारणी चतुराईबद्दल छत्रपतींच्या मुख्य प्रधानानेंहि कौतुक केलें आहे.

सन १६६७ सालीं श्रीशिवाजीमहाराजांनी बार्देसवर स्वारी करून तो घेतला. त्यानंतरच्या कालांत महाराज व पोर्तुगीज यांच्यांत वाटाघाटी होऊन जो तह झाला त्यांत रामोजी शेणवीं कोठारी यांचीच राजकारणी कुशलता जास्त आहे. या तहासंबंधींच्या सुरवातीच्या वाटाघाटी रायगडावर छत्रपतींच्या राजवाड्यांतील खास दिवाणखान्यांत कोठारी यांनींच केल्या व मुत्सद्दीपणानें तो तह घडवून आणला.

रामोजी शेणवीं कोठारी स. १६७४ नंतर लवकरच मृत्यु पावले.

— ११ —

रघुनाथ शेणवीं कोठारी

रामोजी शेणवीं यांच्या जागीं सन १६७८ च्या डिसेंबरांत गोवा सरकारनें रघुनाथ शेणवीं कोठारी नांवाच्या इसमाची नेमणूक केली. त्याच सालीं पोर्तुगिजांचा वकील म्हणून हे छत्रपति शिवाजींकडे गेले होते. हा रघुनाथ शेणवीं, रामोजी शेणवीं कोठारी यांचाच मुलगा असावा असें डॉ. पिसुर्लेकर यांचें मत आहे.

— १२ —

रामकृष्ण नाईक बरवे

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत रामकृष्ण नाईक बरवे नांवाच्या एका चांगल्या राजकारणी मनुष्याचा ठिकठिकाणीं उल्लेख मिळतो.

व्हिसिरै कोंदि द आल्व्होर यानें बरवे यांना एका महत्वाच्या राजकारणासाठीं कविकलश याकडे पाठविलें होतें.

सन १६८४ च्या मार्च महिन्यांत त्यांना रायगडावर छत्रपति संभाजींकडेहि पाठविण्यांत आलें होतें. यावेळीं ते पाद्रि फ्रेय आंतोनियु या पोर्तुगिजांच्या वकिलाचा दुभाषा या नात्यानें गेले होते.

सन १६९४ च्या नोव्हेंबर महिन्यांत व्हिसिरै कोंदि द व्हिलव्हेर्दि यांनी बरवे यांना तहाच्या वाटाघाटीसाठीं रावजी श्यामराव या छत्रपति राजाराममहाराजांच्या प्रधानाकडे पाठविल होतें. मराठ्यांनीं त्यावेळीं बार्देस घेऊन तेथें सारा वसुली करण्यास सुरवात केली होती.

रामकृष्ण नाईक बरवे हे जातीनें कोंकणस्थ असून ते छत्रपति संभाजीमहाराजांच्या वेळीं विशेष प्रसिद्धीस आले. यांचें वास्तव्य गोवें येथेंच होतें.

२४ मार्च १६८४ च्या एका पत्रांत तत्कालीन स्टेट सेक्रेटरी लिहितो कीं— " Ramacrisna Naique hé pessoa de quem o Sr. Conde V. Rey fas toda a confiança, porque se tem mostrado muito zelozo das cousas deste Estado. . .hé muito pratico, e tem todas as noticias das pases celebradas ,entre ambos os Estados...."

— १३ —

हरी शेणवीं बोरकर

हे सारस्वत असून बोलण्यांत चतुर व चांगले मुत्सद्दी होते. सन १६९९ सालीं जुलै महिन्यांत फिरंगी व वाडकर भोंसले यांच्यात तह घडवून आणण्यासाठीं यांना व्हिसिरै आंतोनियु लुईज गोंसाल्व्हिश् द काम्र कुर्तीज्य यांनी वाडकरांकडे वाटाघाटीस पाठविलें होतें.

हरी शेणवीं बोरकर हे श्रीशांतादुर्गेच्या महाजनांपैकींच असावेत असें वाटतें.

— १४ —

गणेश महाले

यांचें घराणें मूळचें लोटलीचें असून उपनांव शेणै लोटलीकर असें होतें. ख्रिस्तीकरणाच्या वेळीं यांचे पूर्वज दक्षिणेकडे गेले व तिकडेच स्थायीक झाले. त्या भागांतील एका संस्थानसत्तेच्या महालावर ते बराच काल अधिकारी असल्यानें त्यांचें मूळचें उपनांव लुप्त होऊन महाले हें नवीन उपनांव त्यांना प्राप्त झालें. याच घराण्यांत कुमठा येथें गणेश महाले यांचा जन्म झाला. फक्त कानडी आणि संस्कृत असें शिक्षण त्यांना मिळालें होतें; तथापि ते उपजतच चलाख व बुद्धिमान होते. घराण्याच्या गरीबीच्या प्रसंगीं त्यांचा जन्म झाल्यानें त्यांना विशेष शिक्षण घेतां आलें नाहीं आणि उदरनिर्वाहासाठीं एखादी नोकरी पाहाण्यावांचूनहि गत्यंतर राहिलें नाहीं.

शिमोग्यापासून पन्नासएक मैलांच्या अंतरावरील आजचें नगर हें गांव गतकालांत 'बिदरूर' नांवाच्या राज्याची राजधानी होती. पूर्वपश्चिम तीन मैल व दक्षिणोत्तर तीन मैल अशी त्या नगरीची लांबी-रुंदी असून सभोंवतीं दगडी कोट आणि बाहेरच्या बाजूनें चार पुरुष उंचीचा खोल खंदक असे. नगरींत प्रवेशण्याचे ठराविकच दरवाजे असून तेथें सक्त पहारे होते. परक्या ठिकाणांतून येणाऱ्या मालावर तेथें जकात घेत. कोणत्या मालास किती जकात हें नोकराच्या मर्जीवर अवलंबून असे. नोकरीसाठीं फिरत फिरत गणेश महाले या संस्थानांत आले. प्रवेशद्वारावर जकात देण्यास त्यांकडे पैसा नसल्यानें जवळचे नारळ देऊन ते नगरींत प्रवेशले आणि तेथील अंदाधुंदी जाणून वेशीवरच त्यांनी एक खोली भाड्यानें घेतली व तेथें आपली कचेरी थाटली. एक पट्टेवालाहि संभाळला. बाहेरून येणाऱ्या इसमास या कचेरींत घेऊन येणें त्याचें काम. येणाऱ्याचें नांव, गांव, धंदा, येण्याचें कारण टिपून घेऊन त्याकडून ठराविक पैसे वसूल करावे आणि त्याला 'अठरा काइनवासुंका कुमठे गणेशैय्यनरुजू' अशी पावती देऊन नगरींत सोडावें. असा प्रकार दीड वर्ष चालला. त्यानंतर एके दिवशीं राजे शिवप्पा नाईक यांनी त्यांची पावती पाहिली व त्यांना वाड्यांत बोलावून त्याचें कारण विचारलें.

प्रथम अभयवचन घेऊन महाले म्हणाले — "महाराज, फक्त आपली भेट व्हावी व रोजगार मिळावा हीच इच्छा याच्या मुळाशीं होती. राजे दयाळू व कौतुक करणारे होते. त्यांनी त्यांची एका जागेवर नेमणूक करून दिली. पुढें त्यांना कांहीं शत्रूहि निर्माण झाले. तथापि त्यांच्या मुत्सद्दीपणामुळें राजांनी त्यांना लवकरच प्रधानकीचींहि वस्त्रें दिलीं.

प्रधान गणेश महाले यांनी आपल्या कारकीर्दींत राज्याची व्यवस्था फार सुंदर ठेवली, अनेक नवीन सुधारणा केल्या, आर्थिक स्थिति व राज्याचा दर्जाहि वाढवून आसपासच्या भागांत चांगला दरारा राखला. राजे व प्रजा यांत इतका सलोखा राखला कीं, त्यांच्या या मुत्सद्दीगिरीबद्दल त्यांची सर्वत्र वाहवा झाली.

रामचंद्र विठ्ठल महाले

प्रधान गणेश महाले यांचे हे नातू. यांचा जन्म शके १५४५ च्या सुमारास झाला असावा. यांचें शिक्षण पुरें होतांच दरबारच्या एका खात्यावर त्यांची नेमणूक झाली. पुढें कर्तबगारीनें वाढतां वाढतां त्यांनी आपल्या आजोबांच्या प्रधानपदाची राजांकडून प्राप्ति करून घेतली. त्यांची बुद्धिमत्ता व मुत्सद्दीपणा पाहून राजे तर चकित झालेच व लोकांनाहि ते फार आदरणीय झाले.

एकदां हे व राजे राजकारणविषयक कांहीं गोष्टी बोलत होते. त्यावेळीं भद्रपा नाईक हे गादीवर होते. सहज मिशा पिरगळतांना एक केस त्यांच्या हातीं आला. जवळ प्रधानाशिवाय दुसरें कोणी नव्हतें. म्हणून सहज त्यांनी तो टाकण्यासाठीं महाले यांकडे दिला. तथापि त्यांचा अधिकार मोठा असल्यानें तो टाकण्याविषयीं त्यांनी आज्ञा केली नव्हती. फक्त 'इत्तगोळरी' (हें घ्या) इतकेंच म्हटलें. राजाज्ञा वंद्य मानून तो त्यांनी हातांत घेतला व नंतर सुवर्णाच्या रत्नखचित डबींत ठेवून ती आदरानें जवळ ठेवली.

कांहीं दिवसांनंतर पुनः एकांतांत बोलतांना राजांनी विचारलें 'मुंद येन माडिद्री?' (पुढें काय केलें?) प्रधान महाले यांनी लगेच कनवटीची डबी काढून राजांच्या हातांत दिली. इतक्या काळजीनें आपला केंस जपून ठेवल्याबद्दल राजांना कौतुक वाटलें. 'माझ्या केंसाला हे इतके जपतात तर सबंध देहाविषयीं व राज्याविषयीं हे किती काळजी बाळगत असतील' असें मनांत म्हणत प्रसन्न अंतःकरणानें त्यांनी प्रधान महाले यांना वाटेल तें मागण्याविषयीं आग्रह केला.

प्रधान महाले म्हणाले "जर देण्याची मर्जी असेल तर साडेतीन घटिका आपली राजमोहोर माझ्या हवालीं करावी."

राजांनी ती दुसऱ्या पंधरवड्यांत देण्याचें कबूल केलें. आणि ठराविक दिवशीं ती रामचंद्ररावांच्या हवालीं केली. त्या अवधींत देवस्थानें, क्षेत्रांच्या जागीं अन्नसत्रें, धर्मशाळा वगैरे राज्यास श्रेयस्कर अशा कृत्यांबद्दलची त्यांनी तयारीच करून ठेवली होती. त्या कागदपत्रांवर राजमोहोर करून ते मोकळे झाले.

राजमोहोरेचा कसा उपयोग केला हें राजांनी पाहिलें त्यावेळीं ते फार खूष झाले व प्रधान महाले यांच्या राजनिष्ठेबद्दल, बुद्धिमत्तेबद्दल व निर्लोभतेबद्दल त्यांनी त्यांचें कौतुक केलें.

बिदरूर राज्य व जवळचे एक दुसरे संस्थानिक यांच्यांत वितुष्ट आलें होतें, तें मोठ्या मुत्सद्दीपणानें मिटवून उभय राजांत त्यांनी सलोखा निर्माण केला. अशाच रीतीनें राजा व प्रजा यांच्यांत कांहीं वाद उपस्थित झाल्यासहि तो मोठ्या कुशलतेनें मिटविण्यांत प्रधान महाले यांची कर्तबगारी दिसून येई.

प्रधान रामचंद्रराव हे राजांप्रमाणेंच प्रजेलाहि फार प्रिय होते. त्यांनी राज्याची व्यवस्था ठीक राखली होती. प्रजेच्या हितासाठीं ते राजांपेक्षांहि नेहमीं तत्पर असत.

रामचंद्र मल्हार सुखठणकर

गोमंतकांतील ख्रिस्तीकरणप्रसंगीं सन १५६६ सालीं रामचंद्ररावांचे आजोबा केळोशी येथून सावंतवाडीकडे निघून गेले. यांचें मूळचें उपनांव रेगे असें होतें. त्यावेळीं आरवली गांव वाडी संस्थानांत होता. त्या गांवचें कुलकर्णीपणाचें काम पत्करून ते आरवलीस राहूं लागले. त्यांचा थोरला मुलगा मल्हारराव यांच्या येथें स. १६७५ त रामचंद्ररावांचा जन्म झाला. मराठी व संस्कृत असें साधारण शिक्षण होऊन ते वडिलांना मदत करूं लागले.

सन १७१० त आरवलीच्या कुलकर्णीपणाची त्यांची पाळी चालू असतां कांहीं भानगड उपस्थित झाली. वसुलापैकीं कांहीं रक्कम चोरांनी लांबवली. सरकारांत पुरी रक्कम भरतां आली नाहीं. त्यामुळें त्यांचें घरदारहि जप्त झालें. त्याच दरम्यान वडीलहि वारले. अशा आपत्तींत त्यांना गृहत्याग करावा लागला. ते तेथून निघाले ते तडक गोमंतकांत मंगेशीं येथें आले. त्यांच्याजवळ फक्त एकच पावली शिल्लक होती. श्रीमंगेशास अभिषेक करण्याची त्यांची उत्कट इच्छा होती, पण तेवढ्या रकमेंत अभिषेक होणें अशक्य असल्याचें पुजाऱ्याकडून कळून त्यांना फार दुःख झालें. शेवटीं समोरील तुलसीवृंदावनांत ती पुरून ठेवून त्यांनी देवाची मानसोपचारपूजा केली व तेथून पुढें निघाले.

रामचंद्रराव तेथून चालतच कवळें येथें आले. त्यांनी श्रीशांतादुर्गेचें दर्शन घेतलें. एक दिवस तेथें मुक्काम करून दुसऱ्या दिवशीं सकाळीं सजल नेत्रांनी प्रदक्षिणा घालून देवीला साष्टांग नमस्कार केला व ते चालूं लागले.

गोमंतकांतून ते निघाले ते मजल दर मजल करीत साताऱ्याला गेले आणि तेथील मामलेदाराकडे नोकरीस राहिले. पहिल्याप्रथम देवपूजा हेंच त्यांचें काम होतें. मामलेदार अगदीं साधे असल्यानें मुजूमदारच सर्व काम मुखत्यारीनें करी. त्यानें एकदां मामलत अचानक आपल्या घशांत घालण्याच्या हेतूनें हिशेबांत गोंधळ उडवून मामलेदाराच्या बेशिस्त कारभाराबद्दल पेशव्यांकडे कागाळी केली. चवकशी सुरू झाली. मामलेदार व त्याची मंडळी घाबरली. मुजूमदारानें कानावर हात ठेवले. अशा प्रसंगीं रामचंद्ररावांनी आपल्या यजमानाला धीर देऊन हिशेब व्यवस्थित लिहून पुरा केला व तो घेऊन ते पुण्यास गेले.

त्यावेळीं बाळाजी विश्वनाथ यांना नुकतींच पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं होतीं. त्यांचे कारभारी अंबाजीपंत पुरंदरे हे होते. त्यांनी आपल्या मुख्य कारकुनाकडून हिशेब पुरे झाल्याची खात्री करून घेतली आणि हिशेबाची सामान्य कल्पना चटकन येण्यासाठीं वट आंकटा लिहून देण्यास रामचंद्ररावांस सांगितलें. त्यांनी लगेच खिशांतून आंकड्याची चिट्ठी काढून पंतांकडे दिली. ती पाहून ते खुष झाले. त्यांनी हिशेबाची पावती तर दिलीच आणि मोठ्या कौतुकानें पेशव्यांकडे त्यांची शिफारस

केली आणि अशा रीतीनें पेशवे सरकारांत रामचंद्ररावांचा प्रवेश झाला.

जसजसा रामचंद्रबाबांच्या बुद्धीचा प्रकाश पडूं लागला तसतशीं त्यांकडे पेशव्यांकडून अधिकाधिक जबाबदारीचीं कामें संपवण्यांत येऊं लागलीं. बाळाजी विश्वनाथाच्यामागून बाजीराव बल्लाळ पेशवेपदावर आले. त्यांनाहि बाबांची योग्यता ठाऊक होतीच. त्यांनी राज्यकारभारांत नवीन पद्धतीची योग्य शिस्त बसविण्याची कामगिरी त्यांच्यावर संपवली. त्यांनी प्रथम राज्याची प्रांतवार नीट व्यवस्था लावून दिली. नंतर जमाबंदी नियमित केली. वसूलाचे नियम ठरविले. खर्चाचे तनखे निरनिराळे तोडून दिले. हिशेब व इतर लेखन यांत नवीन व्यवस्था लावली आणि तीं सर्व कामें शिस्तवार चालू ठेवून पेशव्यांचें दिवाणपद भूषविलें.

'होळकरांची कैफीयत' या पुस्तकांत लिहिलें आहे कीं—"रामचंद्रबाबा कर्ते पुरुष...माळव्याचे महालाचा आकार पाहून वांटण्या केल्या. निंमे शिंदे, निंमे होळकर, ऐशी वहिवाट चालली; परंतु वांटणीचा तपसील येणेंप्रमाणें: – श्रीमंत ४५ लक्ष, शिंदे २२॥, होळकर २२॥, पवार १० याप्रमाणें आकार पाहून माळवा वांटून दिल्हा."

अशीं अतिगुंतागुंतीचीं अनेक महत्त्वाचीं कामें रामचंद्रबाबांच्या मुत्सद्देगिरीनें व्यवस्थित पार पडत.

हिंदुस्थानांत शिंदे, होळकर वगैरे पेशव्यांचे मोठमोठे सरदार होते; तथापि दिल्ली, काशी, अयोध्या, माळवा वगैरे प्रांतांतील महत्त्वाचीं राजकीय कामें ते रामचंद्रबाबांकडूनच करून घेत.

नानासाहेब, सदाशिवराव भाऊ यांना राजकीय शिक्षण देण्याचें महत्त्वाचें कामहि त्यांच्याकडेच होतें.

पेशव्यांच्या दरबारांत रामचंद्रबाबांची योग्यता एवढी मोठी होती कीं, त्यांना पेशव्यांच्या मागोमाग मान होता. राजेरजवाड्यांकडून ज्यावेळीं पेशव्यांकडे नजराणे येत त्यावेळीं त्यांनाहि आदरपूर्वक नजराणे मिळत असत. शिंदेसरकारचें राज्य स्थापन करण्यास रामचंद्र मल्हार सुखठणकर हेच कारणीभूत झाले.

शिंदे हे मूळचे सातार्‍यांतील कण्हेरखेड या गांवचे पाटील. त्यांतील राणोजी शिंदे पेशव्यांकडे शिलेदारी करी. रामचंद्रबाबांनी त्याची बाजीरावांकडे शिफारस करून हुजरेगिरीवर प्रथम नेमणूक केली आणि नंतर संधि साधून त्याला उत्तरेकडील जहागिरी देववून सरदार केलें. जहागिरीबद्दल सांगितल्यावेळीं पेशवे म्हणाले—"तुमच्या म्हणण्याप्रमाणें याला आम्हीं जहागिरी देऊं; पण त्याबद्दलची हमी तुम्हीं घेतली पाहिजे." रामचंद्रबाबांनी ती गोष्ट मान्य केल्यावर पेशव्यांनी राणोजी शिंदे यांना उत्तरेकडील सुभ्याचीं वस्त्रें व जहागिरी देऊन त्याची दिवाणगिरी करण्याचें

काम रामचंद्रबाबांवर सोंपविलें आणि त्यांनी तें मोठ्या मुत्सद्दीपणानें पार पाडलें.

पेशव्यांचा उदेपूरचा वकील गोविंद कृष्ण यांचें स. १७३० चें एक पत्र पेशवेदप्तरांत आहे. त्यांत बाजीरावांनी सवाई जयसिंग यांच्याशीं केलेल्या महत्त्वाच्या राजकारणाचा उल्लेख असून तें राजकारण रामचंद्र मल्हार यांकडूनच झालें. अशीं उत्तरेंत व दक्षिणेंत त्यांकडून अनेक राजकारणें झालेलीं आहेत.

रामचंद्रबाबा हे पेशव्यांचे पहिल्या दर्जाचे सरदार असून ते सैन्याची हालचाल करण्यांत तर फारच तरबेज होते.

वैभवाचे दिवस आल्यावर रामचंद्रबाबा पुन: गोमंतकांत आले आणि त्यांनी श्रीमंगेशाला प्रथम मोहोरांचा अभिषेक केला. महाजन-मंडळीकडून अभिषेकाचा खर्च पावली ठरवून मागें तुळसीवृंदावनांत पुरून ठेवलेली पावली आणून त्यांनी पहिली पावती आपण घेतली.

इ. स. १७४० त बाजीराव पेशवे निधन पावल्यावर रामचंद्रबाबांना दक्षिणेंत यावें लागलें. बाजीरावांच्यामागून नानासाहेब पेशवाईच्या अधिकारावर आले. कांहीं दिवसांनी पेशवे घराण्यांत गृहकलहहि सुरू झाला. तथापि अशा परिस्थितींतूनहि कौशल्यानें मार्ग काढून त्यांनी पेशवे घराण्याचें हित साधलें.

रामचंद्रबाबा जसे चतुर मुत्सद्दी, तसेच ते शूर योद्धे होते. सावंतवाडीच्या भोंसले सरदेसाई यांचा मुलुख आंग्र्यांनी घेतला होता तो त्यांनी सरदेसाई यांना परत मिळवून दिला. उत्तर हिंदुस्थानांत तर शिंद्यांना अनेक लढायांत त्यांनी यश मिळवून दिलेंच होतें. इंदूर, कलबुर्गे, खेड, सांगोलें, घोडनदी, भालकी, श्रीरंगपट्टण, होळीहुन्नूर इ. ठिकाणीं झालेल्या लढायांत मोठ्या शौर्यानें लढून रामचंद्रबाबांनी पेशव्यांस विजयी केलें. त्याबद्दल त्यांना पेशवे सरकारांतून जी जहागीर मिळाली तिच्या सनदेसोबतचें पत्र असें आहे —

राजश्रीयाविराजित राजमान्य राजश्री रामचंद्र मल्हार सुखठणकर सारस्वत गौड स्वामी गोसावी यांसी —

"पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ सल्लास खमसैन मया व अलफ तुम्हीं हिंदुस्थानांतून हुजूर येऊन उपयोगी फार पडला व तिकडेही कामें दुरुस्त केलीं, कुटुंबवत्सल आहां, तुमचें चालविणें आवश्यक जाणोन मौजे इसबाबी ता॥ कासेगांव येथें इनाम जमीन विघे ३० पाव चावर हालीपटी व पेस्तरपटी स्वराज्य व मोंगलाई दुतर्फा अमल देखील सरदेशमुखी साहोत्रा बाबती मोकासा जल तरु तृण काष्ट पाषाण निधिनिक्षेप इत्यादि उपसर्ग न लागे असी तुम्हांस करार करून दिली असे तरी सदरहू जमीन तुम्हीं आपले दुमाला करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरेनें भोगवटा सुखरूप घेणें. चंद्र ९ रबिलावल बहुत काय लिहिणें हे विनंति."

रामचंद्रबाबांनीं उत्तर हिंदुस्थानांत असतांना अनेक देवालयें बांधलीं, तीर्थक्षेत्रांच्या जागीं घाट, धर्मशाळा बांधल्या आणि दुसऱ्या अनेक प्रकारांनीं मुक्तहस्तें दानधर्म केला. उज्जयनीच्या पंचक्रोशींत तर त्यांनी ११० देवालयें बांधलीं.

गोमंतकांतील कवळें, मंगेशीं, म्हाडदोळ या देवालयांना पूर्वीं दिलेल्या इनाम गांवांच्या उत्पन्नाच्या बाबतींत कांहीं अडथळे आल्यानें त्या जमिनीबद्दलच्या नव्या सनदा त्यांनी करून घेऊन येथील अडथळे दूर केले. त्याबद्दलचें पेशवे सरकारांतून फिरंगी अधिकाऱ्यास आलेलें पत्र पहा—

"राजेश्री रामचंद्र मल्हार यांचे कुळदेवांचीं देवालयें अंत्रूज प्रांतीं आहेत. तेथील उर्जेस तेल फुलें आणि द्रव्यें पाहिजेत त्यास खर्चाबद्दल रफायत पन्हा सदाशिव नाईक इमडी राजे सौंदें यांजकडून कवळें ग्राम श्रीशांतादुर्गा देवीस व मौजे प्रियोळ येथील श्रीम्हाळसा देवीस एक वाडा व श्रीमंगेश देवास एक वाडा व नकदी महाल मजकुरीं अडीचसें रुपये इनाम संपादून घेऊन सनदी हासल केल्या आहेत. त्याप्रें॥ आम्हीं तीं इनामें करार करून सरकारचीं पत्रें दिलीं आहेत. अशास गांव व वाडा मजकुरची कमाविशी करून कमाविसदार जातील अशास इजलाल पन्हांसीं संकल्प कीं सदरहू गांव वाडे देवालयें व कमाविसदार यांस इजलाल पन्हांकडून कांहींच तसोसी होऊं नये..........."

रामचंद्रबाबांनीं भारी किंमतीचे कित्येक अलंकार व मोठमोठ्या रोख देणग्या श्रीशांतादुर्गेस व श्रीमंगेशास दिल्या.

श्रीगोकर्ण येथें दरसाल महाशिवरात्रीच्या दिवशीं रामचंद्रबाबांच्या व्यवस्थेप्रमाणें गंगोत्री येथून गंगेची कावड येते. त्याचप्रमाणें रामेश्वरास गंगोत्रीची व रामेश्वरची काशीस अशीहि त्यांनी व्यवस्था केलेली आहे.

पुढें पेशव्यांच्या कारभारांतून ते निवृत्त झाले; तथापि सरदार या नात्यानें पेशवाईशीं त्यांचा संबंध होताच. त्यांच्याजवळ पैसा बराच होता. त्याशिवाय जहागिरीचें उत्पन्न असे. पुण्यास त्यांचा सात मजली मोठा वाडा होता.

उत्तर वयांत त्यांनी आपल्या संपत्तीचे तीन हिस्से केले. त्यांतील एक तृतियांश रक्कम दानधर्मास दिली, एक तृतियांश आपला दत्तक पुत्र सदाशिव रामचंद्र सुखठणकर याला दिली (बाबांना औरस संतति नव्हती) आणि एक तृतियांश सदाशिवराव भाऊ पेशवे यांना दिली. यांना ते पुत्राप्रमाणेंच मानीत असत.

रामचंद्रबाबांनी तीर्थयात्राहि पुष्कळ केल्या. पंढरपूरच्या यात्रेंतून ते पुण्यास आले व लगेच नवज्वरानें आजारी पडले. पांचव्याच दिवशीं ते बेशुद्ध झाले. मोठमोठ्या वैद्यांचे औषधोपचार केले तरी गुण मिळेना. अखेरीस सातव्या दिवशीं ता. ४ ऑक्टोबर सन १७५४ रोजीं रात्रौ सुमारें ११ वाजतां त्यांनी देह ठेवला. पत्नी द्वारकाबाई यांनी सहगमन केलें. त्यांचीं सरदारकीचीं वस्त्रें त्यांचा दत्तक सदाशिव रामचंद्र यांना मिळालीं.

श्रीमंत नानासाहेब, रघुनाथराव, सदाशिवराव भाऊ इ. पेशवे व सर्व सरदार त्यांच्या अंत्ययात्रेस हजर होते.

— १७ —

नारो राम मंत्री

गोमंतकांतील साष्टी प्रांताच्या ख्रिस्तीकरण-प्रसंगीं सन १५६६ सालीं केळोशी येथून ज्या गृहस्थांनी स्थलांतर केलें त्यांतच राम शेणवीं रेगे या नावांचेहि एक गृहस्थ होते. हेच नारो राम मंत्री यांचे वडील होत. नारो राम यांचें मूळ उपनांव रेगे हें असून ते कवळें येथील श्रीशांतादुर्गा देवीचे महाजन होते. पुढें मंत्रीपदप्राप्तीनंतर त्यांना 'मंत्री' हेंच उपनांव मिळालें.

राम शेणवीं रेगे पेडणेंमार्गें सावंतवाडीकडे जाऊन वेंगुर्ल्याजवळच्या कोचरें येथें स्थायिक झाले. कांहीं दिवसांनंतर त्यांना त्या गांवचें कुलकर्ण मिळालें; पण प्राप्ति अगदींच बेताची आणि घरची मंडळी बरीच असल्यानें संसार फार गरीबीचा होता. दारिद्र्यांत व अनारोग्यांत पिचत जाऊन कांहीं कालानें ते कालवश झाले. बायकोहि वारली. कठिण परिस्थितीमुळें त्यांचा मुलगा नारो राम शेणवीं यांना तर संसाराचा कंटाळाच आला. व्यवहारासाठीं धडपड करावी व ती आंगलट यावी हें त्यांचें ठरून गेल्यासारखें झालें होतें.

दिवस झपाट्यानें जात होते. खर्च राहात नव्हता. आरोग्य कमी आणि प्राप्ति अपुरी त्यामुळें त्यांचा प्रत्येक दिवस विवंचनेंत जाऊं लागला. अखेरीस संसाराला कंटाळून त्यांनी या जगास अखेरचा रामराम ठोकण्याचा निश्चय केला. देह ठेवण्यापूर्वी एकदां कुलदेवीचें दर्शन घ्यावें अशा हेतूनें ते कवळ्यास आले आणि कांहीं दिवस तेथें राहून श्रीशांतादुर्गेची मनःपूर्वक सेवा केली. अखेरचें देवदर्शन करून रात्रींच कुठें तरी आत्मघात करून घेण्याचा त्यांचा विचार ठरला. त्याप्रमाणें त्यांनी देवीला प्रदक्षिणा घालून सजल नेत्रांनी तिजकडे पाहिलें. तिला साष्टांग नमस्कार घातला आणि बाहेर आले. चौकांत कीर्तन चालू होतें. ते तेथें क्षणभर बसले आणि आख्यान ऐकतां ऐकतां त्यांना डुलकी आली.

त्या डुलकींत त्यांनी स्वप्न पाहिलें. एक तेजःपुंज बाई जवळ येऊन प्रसन्न वदनानें त्यांना म्हणाली —"बेटा, घाबरूं नकोस. आत्मघाताचा विचारहि मनांतून काढून टाक. लवकरच तुला वैभवाचे दिवस येतील!"

दुसऱ्या दिवशीं देवीस कौल लावून खुलासा मिळविला आणि तिच्या शब्दावर विश्वास ठेवून त्यांनी आत्मघाताचा विचार सोडून देऊन नोकरीसाठीं साताऱ्यास जाण्याचें प्रस्थान ठेवलें.

साताऱ्यास जाऊन ते प्रथम धनाजी जाधव यांकडे राहिले. कांहीं दिवसांनी त्यांचा दरबारांत प्रवेश झाला. जात्याच हुशार आणि वेळहि अनुकूल झाल्यानें प्रत्येक कामगिरींत ते चांगले चमकूं लागले. स. १७०९ सालीं छत्रपति शाहूमहाराजांस गादी मिळवून देण्यांत त्यांचे श्रम प्रमुखत्वानें कारणीभूत झाले. त्यामुळें गादीवर येतांच किताब व तरवार देऊन शाहूमहाराजांनी त्यांचा गौरव केला. पुढें त्यांनी सन १७१० सालीं त्यांना आपलें मंत्रीपद दिलें.

शाहूमहाराजांच्या अनेक लढायांत, त्याचप्रमाणें पेशव्यांच्या उत्तरेकडील व दक्षिणेच्या

मसलती आणि त्या काळीं झालेले तहनामे या सर्वांमध्यें नारो राम मंत्री यांचा सल्ला शाहूमहाराजांनी घेतला. छत्रपति शाहूमहाराजांच्या कारकिर्दीत नारो राम मंत्री यांची मुत्सद्देगिरी फारच चकाकली.

त्यांच्यावेळचें छत्रपति दरबारांतील प्रधानमंडळ असें होतें :— प्रतिनिधि-परशुरामपंत त्र्यंबक. पेशवे-बाळाजी विश्वनाथ व नंतर बाजीराव. अमात्य-अंबाराम बापू हणमंते. सचीव-नारो शंकर. मंत्री-नारो राम शेणवी रेगे ऊर्फ नारो राम मंत्री. सेनापति-मानसिंग मोरे. सुमंत-आनंदराव. न्यायाधीश-होनाजी अनंत. पंडित-मुद्गल भट्ट उपाध्याय.

बाळाजी विश्वनाथ व बाजीराव या उभय पेशव्यांना नारो राम मंत्री यांच्याबद्दल फार विश्वास व मोठा आदर असे. ते मोठे देवभक्त होते. त्यामुळें "श्रीशांतादुर्गा भक्तस्य नारो राम मंत्रिण :" असा त्यांचा शिक्का होता. सदाशिव पेठेंत मंत्र्यांचा मोठा वाडा होता. इस्लामपूर येथें त्याचा दुसरा वाडा व मोठी जहागीर असून तेथेंच त्यांचे कांहीं वंशज राहात होते.

छत्रपतींच्या दरबारांत मंत्र्यांसारखा मोठा अधिकार व वैभव प्राप्त झाल्यानंतर लवकरच नारो राम मंत्री आपल्या कुलस्वामिनींच्या दर्शनास कवळें येथें आले. त्यावेळीं श्रीशांतादुर्गा देवस्थानची स्थिति साधारणपैकींच होती. त्यांनी स्वतः बराच पैसा खर्च करून भव्य व नमुनेदार देवालय बांधण्याची व्यवस्था केली. त्याचप्रमाणें देवालयाच्या मागच्या बाजूस एक अग्रशालाहि बांधली. इतकेंच नव्हे तर कित्येक अलंकार व इतर देणग्याहि दिल्या. त्या इमारतींचें बांधकाम सन १७२० च्या सुमारास झालें असावें असें दिसतें.

सन १७३८ सालीं अंत्रूज प्रांत सौंदेंकरांकडून मराठ्यांनी आपल्या ताब्यांत घेतला त्यावेळीं नारो राम मंत्री यांनी श्रीशांतादुर्गा देवीच्या पूजा, नैवेद्य, नंदादीप वगैरेसाठीं छत्रपतींचे तत्कालीन मुख्य प्रधान पहिले बाजीराव यांकडून कवळें गांव सन १७३९ त श्रीशांतादुर्गेस इनाम देवविला; आणि ती सनद स्वतःच्या शिक्यानिशीं लिहिलेल्या आज्ञापत्रास जोडून मराठ्यांचे गोमंतकांतील सरसुभेदार नारो चिमणाजी यांकडे रवाना केली. तेव्हांपासून सदर गांवचें उत्पन्न श्रीशांतादुर्गा देवस्थान घेऊं लागलें.

सनद — (शिक्का — 'श्री राजा शाहू नरपति हर्षनिधान बाजीराव बल्लाळ प्रधान') श्री आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री बाजीराव पंडित प्रधान ता॥ मोकदमांनी मौजे कवळें तपे अंतरूज मामले फोंडा सु॥ आर्बैन मया अलफ (इ. स. १७३९) श्रीदेवी मु॥ मौजे मजकूर तेथील पूजाउर्जा नेवेद्य नंदादीप उत्छाव चालविलिया श्रेयस्कर जाणोन मौजे मजकूर श्रीचे उर्जेस कुळबाव कुळकानू हालीपटी व पेस्तरपटी खेरीज हकदार व कदीम इनामदार करून नूतन इनाम दिला असे. तर तुम्हीं श्रीकडे रुजू होऊन मौजे मजकुरचा वसूल देणें; नूतन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रती लिहून घेऊन अस्सल पत्र भोगवटी यास श्री...कडे परतोन देणें जाणिजे जमादिलावर. (लेखनसीमा)

मंत्री यांचें पत्र—(शिक्का—'श्रीशांतादेवी भक्तस्य नारो राम मंत्री') श्रीराम द म॥ अनाम देशमुख व देशपांडे ता॥ अंतरूज मामले

फोंडा यांसी नारो राम मंत्री सुहूरसन आर्बैन मया व अलफ (इ. स. १७३९) श्रीदेवी मु॥ कवळें तपे मजकूर येथील पूजाउर्जा नेवेद्य नंदादीप उत्साह चालावया बद्दल मौजे मजकूर कुळबाव कुळकानू खेरीज हकदार व इनामदार करून नूतन इनाम राजेश्री बाजीराव पंडित प्रधान यांणीं देऊन आलाहिदा सनदा सादर केल्या आहेत त्या प्र॥ मौजे मजकुरचा ऐवज श्रीकडे बीकुसूर पावीत जाणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रति लिहून घेऊन अस्सल पत्र भोवगटी यास श्रीचा पुजारी यापासीं परतोन देणें जाणिजे. छ सवाल पा॥ हुजूर. (ले. सी.).

एकंदरीत श्रीशांतादुर्गा देवस्थानास साधारण स्थितींतून वर काढून वैभवसंपन्न करण्यास नारो राम मंत्री प्रमुखत्वानें झटले. म्हणूनच मंत्री यांना सदर देवस्थानांत मोठा मान आहे. मंत्र्यांच्या आगमनप्रसंगीं त्यांच्या स्वागतार्थ संस्थानचा सर्व प्रकारचा इतमाम सामोरा पाठवून त्यांना थाटानें देवालयांत आणण्याचा अजून परिपाठ आहे.

मराठे व सौंदेकर यांच्यांत तह घडवून आणण्याच्या कामीं नारो राम मंत्री यांची कुशलता व मुत्सद्दीपणा यांचा फार उपयोग झाला.

सांप्रत यांचे वंशज सातारा जिल्ह्यांत इस्लामपूर जवळच्या बागणी गांवांत राहात असल्याची माहिती मिळते.

— १८ —

विसाजी पडवळ

विसाजी पडवळ यांनांच वेसू पडवळ असेंहि म्हणत. यांची कुलदेवी मुळगांव येथील धाकटी वनदेवता असून जन्मभूमि बार्देस महाल होय. इ. स. च्या १२ व्या शतकाच्या पूर्वार्धात हा लष्करी वृत्तीचा तरुण पहिल्या प्रथम उत्तर कोंकणच्या शिलाहारांच्या सैन्यांत शिरला आणि कित्येक लढायांत यश मिळवून क्रमाक्रमानें वाढत सेनापतीच्या हुद्यापर्यंत चढला. पडवळ हे राजकारणांतहि फार हुशार असल्यानें शिलाहारवंशांतील हरिपाल राजानें त्यांची आपल्या प्रधानपदावर नेमणूक केली. त्यांची कारकीर्द शौर्य व मुत्सद्दीपणांत बरीच चमकली. वसईजवळच्या आगाशी येथील स. ११५० च्या सदर हरिपाल राजाच्या एका शिलालेखांत वेसू पडवळ प्रधान असें नांव आढळतें.

— १९ —

राम कामत

यांची जन्मभूमि कुंडई. सन १६६२ च्या सुमारास पोर्तुगालच्या राजानें मुंबई इंग्रजांना दिल्यानें तिचे अधिकार साहजिकच ईस्ट इंडिया कंपनीकडे आले. यानंतर व्यवसायाच्या निमित्तानें कांहीं गोमंतकीय गृहस्थ तिकडे गेले व उद्योग-व्यवसायाच्या कारणानें तेथें स्थायिक झाले. सन १६८५ सालीं आपल्या वयाच्या ३५ व्या वर्षी राम कामतहि मुंबईस जाऊन तेथेंच वास्तव्य करून राहिले. ते तंबाखूचा व्यापार करीत. चलाख बुद्धि,

अनुकूल काल यांमुळें व्यापारांत त्यांनी बराच पैसा मिळविला.

पुढें त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीची दलाली मिळविली. तंबाखूप्रमाणेंच शिसें, लोखंड, कथील, साखर, अफू यांचाहि व्यापार ते मद्रास, कलकत्ता, इराणी आखातांतील आब्बास बंदरापर्यंत करीत. वाढत्या व्यापास जरूरी भासल्यानें त्यांनी चार स्वतंत्र जहाजें बाळगून त्यांच्यावर हिंदी खलाशांप्रमाणेंच इंग्रज खलाशीहि नोकरीस ठेवले. मुंबईत कोटांतील बडाबाजारमध्यें या जहाजांचें निवासस्थान होतें.

सन १६८७ सालीं ईस्ट इंडिया कंपनीनें त्यांना आपल्या टांकसाळीवर मुख्याधिकारी नेमलें. आपला कामचलाऊ व्यवहार लाला कामत या आपल्या बंधूकडे संपवून त्यांनी टांकसाळीवरचेंहि काम पहाण्यास सुरवात केली.

पुढें सन १६९७ त कंपनीच्या एतद्देशीय फौजेचे ते सेनापति झाले. ते व्यापारांत जसे हुशार तसेच तरवार गाजविण्यांत व मुत्सद्देगिरींतहि फार कुशल होते. शिद्दी याकुबखानानें पंचवीस हजार सैन्यानिशीं मुंबईवर स्वारी केली त्यावेळीं राम कामत अत्यंत शौर्यानें लढले व त्यांनी शिद्दी यास २२ जून १६९० रोजीं मुंबईतून कायमचा घालवून दिला.

ता. २३ जून १६९४ रोजीं कंपनी सरकारनें त्यांची 'मास्टर जनरल ऑफ दि ब्लॅक आर्मि' या हुद्यावर नेमणूक केली. यानंतर लवकरच ते मुंबईचे कलेक्टर झाले. सन १७१८ सालीं राम कामत ब्रिटिश एतद्देशीय सैन्याचे कमांडर होते. विजयदुर्ग येथें कान्होजी आंग्रे यांच्याशीं त्यांची मोठी लढाई झाली होती. या लढाईत त्यांनी जें शौर्य व मुत्सद्दीपणा दाखविला त्याबद्दल गव्हर्नरनें तरवार व मॅडल देऊन त्यांचा गौरव केला.

मुंबईचें चालुक्यकालीन वाळुकेश्वर देवालय परकी अमलांत उध्वस्त झालें होतें. तें कामत यांनी स. १७०३ सालीं पुन: बांधलें. मलबार हिल त्यांच्याच ताब्यांत होती. सदर देवालय, धर्मशाळेजवळची वाडी, बाणगंगेजवळील खुली जागा आजहि सारस्वत ट्रस्टींच्या ताब्यांत आहे.

राम कामत यांनी कोटांत आपल्या निवासस्थानाजवळ व्यंकटेश व सामलियालाल हीं दोन देवालयें व त्यांना लागूनच संचारार्थ गेल्यास श्रीगोकर्णमठाधीशांच्या वास्तव्यासाठीं एक छोटा मठ बांधला होता. कामतांच्या मागें देवळांची व धर्मशाळा वगैरेची स्थिति ठीक राहिली नाहीं. शेवटीं तंटा लागून प्रकरण कोर्टांत गेलें आणि देवळें राम कामत यांनी बांधली असून तीं गौड सारस्वत ज्ञातीचीं व सार्वजनिक असल्याचा हायकोर्टानें निकाल दिला. सांप्रत हा भाग ट्रस्टींच्या ताब्यांत आहे.

एकंदरींत राम कामत हें एक त्या कालांतील बडे प्रस्थ असून सन्माननीय सद्गृहस्थ, बडे व्यापारी, तरवारबहाद्दर आणि कुशल मुत्सद्दी म्हणून फार नांवाजले.

गैरसमजामुळें अखेरच्या कालांत मात्र इंग्रजांकडून त्यांची भयंकर नुकसानी झाली!

— २० —

बक्षीबहाद्दर जिवबादादा केरकर — १

शौर्य आणि मुत्सद्दीपणा या मूल्यवान गुणांनी ज्यांनी आपलें नांव इतिहासांत अजरामर करून ठेवलें अशा असामान्य पुरुषांत जिवबादादांचें नांव ठळकपणें झळकणारें आहे.

पेडणें महालांतील मोर्जी येथें विठ्ठल शेणवीं संजगिरी नांवाचे एक कुलकर्णी होते. गणेश, बळवंत व रामकृष्ण या त्यांच्या तीन मुलांत पहिल्याला नरोबा, जिवबा व शिवबा असे तीन मुलगे झाले. त्यांपैकीं जिवबा याला बळवंतरावांना दत्तक देण्यांत आलें. हेच जिवबादादा केरकर. यांचा जन्म सदर महालांतील केरी येथें सन १७४० सालीं झाला. मोर्जी येथें असतांनाच विठ्ठल शेणवीं यांनी केरी गांवांत एक जमीन विकत घेऊन घरहि बांधलें होतें.

जिवबादादांचा वर्ण निमगोरा, चेहरा सतेज, वृत्ति उत्साही व स्वभाव प्रेमळ नि करारी होता. प्राथमिक मराठी शिक्षणानंतर रामायण, महाभारतादि ग्रंथ, बखरी, ऐतिहासिक कागदपत्र इ. त्यांच्या वाचनांत येऊं लागल्यानें त्यांच्या मनावर निराळेच संस्कार होत चालले. श्रीमंगेश त्यांचा कुलदेव. त्याच्यावर त्यांची फार भक्ति होती. एके दिवशीं त्यांना दृष्टांत झाल्यानें वयाच्या १६ व्या वर्षी स. १७५६ त वडिलांचा निरोप घेऊन ते महाराष्ट्रांत जाण्यास निघाले व केरी-आरंवदें-सावंतवाडी-आजरें या गांवांवरून कोल्हापुरास गेले आणि तेथें त्यांनी एका शास्त्रीबुवाकडे नोकरी व फावल्या वेळांत संस्कृत अभ्यास सुरू केला. त्याचप्रमाणें तेथील आखाड्यांत दांडपट्टा, तीर, बोथाटी, तरवार, भाला, निशाण, घोड्यावर बसणें यांचेंहि शिक्षण घेण्यास आरंभ केला. थोड्याच अवधींत आखाड्यांतील शिक्षणांत ते तरबेज झाले.

अंदाजें एका वर्षानंतर ते पुण्यास गेले व पेशव्यांचे सरदार बरवे यांकडे राहिले. त्यांच्याच शिफारशीनें त्यांची पेशव्यांच्या वांकनिशीवर नेमणूक झाली. कांहीं कालानें सरदार बर्वे यांच्या जहागिरीचे वहिवाटदार म्हणून पेशव्यांनीच त्यांची निवड केली. पुढें सरदार बर्व्यांच्या पथकाचे अधिकारी या नात्यानें पानिपतच्या लढाईत त्यांनी मोठी मर्दुमकी गाजविली आणि त्याच लढाईमुळें त्यांचें पाणी कळून आलें.

पानिपतची रणभूमि पूर्वीपासून महान् संग्रामभूमि म्हणून प्रसिद्ध आहे. याच भूमीला महाभारतकालांत कुरुक्षेत्र म्हणत. कौरवपांडवांच्या ४० लक्ष सैन्याचा येथेंच संहार झाला. सन ११९१ त या पानिपत-रणभूमीवर महंमदघोरी व पृथ्वीराज चव्हाण यांचा संग्राम झाला. सन १७२६ त मोंगल बादशहा बाबर व इब्राहिम लोदी यांची लढाई झाली. सन १५५६ सालीं हुमायून व अकबर यांनी शेरशहा घराण्यांतील शिकंदरचा येथेंच पराभव केला. आणि याच रणभूमीवरील संग्रामांत सन १७६१ त अफगाण बादशहा अहमदशहा अबदाली व पेशव्यांतर्फे सदाशिव चिमणाजी ऊर्फ भाऊसाहेब पेशवे व विश्वासराव यांची मोठी लढाई झाली. तोच मराठेशाहींतील घनघोर पानिपत संग्राम होय. याच संग्रामांत केरकरांचें धैर्य व शौर्य विशेष प्रगटलें.

तथापि दुर्दैवानें पानिपतच्या युद्धांत अनेक वीर खर्ची पडून पराभव झाल्यानें मराठेशाहीस

जबरदस्त धक्का बसला व त्यामुळें श्रीमंत नानासाहेब पेशव्यांना अत्यंत खेद झाला. त्याच विचारानें त्यांची प्रकृति बिघडून ते निधन पावले.

श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी महादजी शिंदे यांस सुभेदारीचीं वस्त्रें देऊन त्यांच्या मदतीस वीर व मुत्सद्दी म्हणून जिवबादादा यांना दिलें होतें, आणि श्रीमंतांच्या समजाप्रमाणें त्यांनी शिंद्यांना राजकारण, राज्यकारभार आणि लष्करी हालचाली यांत बहुमूल्य मदत केली. शिंद्यांचे मुख्य सेनापति या नात्यानें त्यांकडून जीं कार्यें घडलीं त्यामुळें उत्तरेंत त्यांचा व शिंदेशाहीचा दरारा फारच वाढला. त्यांनी रजपुतांचा मोड केला व गोहदच्या जाट राण्याचाहि पराभव केला. टिपूशीं झालेल्या मराठ्यांच्या लढाईत सरदार परशुरामभाऊ पटवर्धनासोबत शिंद्यांतर्फे जिवबादादा गेले होते. त्यावेळीं दादांनी अलौकिक शौर्य प्रगट करून बदामीचा अजिंक्य किल्ला घेतला व टिपूस जेरीस आणलें. अशा त्यांनी अनेक लढाया मारल्या.

शिंदेशाहीचा लौकिक आणि दरारा म्हणजे जिवबादादांचें शौर्य. यांची फौज आल्याचें कळतांच शत्रु घाबरून पळ काढीत.

दिल्लीचा बादशहा शहा अलम वृद्धत्वामुळें निर्बल झाला होता. त्याचें प्रधानमंडळ व सेनापति स्वार्थामुळें कर्तव्यशून्य बनले होते. ही स्थिति पाहून फिरोजाबादचा सुभेदार गुलामकादर बादशहावर चालून आला आणि त्यानें त्याला तक्तावरून खालीं ओढून काढलें, भांडार लुटलें व जनानखान्यांतील स्त्रियांना नग्न करून त्यांचा छळ केला. बादशाही लष्करी बंदोबस्त ढिला पडल्यानें सर्वत्र अंदाधुंदी चालू झाली. अशावेळीं दिल्लीपतीनें शिंद्यांची मदत मागितली. लगेच जिवबादादा केरकर आपल्या फौजेनिशीं तिकडे जाऊन त्यांनी गुलाम कादरला जर्जर केलें आणि त्याचा पूर्ण पराभव केला. त्याच्या पारिपत्यानंतर दिल्लीस जाऊन त्यांनी बादशहाची भेट घेतली. बादशहानें प्रसन्न होऊन बादशाहीची वजिरी (मुख्य प्रधानकी) महादजी शिंद्यांना बहाल केली आणि सन्मानपूर्वक सनद पाठविली.

शिंदे दिल्लीस आले. दिल्लीपतींकडून त्यांचें बादशाही थाटाचें स्वागत झालें. मोठा दरबार भरवून बादशहानें शिंदे व त्यांचे सेनापति केरकर यांचा मोठा गौरव केला. या दरबारांत बादशहानें शिंद्यांकडील वीरांना निरनिराळे किताब दिले. त्यांपैकीं माधवराव ऊर्फ महादजी शिंदे यांना 'अलिजाबहाद्दर मुजफरजंग,' सेनापति जिवबादादा केरकर यांना 'बक्षीबहाद्दर फत्तेजंग,' लखबादादा लाड यांना 'समशेरजंग बहाद्दर' आणि जिवबादादांच्या खास सूचनेनें याच दरबारांत सावंतवाडीचे खेम सावंत भोंसले सरदेसाई यांना मोरचलें व राजेबहाद्दर पदवी देण्यांत आली.

मोर्चलांचा मान स्वातंत्र्यनिदर्शक असल्यानें सावंतांचे तत्कालीन अधिसत्ताधीश छत्रपति कोल्हापूरकर यांना ती गोष्ट आवडली नाहीं. त्यांनी वठणीस आणण्यासाठीं वाडकरांवर सरदार दुगल यांना पाठविलें आणि त्यांच्या फौजेनें सावंतवाडींत शिरून राजवाड्यास वेढा दिला. हल्ला आकस्मिक असल्यानें आंतून कांहीं प्रतिकार झाला नाहीं. रात्रीच्या वेळीं वाड्यांतील मंडळी मात्र गुपचूप निघून गेली व पेडणें येथें देशप्रभु नागेशराव देसाई यांकडे जाऊन राहिली. ही बातमी शिंदे-दरबारांत समजली त्यावेळीं जिव-

बादादांनी कोल्हापूरकरांना एक खलिता पाठविला आणि त्यांत लिहिलें — "तुमच्या पारिपत्यासाठीं फौजेनिशीं लवकरच येण्याचें निश्चित केलें आहे."

शिंदेशाहीचा दरारा आणि जिवबादादांचें सामर्थ्य यांची कोल्हापूरकरांना चांगली जाणीव असल्यानें त्यांनी सावंतांना आदरानें बोलावून आणून त्यांचें राज्य त्यांच्या स्वाधीन केलें.

वजिरीचे अधिकार मिळाल्यापासून बादशाही कारभाराचें सर्व काम शिंदे जिवबादादांच्या सहाय्यानेंच करीत असत. कित्येक वेळां दादाच दिल्लीस जाऊन मुखत्यारीनें कारभार पहात. पुढें कांहीं दिवसांनी बादशहांना खासगी खर्चासाठीं वार्षिक नऊ लाख रुपयांची नेमणूक करून देऊन दिल्ली, आग्रा इ. प्रांत जिवबादादांच्या सल्लयानें शिंद्यांनी आपल्या राज्यास जोडले. (महादजी शिंदे चरित्र पृ. २२१). जेथें छत्रपति शिवाजीला बंदिवान व्हावें लागलें, उत्तर-दिग्विजयी पराक्रमी बाजीरावासहि जेथें यशस्वी होतां आलें नाहीं ती दिल्ली-बादशाही केवळ जिवबादादा केरकरांच्या शौर्यामुळें शिंद्यांकडे आली. (जि. के. चरित्र).

जुन्या बखरींत मराठे व रजपूत यांच्या लढायांना 'भारतीयुद्ध' व जिवबादादांना 'भारतीवर' असें म्हटलें आहे. (पोवाडे).

होनाजी बाळ आपल्या एका पोवाड्यांत म्हणतात —"जिवबादादा ते रणफंदी, काबिज हिंदुस्थान शिवंदी। करून आले दक्षिणसंधि।"

पराक्रम व राजकारणकुशलता आणि अपूर्व स्वामिनिष्ठा यांबद्दलच्या पूर्ण विश्वासानें एकदां पुण्याच्या दरबारांत जास्त मुदतीच्या कामासाठीं सरदार शिंदे जातांना त्यांनी राज्याचे सर्वाधिकार जिवबादादांकडे दिले आणि ते त्यांनी अत्यंत कुशलतेनें बजावून आपला प्रामाणिकपणा पुन: एकदां व्यक्त केला. इंग्लिश इतिहासकार म्हणतात "उत्तर व दक्षिणेकडे आणि प्रत्यक्ष पुण्याच्या दरबारांत विशेष वजन असलेले दुसरे एखादे सेनाध्यक्ष असते तर यावेळीं शिंद्यांचें राज्यहि बळकावून बसले असते. तथापि कमांडर केरकर शूर तितकेच प्रामाणिक व स्वामिनिष्ठ होते."

महादजी शिंद्यांच्या निर्याणानंतर दौलतरावांना दत्तक घेऊन गादीवर बसवावें अशी केरकरांदि अधिकाऱ्यांची इच्छा झाली; पण नाना फडणीस यांच्या सूचनेवरून महादजींची पत्नी लक्ष्मीबाई हरकत घेऊं लागली. त्यावेळीं केरकरांनीं "शिंद्यांचा हा एकच वंशज दत्तक घेण्यायोग्य असून त्यांकडून तुमच्या मानास कमीपणा आणण्याचें कोणतेंहि कृत्य होणार नाहीं याची मी हमी घेतों" असें वचन दिल्यानंतरच पसंती मिळाली व दत्तकविधान झालें.

यानंतर पेशवे-दरबारांतून सरदारी व सुभेदारी अधिकारवस्त्रें देण्यास नाना फडणीस यांनी हरकत घेतली. "दोन कोटी रुपये रोख, जांभळाएवढ्या शंभर मोत्यांची माळ व इतर ऐवज सरकारांत आल्यावर मग काय तें बोलूं" असें ते स्पष्टच म्हणाले. त्यामुळें तें प्रकरण तसेंच राहून इतर समारंभ घडून गेला.

दौलतराव शिंदे जिवबादादांना वडिलांप्रमाणें पूज्य मानीत. दादांनींच त्यांना राज्यकार-भाराचें ज्ञान करून दिलें आणि राजकारणी हालचालीची अंतस्थ माहिती करून दिली.

सन १७९५ च्या फेब्रुवारींत जिवबादादा पुण्यास आले त्यावेळीं त्यांनी श्रीमंतांची भेट घेऊन दौलतरावांना अधिकारवस्त्रें देण्याबद्दलची पुन: गोष्ट काढली.

"माळव्यासारखा मोठा प्रांत मिळाला तरी शिंद्यांकडून आमच्या तिजोरींत कांहीं पडत नाहीं! नजराण्याच्या रूपानें तरी कांहीं यावें म्हणजे पुढील व्यवस्था करूं," श्रीमंत म्हणाले.

"हल्ली निजाम अल्लिखान याच्यावर स्वारी करण्याचा सरकारचा विचार आहे, तेव्हां तीच जबाबदारी मी स्वीकारून सरकारचें हें काम फत्ते करून देतों," जिवबादादा म्हणाले.

निजामावरील स्वारीची गोष्ट दरबारला विचारार्ह होती त्यामुळें श्रीमंत सवाईमाधवराव पेशव्यांना ती पसंत पडली आणि नजराण्याची गोष्ट रहित होऊन पेशव्यांनी दौलतरावांच्या नांवाचा शिक्का, कट्यार, वस्त्रें इ. अधिकारचिन्हें जिवबादादांच्या स्वाधीन केलीं. दादा लगेच पुण्याहून निघाले आणि ग्वाल्हेरीस येऊन दि. १५-२-१७९५ रोजीं दरबार भरवून दौलत-रावांना तीं अधिकारवस्त्रें अर्पण केलीं.

निजामावरील स्वारीचें सेनाधिपत्य केरकरां-शिवाय दुसऱ्या एखाद्या सरदारानें स्वीकारावें अशी नाना फडणीसांची इच्छा होती. तथापि दरबार भरून स्वारीचा विडा उचलण्याचा प्रसंग आला त्यावेळीं कोणीच पुढें येईना! नाना फडणीसांनी पुन: एकदां इतर सरदारांकडे दृष्टि फिरवली आणि नंतर जिवबादादांकडे पाहून ते म्हणाले—"कशी काय आपली इच्छा?"

"पेशवे-दरबारचे सर्व सरदार येथें हजर आहेत; तथापि कोणाचीच बोलण्याची इच्छा नाहीं! तेव्हां त्यांचें सैन्य शोभेसाठीं असूं द्या. आम्हीं घेतों निजामवरील स्वारीची जबाबदारी" असें म्हणून जिवबादादांनी सोन्याच्या तबकांतील पांच विडे उचलून दौलतराव शिंद्यांकडे दिले. (जि. के. च.)

श्रीमंतांनी उत्साहपूर्ण भाषण करून जिवबा-दादांचा गौरव केला आणि लढाईत यश इच्छून त्यांना शेलापागोटें व शिरपेंच-कंठी दिली. (खर्ड्याचे स्वारीची बखर पृ. १०)

या लढाईत जिवबादादा केरकर यांच्या सैन्यांतील तीस हजार घोडेस्वार, बारा हजार पायदळ, शंभर तोफा व दहा हजार पेंढारी आणि पेशवे-सरकारच्या सैन्यांतील ५५ हजार स्वार, २६ हजार पायदळ व ९२ तोफा, एकूण ८५ हजार घोडेस्वार, ३८ हजार पायदळ, १९२ तोफा व १० हजार पेंढारी अशी फौज होती.

जिवबादादांच्या सैन्यांत नेमप्रवीण सैनिक बरेच होते. त्यांत बंदुकीनें नेम मारण्यांत जिवबादादांचे चिरंजीव नारायणराव प्रमुख होते. नेमबाजीची त्यांची कुशलता और होती. त्याबद्दल प्रभाकर नावांचा कवि आपल्या एका काव्यांत म्हणतो— "निसंग नारायणराव बक्षी। हटकून मारी उडता पक्षी॥" नारायणराव या लढाईत तोफखान्याचे प्रमुख होते. त्यांनी शत्रुपक्षावर अग्निगोलकांची अखंड वृष्टि केली. या घनघोर लढाईत दादांच्या सैन्यानें निजामाचा पुरा मोड करून त्यांचा तोफखानाहि पकडून आणला.

ब. व. जिवबादादा केरकर — २

शौर्यशाली जिवबादादा केरकर यांच्या सैन्याची रचना व शिस्त, शत्रुपक्षाकडील वित्तंबातम्या हेरगिरीनें काढून घेण्याची कुशलता, मोक्याच्या जागा व मर्में हेरण्याचें चातुर्य, निर्भयता, प्रसंगावधान, आत्मविश्वास इ. दादांचे गुण पाहून निजाम फार आश्चर्यचकित झाला.

निजामावरील लढाईत विजय मिळवून जिवबादादा पुण्यास आले व श्रीमंत पेशवे यांना भेटले. त्यावेळीं श्रीमंत आपल्या आसनावरून उठून दादांना मिठी मारीत म्हणाले—"वा! जिवबादादा, पेशवाईचा डोलारा शिंद्यांच्या जोरावर उभा असून आपणासारखे सर्वगुणसंपन्न पराक्रमी सेनापति त्याचे आधारस्तंभ आहेत."

श्रीमंतांनी दरबार भरवून जिवबादादांचा फार मोठा गौरव केला आणि दरबारी सन्मानानें सुवर्णाच्या रत्नखचित मुठीची श्रेष्ठ प्रतीची तरवार व बहुमोल आंगठी त्यांना बहाल केली. या आंगठींतील अस्मानी हिऱ्याची किंमत बरीच मोठी होती.

सबंध हिंदुस्थानावर ज्या सैन्याचा मोठा दरारा होता त्या तरवारबहाद्दर जिवबादादांच्या सैन्यांत युद्धकलेंत निष्णात असे एक लक्ष घोडेस्वार होते. तसेंच ५० हजार पायदळ, ५०० तोफा, २०० मोठाल्या तोफा, १० हजार खास स्वार (राखीव सैन्याचे), ६० हजार पेंढारी, १५ हजार राजांकडील खास फौज, ३ हजार जनानखान्याकडील सैन्य, ४०० हत्ती, ४०० लष्करी रथ, ३०० सांडणीस्वार, ११ हजार उंट (ओझे वाहणारे), १३ हजार बैल (तोफा ओढणारे) अशी व्यवस्था होती.

शिंदे-सरकारांत जिवबादादांचा अधिकार मुख्य सेनापति हाच केवळ नव्हे; तर मुख्य प्रधान आणि राजांच्या गैरहजरींत त्यांचें काम करणारे त्यांचे श्रेष्ठ प्रतिनिधि असाहि होता. त्यांच्या कारकिर्दींत शिंदे-दरबारांत बाळोबा तात्या पागनीस, राघोराम पागे, सदाशिव मल्हार, लखबादादा लाड, शिवबानाना, जगोबा बापू, यशवंतराव वागळे, धोंडबा पागनीस, भिवराव मोदी, गोपाळराव चिटणीस, साबाजीराव मोदी, बाळाभाऊ बक्षी, नारायणराव बक्षी, भाऊ फडणीस, बाजीबा मोदी, रामजी पाटील इ. १६ मुत्सद्दी सरदार आणि २६० लष्करी सरदार होते.

प्रत्येक लढाई जिंकून मुलूख आणि द्रव्य यांनी शिंद्यांचें राज्य दादांनी संपन्न बनविलें. हा शिंदेसरकारचा वाढता उत्कर्ष आसपासच्या राजांना रुचत नव्हता. प्रत्यक्ष पेशवेसरकारचे अधिकारी नाना फडणीस यांनाहि तो तितका आवडत नव्हता.

श्रीमंत सवाई माधवराव वयांत येऊन चार वर्षें होऊन गेलीं होतीं. प्रत्येक वेळीं दरबारांत शिंदेसरकारची गोष्ट निघाली म्हणजे श्रीमंत शिंद्यांच्या लष्करी सामर्थ्याची व जिवबादादांच्या शौर्याची तारीफ करीत. पण ती गोष्ट नाना फडणीस यांना रुचत नव्हती. श्रीमंतांच्या अल्पवयांत नानांनी आपल्या मताप्रमाणें राजकारणांत हालचाल केली; पण आतां श्रीमंत वयांत येऊन स्वतंत्रपणें विचार करीत असल्यानें दर वेळीं त्यांच्या मतांत नानांची आडकाठी येऊं लागली! प्रत्येक वेळीं या ना त्या अशा

अनेक गोष्टींबद्दल राजकारणांत मतभिन्नता येत चालली! हितशत्रु बाजीराव यांकडील श्रीमंतांची मैत्रीहि नानांना पसंत नव्हती. त्यावेळीं बाजीराव जुन्नरच्या किल्ल्यांत कैद होते. आपला हितशत्रु असें जाणत असतांहि श्रीमंतांना त्यांचा फार कळवळा येत होता. अशा अनेक गोष्टींबद्दलची नानांची कुरकुर असह्य होऊन श्रीमंतांचें मन उदास होत चाललें आणि अशाच कांहीं कारणानें एके दिवशीं त्यांचें मन इतकें भडकलें कीं, विचारशक्ति नष्ट होऊन त्यांना जिवाचाहि कंटाळा आला. श्रीमंतांनी त्या दिवशीं जास्त विचार न करतां शनिवारवाड्याच्या तिसऱ्या मजल्यावरून खालीं उडी टाकून आपलें जीवन संपवलें! सन १७९५ च्या ऑक्टोबर महिन्याच्या २८ तारखेचा तो दिवस होता.

मृत्यूच्या दोन तीन दिवस पूर्वी सहज बोलतांना 'प्रसंगीं आमच्याच वंशांतील पुरुष या गादीवर बसवावा' अशी इच्छा श्रीमंतांनी जिवबादादांकडे प्रगट करून त्याबद्दलचें त्यांकडून वचनहि घेतलें होतें. तथापि त्यावेळीं दादांनाहि ते आत्मघात करून घेतील याचा मुळींच संशय आला नाहीं; त्यांच्या मृत्यूनें पेशवाईस जितका धक्का बसला, त्याहिपेक्षां जास्त धक्का जिवबादादांच्या अंतःकरणास बसला. आपले राजे दौलतराव शिंदे यांच्याइतकेच दादांना श्रीमंत सवाई माधवरावहि अत्यंत प्रिय होते.

श्रीमंतांच्या निधनाची बातमी ऐकून एक मित्र गेल्याबद्दल बाजीरावांस जरा वाईट वाटलें; पण गादीच्या आशेनें त्यांना दुसऱ्या बाजूनें आनंदहि झाला! ते कैदेंतून पत्रद्वारें हालचाल करूं लागले.

नारायणराव यांना मारविणाऱ्या राघोबादादांचा चिरंजीव म्हणून बाजीरावांस पेशवेपद देणें नाना फडणीस यांना रुचत नव्हतें. घडलेल्या प्रकारामुळें झालेल्या खिन्नतेंत भावी पेशवेपदाबद्दलच्या काळजीची भर पडल्यानें नानाहि फार अस्वस्थ झाले होते. त्यांनी दुसरा कोणी तरी दत्तक शोधण्याचा प्रयत्न चालविला होता.

अशा या हालचाली चालू असतांनाच कांहीं कामासाठीं जिवबादादांना जांबगांव येथें जावें लागलें व तेथेंच ते अकस्मात् आजारी पडले. त्यांना ताप येऊं लागला. मोठमोठे अनेक वैद्य आणले, औषधोपचार फार केला, पण गुण पडेना. ताप हटत नाहीं व प्रकृति खालावत चालली हें ऐकून दौलतराव शिंदे घाईघाईनें आले. त्यांच्यासह सर्वांनाच दादांची काळजी वाटूं लागली. दौलतरावांनीहि आपल्या परीनें अनेक वैद्य आणून फार परिश्रम केले, पण ते व्यर्थच झाले. अशा वेळीं दादांनी दौलतरावांना म्हटलें—"माझा शब्द श्रीमंत सवाई माधवरावांकडे गुंतला आहे हें लक्षांत ठेवून त्यांच्या वंशांतील बाजीरावास गादीवर बसविण्याची तजवीज ठेवा. घडून गेलें तें गेलें. आतां बाहेरचा दत्तक आणण्यापेक्षां हाच वंशांतील घेणें इष्ट आहे." दौलतरावांनीहि 'होय' म्हटलें.

दादांचे ज्येष्ठ चिरंजीव नारायणराव यांना जवळ बोलावून दादा म्हणाले—"नारायण, मी आजवर शिंदेसरकारची एकनिष्ठपणें सेवा केली तशीच तुम्हीं करा. सरकारच्या कल्याणाखेरीज दुसरा विचार मनांत आणला नाहीं. राजकारण फार कठिण, कोणत्या वेळीं कसा प्रसंग येईल याचा नेम नसतो. तरी तुम्हींहि तसेंच वागून यश मिळवा."

जिवबादादा दौलतराव शिंद्यांकडे पाहून म्हणाले —"सरकार, राजकारणी प्रसंगांची सरकारस्वारींना जाणीव आहेच; फार सावधगिरीनें वागा. मी चाललों आतां!" बोलतां बोलतां दादांना थकवा आला.

दौलतराव शिंदे, जिवबादादांचे चिरंजीव, आप्तेष्ट आणि सारे स्नेहीसोबती सजल नेत्रांनी दादांकडे पाहात होते. हजारों लोक त्यांच्या समाचारास येत-जात होते. तेथील सारें वातावरण गंभीर झालें होतें.

आपलें अवतारकार्य आतां संपलें. देशासाठीं आपण जी तरवार हातीं घेतली तिनें अखेरपर्यंत आपल्याला यश मिळवून दिलें. आपली पवित्र सेवा मराठेशाहीस रुजू झाली; महाराष्ट्र-साम्राज्य-संस्थापक श्रीशिवाजी महाराज यांच्या पवित्र स्मृतीस सादर झाली; जणू अशाच पवित्र समजानें दादांची वृत्ति अशा गंभीर प्रसंगीं देखील शांत होती. त्यांनी किंचित् विसावा घेतला व इतस्ततः पाहात ओझरतें स्मित केलें आणि दृष्टि आकाशाकडे लावून 'मांगिरीष-मांगिरीष' म्हणत अखेरचा श्वास सोडला. अशा रीतीनें ता. ६ जानेवारी सन १७९६ रोजीं जांबगांव येथें जिवबादादांनी देह ठेवला.

त्यावेळीं लखबादादा लाड जोधपूर येथें होते. त्यांचा आणि दादांचा दाट स्नेह होता. ही दादांच्या मृत्यूची बातमी त्यांना कळतांच त्यांनी आकांत केला.

साध्या शिपायापासून राजापर्यंत सर्वांना जिवबादादा सारखेच प्रिय होते; त्यामुळें त्यांच्या मृत्यूनें सगळ्यांनाच दुःख झालें.

दादांना थोरांबद्दल आदर, गरीबांबद्दल कळवळा व अनाथांविषयीं फार दया होती.

छत्रपति श्रीशिवाजी महाराजांमागें मराठेशाहींत माधवराव शिंदे हेच मोठे नामांकित राजे होऊन गेले. उत्तर दिग्विजय आणि निजाम वगैरेकडील इतर लढाया यांमुळें त्यांचा विशेष उत्कर्ष झाला व त्यांच्या एकंदर उत्कर्षास बक्षीबहाद्दर जिवबादादा केरकर हेच मुख्य कारण झाले.

सन १७६१ पासून १७९६ पर्यंतच्या कालांत मराठेशाहींत जिवबादादांचीच विजयी तरवार विशेष वावरत होती. पेशव्यांचें प्रत्येक महत्त्वाचें काम जिवबादादा आल्यावांचून पुरें झालें नाहीं. मराठी साम्राज्याच्या उत्कर्षास दादांचें शौर्य फार उपयोगी झालें. दादांनी एकंदर १७५ लढाया मारल्या. सर्व लढायांत त्यांची यशस्वी तरवार बिजलीसारखी चमकत होती व शत्रूंना ती चवताळलेल्या नागिणीसारखी भासत होती.

निरनिराळ्या ठिकाणीं मिळून दादांच्या एकंदर ३० जहागिरी, ४ शेतजमिनी व २३ वाडे होते. याशिवाय इनाम जमिनी होत्या. केरी येथील इनाम जमीन त्यांना वाडकरांकडून मिळाली होती. ती अजून त्यांच्या वंशजांकडे आहे.

दादांनी धर्मकृत्यें व दानधर्महि फार केला. मथुरा येथें श्रीगोपालकृष्णाचें देऊळ बांधून त्याच्या खर्चासाठीं त्यांनी एक गांवच इनाम करून दिलें. गंगाकांठीं रामघाटावर मंदिर

बांधून त्या मंदिरासहि एक गांव इनाम दिलें. पुष्करतीर्थ, हरिद्वार, पंढरपूर इ. ठिकाणीं धर्मशाळा बांधल्या. त्याचप्रमाणें ब्रह्मावर्त येथें श्रीरामकृष्ण-मंदिर व जावद येथें श्रीलक्ष्मी-नारायण-मंदिर अशीं मंदिरें बांधलीं. आरवंदें, हरमल, केरी, सावंतवाडी, रेडी अशा ठिकाणीं देवालयें बांधलीं. सांखळी-मठाची धर्मशाळाहि त्यांनीच बांधली होती. कित्येक ठिकाणीं गरीबांसाठीं त्यांनी छात्रालयेंहि चालू ठेवलीं. अशा रीतीनें जिवबादादांनी राजकारणांत व लढायांत जसें यश मिळविलें तसाच दानधर्मांतहि फार मोठा लौकिक मिळवून इहलोक सोडला.

दादांच्या मृत्यूनंतर त्यांनी सवाई माधबरावांस वचन दिल्याप्रमाणें दौलतरावांदि सरदारांनी पुढें आणलेले अनेक अडथळे दूर करून बाजीरावांना जुन्नर येथून आणून पेशवेपदावर बसविण्याची परिस्थिति निर्माण केली आणि नाना फडणीसांनीं ता. २७ डिसेंबर १७९६ रोजीं जाहीर रीतीनें त्यांना गादीवर बसवलें.

बाजीरावाचें मत पूर्वींपासूनच नानांबद्दल ठीक नसल्यानें त्यांनीं त्यांना मध्यंतरीं पदच्युतहि केलें; पण कांहीं कालानें दौलतरावांकडे संधान बांधून नाना पुनः कारभारी झाले. आपलें आसन पुनः स्थिर झाल्यानें नानांनी दौलतरावाचे कान भरून शिंद्यांकडील राजकारणी लोकांवर सूड उगविला. या लोकांमुळेंच पूर्वीं शिंदेशाहीचा उत्कर्ष होत जाऊन नानांचें शहाणपण तेथें चालत नव्हतें. पण त्या गोष्टीचें दौलतरावांनाहि विस्मरण झालें. बहुतेक राजकारणी लोक त्रासांस कंटाळून शिंदेशाहीस रामराम ठोकून निघून गेले. वैद्य, पोतनीस, नावर वगैरे गायकवाडांकडे; तर कोठारी, लाड, वागळे, दळवी हे होळकरांकडे आणि कित्येक रतलाम, जोधपूर इ. राजांकडे गेले. फक्त जिवबादादांची मंडळी तेवढी राहिली.

लवकरच वस्तुस्थिति लक्षांत येऊन दौलत-रावांना पश्चात्ताप झाला व पूर्ववत् स्थिरस्थावर झालें.

जिवबादादांना नारायणराव व यशवंतराव असे दोन मुलगे होते. दादांच्या मागें नारायणराव शिंदे दरबारचे मुख्य सरदार व मुख्य सेनापति झाले. हे शूर व नेमबाजींत प्रवीण होते. यांना कृष्णराव व घनःश्यामराव असे दोन मुलगे झाले. त्यांना दरबारांतून नेमणुका होत्या. कृष्णराव निपुत्रिक वारले. दुसऱ्यांनी दत्तक घेतलेल्या नारायणराव यांच्या जिवाजीराव या मुलास मासिक ६० रु. ची नेमणूक होती. यांचा आतां कोणीच वंशज नाहीं.

यशवंतराव हे अजमीरचे सुभेदार होते. यांचे चिरंजीव जिवाजीराव यांना १२०० रुपयांची नेमणूक होती. हे १२ जून १८९८ रोजीं वारले. हेच शिंदेशाहींतील जिवबादादांचे अखेरचे वंशज होते.

पेडणें महालांतील केरी येथें जिवबादादांच्या इनाम जमिनींत त्यांचा मूळचा वाडा असून त्यांत त्यांचे इकडील वंशज राहातात. त्यांना 'राव केरकर' असें उपनांव आहे.

दादांना आपल्या जन्मभूमीचा फार अभिमान होता. गोमंतकाच्या हिताची कोणतीहि गोष्ट करण्यास त्यांनी कधीं आळस केला नाहीं. अनेक बुद्धिमान व पराक्रमी गोमंतकीयांना त्यांनी ग्वाल्हेरास नेऊन वैभवास चढविलें. गोमंतकाबद्दल अशी तळमळ असलेल्या या थोर पुरुषाची स्मृति कायम राहाण्यासाठीं योग्य स्मारकाची फार आवश्यकता आहे.

— २१ —

समशेरजंगबहाद्दर लखबादादा लाड

शिंदेशाहींतील एक महान् मुत्सद्दी व तरवार-बहाद्दर लक्ष्मण अनंत ऊर्फ लखबादादा लाड हे आपल्या गोमंतकाचेच सुपुत्र होय. पेडणें महालांतील पार्से या गांवचे गणेश शेणवीं लाड पार्सेकर ऊर्फ गणा शेणवीं लाड हे लाड घराण्याचे मूळ पुरुष होत. पांडुरंग गणेश लाड हे त्यांचे दत्तक पुत्र. बाळकृष्ण व रघुनाथ असे त्यांचे दोन मुलगे होते. बाळकृष्ण हा वागाळीच्या लाड घराण्याचा मूळ पुरुष होय. रघुनाथ शेणवीं लाड यांच्या येथें सदाशिव, कृष्णाजी, अनंत व मुकुंद असे चार मुलगे झाले. हे आरोबा व चिखली येथें स्थायिक झाले. आरोबा घराण्याचे अनंत रघुनाथ शेणवीं लाड हेच लक्ष्मणराव ऊर्फ लखबादादा यांचे वडील होत.

अनंत शेणवीं लाड हे देवभक्त होते. त्या कालांत रात्र पडतांच समईच्या शांत प्रकाशांत बहुतेक घराण्यांतील पद्धतीप्रमाणें लाडांच्या येथेंहि पोथीवाचनाचा कार्यक्रम असे. रामायण, महाभारतकालांतील निरनिराळ्या गोष्टी पोथी-वाचनप्रसंगीं सुबोध भाषेंत ऐकायला मिळत असल्यानें त्या ऐकण्यासाठीं लखबा तेथें अगत्य-पूर्वक बसत असे. त्यांतील शौर्याच्या व मुत्सद्दीपणाच्या गोष्टी लखबांच्या मनावर फार परिणाम करीत.

मातृभाषेच्या अध्ययनानंतर एका शास्त्र्याकडून लखबांना संस्कृतचेंहि शिक्षण मिळालें होतें. त्यामुळें हिंदुधर्मशास्त्राच्या मूळ गाभ्याचाहि परिचय होऊन सर्वश्रेष्ठ हिंदुधर्माबद्दल जो असामान्य आदर व अलौकिक निष्ठा त्यांच्यांत उत्पन्न झाली होती ती त्यांच्या सबंध हयातींत कायम होती.

लखबादादांचा उत्साह लहानपणापासूनच अद्वितीय होता. तो त्यांना घरांत, गांवांत किंवा गोमंतकांत राहून समाधान देणारा नव्हता; तर गोव्याबाहेरील अमर्याद क्षेत्रांत जाऊन कोणतें तरी महत्कृत्य करावें या गोष्टीकडे आकर्षित होता. लहान वयाचा काल जाऊन आतां त्यांनी प्रौढावस्थेंत प्रवेश केला होता.

बऱ्याच विचारानंतर हिंदुस्थानांत जावें असें ठरवून एका शुभ दिनीं त्यांनी तिकडे जाण्याचें प्रस्थान ठेवलें आणि ते हिंदुस्थानांत जाण्यास निघाले.

आपल्यापैकीं बरीच मंडळी शिंदेशाहींत मोठ-मोठ्या हुद्यांवर असल्याची त्यांना माहिती होती. त्यामुळें त्यांनी आपला मोर्चा तिकडेच वळविला आणि थोडक्याच दिवसांत ग्वाल्हेर गांठलें. तेथें दोन दिवस मुक्काम करून तेथून ते सरळ उज्जैन येथें जाऊन शिंदे सरकारचे एक सरदार बाळोबा तात्या पागनीस यांकडे कारकुनीच्या कामावर राहिले.

लखबादादांची कार्यकुशलता पाहून पागनीस त्यांच्यावर फार खुष झाले. कांहीं दिवसांनंतर सरदार पागनीस यांची दरबारच्या कारभारी मंडळांत निवड झाल्यामुळें त्यांना त्या कामावर जावें लागलें. अर्थात् पागनिशीच्या कामावर

दुसऱ्या कोणाला तरी नेमण्याची आवश्यकता भासूं लागली. त्यांनी दरबारकडे आपले हुशार कारकून लखबादादा लाड यांची शिफारस केली आणि दरबारनें लगेच खातें लाडांच्या हवालीं केलें.

शिंद्यांच्या निरनिराळ्या बावन्न पागा होत्या. या खात्यांत लाडांनी इतकी महत्त्वाची कामगिरी बजावली कीं, त्यामुळें दरबारचें लक्ष त्यांकडे बरेंच वेधलें गेलें. कारकुनीच्या कामावर असतांना त्यांनी जें युद्धकलेचें शिक्षण घेतलें त्याचा उपयोग त्यांना पागनिसीच्या कामावर फार झाला. युद्धांतील त्यांची हुशारी व कुशलता पाहून शिंदे सरकारचे सरसेनापति बक्षीबहाद्दर जिवबादादा केरकर यांनी त्यांची फार तारीफ केली. आणि सरसेनापतींच्या शिफारशीनें शिंदे सरकारनें लवकरच लाड यांना सरदारकीचीं वस्त्रें बहाल करून आपल्या तोफखान्याचे सेनापति नेमलें. सेनापति लखबादादा यांच्या कारकीर्दींत शिंद्यांच्या तोफखान्याचा दरारा दिल्लीपति मोंगल बादशहा-पर्यंत फार मोठा होता.

सन १७८४ सालाच्या अखेरीस दिल्ली सरकारचा सारा कारभार शिंदे दरबारकडे आला. त्यावेळीं आग्रा सुभ्याचा सुभेदार म्हणून शिंदे दरबारनें सरदार लखबादादांची नेमणूक केली. ही आग्र्याची सुभेदारी दादांनी मोठ्या शौर्यानें व मुत्सद्दीपणानें चालविली.

इस्माईल बेग व त्याचा जोडीदार अशा दोघां मुसलमान सरदारांनी कांहीं बादशाही फौजेनिशीं आग्र्याच्या किल्ल्यास वेढा दिला. सुभेदार लखबादादा किल्ल्यांतच होते. त्यांना आंत राहूनच किल्ला लढवावा लागला.

आग्रा किल्ल्याचा तट मजबूत व अभेद्य होता. सभोंवतीं मोठा खंदक असून त्यांत यमुनेचें पाणी तुडुंब भरलेलें होतें. महादरवा-ज्यांत फळ्यांवरून जावें लागे. फळ्या काढल्या कीं यत्न नाहीं. किल्ल्यास पांच परीघ असून दर परिघास दोनशें तोफा व इतर ठिकाणच्या मिळून सभोंवार बाराशें तोफा मांडलेल्या होत्या. हा भुईकोट किल्ला मजबुतींत पहिला होता. किल्ल्यांतून शत्रूवर व्यवस्थित मारा चालत होता. पण शत्रूहि बाहेरून न हटतां सारखा मारा करीत होता. अशा स्थितींत मोठ्या शौर्यानें सरदार लखबादादा यांनी तब्बल नऊ महिनेपर्यंत किल्ला लढवला.

अखेरच्या दिवसांत दाणागोटा संपल्यामुळें निर्माण झालेली किल्ल्यांतील सैन्याची चुळबूळ थोपवून धरून व मोठ्या कौशल्यानें त्यांना धीर देऊन शत्रुसैन्यास जेरीस आणण्याचे त्यांनी केलेले प्रयत्न तारीफ करण्यासारखेच होते.

त्यावेळीं शिंदे सरकारचे सरसेनापति जिवबा-दादा केरकर शिखांकडील लढाईत गुंतले होते. त्यांचा बंदोबस्त करून परत येतांच त्यांना आग्र्याच्या वेढ्याची बातमी मिळाली. त्यांनी पुढें सरदार जगोबा बापू यांना पाठवून मागोमाग आपण निघाले. हें सैन्य आग्र्यास आलें तेव्हां किल्ल्यांतील सैन्यालाहि बराच जोर चढला. आंतून निकराचा मारा आणि बाहेरून नव्या सैन्याचा हल्ला अशा माऱ्यांत बरेंच शत्रुसैन्य कामीं आलें. परिस्थिति पाहून राहिलेल्या लोकांनी पोबारा केला. तथापि पळतां पळतां बेग यास लखबादादांनी कैद केलें.

मोठ्या कठिण परिस्थितींत नऊ महिन्याइतक्या

दीर्घ कालापर्यंत शौर्यानें किल्ला लढविल्याबद्दल शिंदे सरकारनें लखबादादांचा मोठा गौरव केला व आग्र्याच्या सुभ्यावरच त्यांना कायम केलें.

दिल्लीपति मोंगल बादशहा शहाअलम यांनी आपला खास दरबार भरवला आणि त्या दरबारांत भरजरी पोषाख, तरवार व ' समशेरजंग-बहाद्दर ' हा किताब देऊन सुभेदार लखबादादा यांचा जाहीर गौरव केला.

पुढें कांहीं कालानें बरेच रजपूत वीर एकत्र होऊन शिंद्यांच्या मुलखावर चालून आले. त्यावेळीं समशेरजंगबहाद्दर लखबादादा लाड यांनी त्यांच्याशीं जोराचा सामना दिला. या लढाईंत लखबादादा बरेच थकले; तथापि मुळींच हटले नाहींत. त्यांनी रजपुत सैन्यास मार देत पुढें रेटलें. इतक्यांत जगोबा बापू व इतर सरदार ससैन्य मागोमाग आल्यानें रजपुतांनी पोबारा केला.

सदर प्रसंगीं जयपूर नरेशांकडून लखबादादांनी तीन कोट रुपये रोख, तीनशें तोफा, दीडशें हत्ती अशी देणगी घेऊन त्यांच्या मुलखावर त्यांनी शिंद्यांची अधिसत्ता बसवली.

राजपुतान्यांतील मुलुख शिंद्यांकडे आल्यावर मेवाड प्रांताचे सरसुभेदार म्हणून शिंदे सरकारनें सरदार लखबादादा यांची तेथें नेमणूक केली. सरसुभेदारास आजच्या गव्हर्नर जनरलासारखे अधिकार असत. मेवाड प्रांताची ही सरसुभे-दारीहि लखबादादांनी मोठ्या कौशल्यानें चालवून शिंदे सरकारची शाबासकी मिळविली.

सरदार लखबादादा व पोर्तुगीज सरकार यांच्यांत बराच स्नेह असल्यानें सदर नेमणुकी-बद्दल गोवा सरकारनें त्यांचें अभिनंदन करून पुढील पत्र पाठविलें —

Ao muito estimavel e honrado Lacximana Rao Ananta Lada, cuja amizade seja perpetua.

Estimei ter esta ocazião de significar a V. M. o meo contentamento, pela participação que tive de ser V. M. encarregado pelo seu amo do distincto lugar de Sar Subá de Mevad no Indostão, pois segundo as noticias que dahi vierão as acçoens que V. M. tem obrado o fazem digno da elevação em que se acha, e estimarei que sempre dê provas de vassalo fiel ao Magestozo Estado, pois a sua familia recebe aqui todo o favor e honra, como lhe terá comunicado o seu irmão o honrado Deugi Mocundo. Permita-me V. M. muitas ocazioens do seo agrado. Deos alumie a V. M. na sua Divina Graça. Goa a 10 de Outubro de 1799.

Joze Caetano Pacheco Tavares
(Secretario do Estado)

अनेक प्रकारच्या लढाया आणि राजकारणें करतां करतां सरसुभेदार लखबादादा बरेच थकून गेले. पुढें सालेंबर येथें त्यांना ताप येऊं लागला. अनेक मोठ मोठ्या वैद्यांचे औषधोपचार केले,

पण गुण न मिळतां २७ जानेवारी १८०३ माघ शु. ५ मीच्या दिवशीं कुलदेव श्रीमंगेशाचें स्मरण करीत त्यांनी देह ठेवला. त्यांच्या शौर्याची आणि मुत्सद्दीपणाची ग्वाही हिंदुस्थानचा इतिहास देतच आहे. त्यांनी दानधर्महि फार केला. गोमंतक आणि गोमंतकीय यांच्याबद्दलचा त्यांचा आदर कधींच कमी झाला नाहीं.

त्यांच्या मृत्यूची दुःखकारक बातमी कळतांच राजे दौलतराव शिंदे यांना अत्यंत खेद झाला. समशेरजंगबहाद्दर लखबादादा यांच्या मृत्यूमुळें ग्वाल्हेर दरबारचा त्याच्या शत्रूंवरील वचक बराच उतरला. इंग्रजांनी तर दिल्ली इ. ठिकाणीं लढाई देऊन शिंद्यांचा पराभव केला. पुढील तहांत भागीरथी व यमुना यांच्या मधला मुलूख व भडोच प्रांत इंग्रजांस, नगर प्रांत पेशव्यांस व अंजिठ्यापासून गोदावरीपर्यंतचा मुलूख निजामास दिल्यामुळें शिंद्यांचा बराच मुलूख गेला. हा तह १३ डिसेंबर १८०३ रोजीं झाला. या लढाईच्या व तहाच्या वेळीं लखबादादांची आठवण होऊन दौलतराव शिंदे फार दुःखी झाले, त्यांचे डोळे भरून आले. लखबादादांची पात्रताच तशी होती.

सुप्रसिद्ध इ. सं. सर जदुनाथ सरकार आपल्या Fall of the Mughal Empire (Vol. IV P. 146) या पुस्तकांत लिहितात —

Lakshman Anant Lad, popularly called Lakhba Dada, was an officer of outstanding ability and character. During the eclipse of Mahadji Sindhia after Lalsot, he had defended Agra fort against the combined forces of Gulam Kadir and Ismail Beg for nine months, with matchless courage, tenacity and alertness. Later he has distinguished himself in some other campaigns. His political sagacity equalled his generalship ...... The British Resident, Colonel Palmer, "lamented the fall of Lakhba Dada (in Nov. 1796) on account of his personal character, which for mildness and moderation exceeds that of any Maratha I know."

लखबादादांना औरस पुत्र नसल्यानें त्यांनी दत्तक घेतला. त्याचें नांव अनंत लक्ष्मण असें होतें. त्यांच्या मुलाचें नांव लक्ष्मण अनंत. यांना पांडुरंग व सदाशिव असे दोन मुलगे झाले. सदाशिव लक्ष्मण यांचे मुलगे चार. त्यांचीं नांवे मुकुंद सदाशिव, रामचंद्र सदाशिव, वासुदेव सदाशिव व लक्ष्मण सदाशिव लाड अशीं आहेत. लक्ष्मण सदाशिव लाड यांनाच लखबादादांचें 'लक्ष्मण' हें नांव मिळालें असून देवधर्म, विद्वत्ता, बुद्धिचातुर्य, सज्जनता, औदार्य असे सरदार लखबादादांचे कांहीं गुण यांच्यांतहि दिसत आहेत. यांचें वास्तव्य म्हापसें येथें आहे.

ग्वाल्हेर दरबारांतून व मोंगल बादशहाकडून लखबादादांना कांहीं जहागिरीहि मिळाल्या होत्या; पण त्यांच्या हयातीनंतर त्यांचें काय झालें कळत नाहीं.

— २२ —

बहुगुण कामत वाघ

कामत वाघ घराण्याचे मूळ पुरुष अनंत कामत हे असून ते तिसवाडींतील पनवेल येथील रहिवासी होते. मूळच्या त्याच जागीं आजहि त्यांच्या वंशजांचें घर आहे. अनंत कामत यांचा मुलगा रामचंद्र कामत व त्यांच्या येथें झालेले अनंत कामत हेच बहुगुण कामत वाघ यांचे वडील होत.

बहुगुण अनंत कामत यांना त्या कालीं मोठे मुत्सद्दी मानण्यांत येत असे. सन १७१९ पासून १७५१ पर्यंतच्या बत्तीस वर्षांच्या कालांत ते गोवा सरकारच्या दुभाषाच्या अधिकारावर होते.

बहुगुण कामत वाघ यांच्या पूर्वी कित्येक हिंदु पोर्तुगीज सरकारचे दुभाषी होऊन गेले. सन १६१० ते १६२६ या कालांत आझू नाईक हे दुभाषी झाले. स. १६४६ ते १६५८ च्या कालांत कृष्ण शेणै, स. १६५९ ते १६८१ नारायण शेणै, सन १६६७ ते १७१४ विठोजी शेणवी भेंडे अशा लोकांनीं दुभाषाची जागा भूषविली.

त्या वेळीं दुभाषाला शेजारच्या राष्ट्रांकडील पत्रव्यवहाराचें भाषांतर करणें, त्यांच्या दरबारांत पोर्तुगीज सरकारतर्फे होणाऱ्या करारमदार किंवा वाटाघाटीच्या वेळीं हजर राहाणें, माहिती देणें-घेणें इ. बरींच महत्वाचीं कामें करावीं लागत. अनेक प्रसंगीं पोर्तुगीज सरकार व शेजारचे राजे यांमधील मध्यस्थीचें कामहि दुभाषाकडून करण्यांत येई आणि त्या वेळीं दुभाषाची कुशलताहि दिसून येई. ज्या दुभाषाच्या अंगीं विशेष मुत्सद्देगिरी असे त्याचा दरबारांत जास्त प्रकाश पडून बोलणीं किंवा वाटाघाटी यांत यश येण्यास विशेष अनुकूलता उत्पन्न होई.

बहुगुण कामत हे राजकारणांत कुशल असल्यानें त्यांनी सरकारदरबारांत बरीच मान्यता व प्रीति संपादन केली होती. व्हिसिरै ज्युआंव द सालदांज्य द गाम हे भोंसल्यांच्या पारिपत्यास गेल्या वेळीं हे त्यांच्यासोबत तिकडे गेले होते. त्या वेळीं त्यांनी जी महत्वाची कामगिरी तेथें बजावली तीबद्दल व्हिसिरै यांनी त्यांची फार प्रशंसा केली आहे.

मराठ्यांनी रायतुर किल्ल्यास वेढा दिला त्या वेळीं वाटाघाटीस जातांना कोंदि द सांदोमील या व्हिसिरैसोबत बहुगुण कामत वाघ हेहि होते.

मराठ्यांच्या स्वारीच्या वेळीं त्यांच्याशीं फिरंग्यांतर्फे वाटाघाटी करण्यास, व्यंकटी कामत, उपी कामत, बाबुली शेणै सुखठणकर, बाबुराव देसाई, सांतू शेणै डांगी, म्हाबळू पै गांटिये, नारायण प्रभु, बाळू शेणै, मिनू शेणै, विठोजी शेणै धुमे यांना बरोबर घेऊन बहुगुण कामत हे सन १७३९ सालीं राय येथें गेले होते (Portugueses e Maratas IV— डॉ. पिसुर्लेंकर).

मोंगलांच्या अमदानींत त्यांच्या फोंडें येथील गव्हर्नराकडे राजकारण करण्यासाठीं हिऱ्या प्रभु खोलकर यांना सोबतीला घेऊन बहुगुण कामत गेले होते. हिऱ्या प्रभु हे एक गोव्यांतील प्रसिद्ध व्यापारी होत. त्यांनी कर्नाटकांत एक मोठें देवालय बांधलें असून त्याच्या छप्परावर ताम्रपत्रा बसवला होता. सांखळी येथेंहि त्यांनी एक देवालय बांधलें, असा पोर्तुगीज कागदपत्रांत उल्लेख मिळतो.

भोंसले व पोर्तुगीज यांच्यांतील तहाच्या वाटाघाटीसाठीं व्हिसिरै कोंदि द सांदोमील यांनी बहुगुण कामत वाघ व विठोजी शेणवीं धुमे यांना पाठविलें होतें. या तहान्वयेंच भोंसले यांनी बार्देस प्रांत व पनेळें वेट पोर्तुगीजांकडे संपवलें.

बहुगुण कामत हे विद्वान्, मुत्सद्दी व स्वभावानें प्रेमळ होते. यांना पोर्तुगीजप्रमाणेंच मराठी व संस्कृत भाषांचेंहि चांगलें ज्ञान होतें.

— २३ —

अनंत कामत वाघ

बहुगुण कामत यांच्या मागें सन १७५२ ते सन १७९३ पर्यंत त्यांचे चिरंजीव अनंत कामत हे पोर्तुगीज दरबारच्या दुभाषाच्या जागीं मोठ्या हुशारीनें काम करीत होते.

हे उतार वयाचे असल्यानें त्यांना सहाय्यक म्हणून त्यांचे बंधु सदाशिव कामत यांची नेमणूक केली होती. त्यांचे दुसरे सहायक त्यांचे पुतणे बहुगुण कामत हे होत. तत्कालीन गव्हर्नर जनरल, सेक्रेतारियु दु इस्तादु यांना लिहितात कीं —" Posto que o dito Ananta Camotim Vaga em razão da sua muita idade não tenha exercitado muito frequentemente o mencionado emprego, consta-me que serviu bem, e seu sobrinho Boguna Camotim Vaga serve com dobrada actividade e zelo de Ajudante do Lingoa do Estado" (Agentes da D. Portuguesa, p. 80 — डॉ. पिसुर्लेंकर).

अनंत कामत वाघ हेहि चांगले मुत्सद्दी होते; तथापि इतर राजांकडील राजकारणांसाटीं त्यांकडे प्रत्यक्ष जाण्याचा प्रसंग वयपरत्वें त्यांच्यावर आला नसावा असें दिसतें.

— २४ —

सदाशिव कामत वाघ

हे बहुगुण कामत यांचे चिरंजीव व अनंत कामत यांचे बंधु होत. हे मोठे चतुर, मुत्सद्दी व राजकारणांत कुशल होते. हे सहायक-

-दुभाषाच्या अधिकारावर एकोणीस वर्षांपेक्षां जास्त काल होते. व्हिसिरै दों जुझे पेद्रु द काम्र त्यांच्याबद्दल कौतुकानें म्हणत — "Muito vivo e habil."

गोवा न सोडतां तिसवाडींतच मुक्काम करण्या-बद्दलच्या वाटाघाटीसाठीं फिरंगी सरकारनें त्यांना राजे सौंदेकर यांकडे पाठविलें होतें.

बेदनूर येथें हैदर अलीच्या दरबारांत पोर्तुगीजांचे वकील या नात्यानें त्यांनी मोठी महत्वाची कामगिरी बजावली आहे. त्या वेळीं त्यांना खर्च झालेल्या पंधरा हजार असर्फ्यांबद्दल सेक्रेतारियु दु इस्तादु यांची कुरकुर पुढें आली; तथापि गव्हर्नर जनरल दों ज्युआंव जुझे द मेलु यांनी आपल्या २३ फेब्रुवारी सन १७७२ च्या शेऱ्यांत ठीक खुलासा केला आहे. ते म्हणतात कीं — "A despeza dessa enviatura foi tão necessaria e tão indispensavel, como foi interessante a christandade que rezide nos Dominios e Terras de Aydar Alycan; á Fazenda Real do Estado; e a todos os seus habitadores...."

सदर कामगिरीबद्दल फिरंगी सरकारनें सदाशिव कामत वाघ यांना शिपाई-फौजेचे कॅप्टन नेमलें.

— २५ —

बहुगुण सदाशिव कामत वाघ

हे सन १७९४ पासून १८०७ पर्यंतच्या कालांत पोर्तुगीज सरकारचे दुभाषी होते. यांनी पोर्टुगिजांच्या वतीनें भोंसले व सौंदेकर राजे यांकडे अनेक राजकारणी खलबतें केलीं आहेत. हे विद्वान, बुद्धिमान व चतुर असल्यानें दरबारांत यांचा चांगला नांवलौकिक होता. यांनाच भार्गव कामत असेंहि म्हणत.

बक्षीबहाद्दर जिवबादादा केरकर व समशेरजंग-बहाद्दर लखबादादा लाड या शिंदे सरकारच्या प्रतापी सरदारांकडे यांचा फार मोठा राजकारणी पत्रव्यवहार पोर्तुगिजांसाठीं चालत होता. त्यासाठीं कित्येक प्रसंगीं देवजी मुकुंद लाड, साबाजी कृष्ण लाड, नरोबादादा केरकर यांतर्फेहि त्यांचीं खलबतें चालू होतीं. अशा रीतीनें राजकारणांत बहुगुण कामत यांचा फिरंगी दरबारला फार उपयोग झाला आहे.

बहुगुण कामत वाघ यांनी 'गोमंतकाची बखर' नांवाचें एक ऐतिहासिक माहितीचें पुस्तक लिहिलें होतें. त्यांतील कांहीं प्रकरणें फोंडें येथें गतकालीं प्रसिद्ध होणाऱ्या 'प्राचीप्रभा' या मासिकांतून प्रसिद्ध झालीं आहेत. (पहा-प्राचीप्रभा वर्ष १९१५)

प्रसिद्धि देतांना मासिककर्ते लिहितात — "पणजीनजीक पानवेली येथील दुभाषी यांचे घरीं एक बखर सांपडली. ती इतिहासाच्या दृष्टीनें महत्वाची असून, समग्र छापून निघणें आवश्यक आहे; परंतु ऐतिहासिक मराठी कागदपत्र छापण्याचे कामीं गोमंतकांत खासगी किंवा इतर व्यक्तींनी तसा प्रयत्न केल्याचें दिसत नसल्यामुळें या बखरीचा संक्षिप्त गोषवारा येथें दिला आहे."

" ही बखर इ. स. १८०१ मध्यें लिहिली आहे. हिचे अडतीस बंद आहेत. एका बंदांत सरासरी २८ ओळी असून प्रत्येक ओळींत २६ अक्षरें आहेत. बंदाची लांबी एक हात व रुंदी वीतभर आहे. कागद पुर्तकाली, जाड असून अक्षर मोडी वळणदार आहे. हिचा प्रारंभ असा आहे—

गोमांतकाची बखर

अनंत विजयते

॥ श्रीभगवती ॥ ॥ दुर्मती संवत्सर ॥

स्वस्ति श्रीनृप शालिवाहान शके १७२३ वेशाख शु॥ ३ गुरुवार ता॥ १६ माहे आब्रिल सन फिरंग १८०१ छ २ जिलकाद सु॥ इहदे सितैन अलफ द्वीप गोपकपूर तिसवाडा जंजिरे गोवा शाहारजागा मौजे पानवेली वैकुंठवासी बहुगुण अनंत कामत वाग दुभाषा सरकार मजकूर यांचे वाडियांत बखेर लेखन सुरू."

(पुढें मजकूर सुरू)

— २६ —

सखाराम नारायण कामत वाघ

बहुगुण अनंत कामत वाघ यांचे हे पणतू. त्यांचे चिरंजीव अनंत कामत यांचा मुलगा नारायण कामत हेच सखाराम कामतीचे वडील होत. सन १८०७ पासून १८४४ पर्यंत ३७ वर्षें हे पोर्तुगीज सरकारच्या दुभाषाच्या जागेवर होते. वाघ घराण्यांतील हे शेवटचे दुभाषी. या घराण्यांत तब्बल एक शतक दुभाषाचा अधिकार चालू राहिल्यानें या घराण्यास 'लिंगिस्ताद घराणें' (लिंग्व दु इस्तादु) असें नांव पडलें.

सखाराम कामत हे चतुर, मुत्सद्दी व आपल्या कामांत तरबेज होते. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. पोर्तुगीज, लॅटिन, फ्रेंच, इंग्रजी या भाषांचें ज्ञान तर त्यांना पक्कें होतेंच. शिवाय मराठी आणि संस्कृतहि ते चांगलें जाणत असत. त्यांची बुद्धि प्रगल्भ असून त्यांना राजकारणाचेंहि चांगलें ज्ञान होतें.

'ग्रामातिक द लिंग्व मारात' या आपल्या पुस्तकांत प्रो. सूर्याजी आनंदराव यांनी त्यांचा असा उल्लेख केला आहे—

" Sacarama foi o primeiro literato do seu tempo entre os hindús de Gôa, dizemos literato, porque o Sr. Sacarama, além de possuir conhecimentos das linguas portugueza, latina, franceza, inglesa, sem fallarmos no saunscrit e marata tinha muita erudição, e era dotado de muito juizo critico."

कामत वाघ यांच्या घराण्यांत बहुगुण सदाशिव कामत वाघ यांच्याप्रमाणेंच इतिहास विषयाची आवड असणारे त्यांचे एक सध्याचे वंशज म्हणजे श्री. वासुदेव वामन कामत वाघ हे होत.

रामकृष्ण शेणवीं घोडेकर

कुंभारजुवें येथील संपन्न जमीनदार, गरीब व अनाथांना सहाय करणारे श्रीमंत सद्गृहस्थ आणि कुशल मुत्सद्दी अशी रामकृष्ण शेणवीं घोडेकर यांची प्रख्याती होती. त्यांना रामकुष्ट शेणवीं असेंहि म्हणत.

घोडेकर यांचें मूळ घराणें सासष्टी महालांतील लोटली येथील असून त्यांचा कुलदेव श्रीरामनाथ होय. ख्रिस्तीकरणप्रसंगीं त्यांचे पूर्वज बांदिवडें-फोंडें-माशेल या गांवांत मुक्काम करीत स्थिरस्थावर झाल्यावर कुंभारजुवें येथें आले आणि तेथेंच पुढें स्थायीक झाले.

रामकृष्ण शेणवीं घोडेकर हे देवभक्त तसेच देशभक्तहि असल्यानें स्वतःचा पैसा स्वयंस्फूर्तीनें खर्च करून जनतेच्या हिताचीं त्यांनी अनेक कामें केलीं आहेत. त्या कालांतील जनतेचे ते एक प्रमुख पुढारीच होते. ते मोठे बुद्धिमान व राजकारणकुशल मुत्सद्दी असल्यानें पोर्तुगीज दरबारांत त्यांना चांगला मान असे. अनेक महत्वाच्या कार्यांत प्रांताधिपतींसारखे मुख्याधिकारी त्यांच्या सल्ल्याला बरेंच महत्व देत असत. गोमंतकीय राजकारणाची त्यांना फार चांगली माहिती होती.

सन १७२५ च्या सुमारास गोमंतकीय सारस्वत ब्राह्मण समाजांत 'स्मार्त-वैष्णव' असें जें एक भयंकर पंथभेद-प्रकरण उद्भवलें त्यांत वैष्णव लोकांच्या बाजूनें घोडेकर हे प्रमुख पुढारी होते.

तत्कालीन स्मार्त लोकांकडून पोर्तुगालच्या राजास वैष्णवांविरुद्ध एक तक्रार-अर्ज गेला होता. त्या अर्जाचा निकाल घोडेकर यांच्या प्रयत्नानें वैष्णववृंदाच्या हितीं लागला. त्यावरून घोडेकर यांचें पोर्तुगीज सरकारांतील वजन कळून येतें.

पोर्तुगीज भाषेवर त्यांचें चांगलें प्रभुत्व होतें. एक गोमंतकीय हिंदु असूनहि ते इतके उत्कृष्ट पोर्तुगीज बोलतात याचें प्रांताधिपतींसारख्या बड्या अधिकाऱ्यांना मोठें नवल वाटे.

पोर्तुगीज भाषेवरील प्रभुत्वामुळेंच त्यांना 'रामा पुर्तुगेज' असें नांव पडलें असावें असें वाटतें.

त्यांचा स्वभाव दिलदार असल्यानें अनेक प्रकारचे गरजू व गरीब लोक त्यांकडे मदतीच्या याचनेसाठीं येत असत; पण असा एकहि इसम कधीं विन्मुखतेनें परत गेला नाहीं.

घोडेकर हे कुंभारजुवें येथून गोवें दरबारांत येण्यास निघाले म्हणजे वाटेंतहि त्यांना अनेक गरीब दुबळे भेटत आणि असे लोक दिसले कीं, भोई लोकांना 'मंचील' थांबविण्यास सांगून ते त्यांची विचारपूस करीत व त्यांची योग्य संभावना करूनच पुढें जात. त्याचप्रमाणें दरबारांतून परत येतांनाहि असल्या अनेक लोकांच्या भेटी घेऊन त्यांचें म्हणणें त्यांना ऐकून घ्यावें लागे.

घोडेकरांच्यावेळीं गोमंतकची राजधानी गोवें येथेंच होती. (ती पुढें स. १७५९ सालीं डिसेंबरच्या १ ल्या तारखेस पणजी येथें नेण्यांत आली.)

सोमवार हा त्यांच्या कुलदेवाचा दिवस असल्यानें ते तो कोणत्याहि परिस्थितींत नियमितपणें पाळीत. दरबारांत काम असलें तरी तें उरकून आल्यानंतर त्यांची स्नानसंध्या व स्तोत्रपठण इ. होऊन मग जेवण होई.

एका सोमवारीं दरबारांतील काम आटपून घोडेकर दुपारीं दोन वाजण्याच्या सुमारास घरीं आले आणि स्नान उरकून धोतर नेसूं लागले. इतक्यांत एक सौभाग्यवती स्त्री आंत आली आणि लवून नमस्कार करीत एकसारखी अश्रु ढाळूं लागली. तिचें काय घडलें आहे हेंच त्यांना समजेना. त्यांनी ऊठ म्हटलें तरी ती उठेना. अखेरीस ते म्हणाले —"बाई, तुझें काय म्हणणें आहे तें अवश्य पाहूं पण आधीं जेवण कर. आमची बायका मंडळी अजून जेवायची आहे."

बाजूस उभी होऊन ती अदबीनें म्हणाली — "मी जेवण उरकूनच इथं आलें आहे. मोठ्या प्रसंगांत आहे. सावकाश जेवणें होऊं देत मग सारें सांगतें."

जेवण होतांच १५ मिनिटें वामकुक्षी करण्याची त्यांना संवय; पण त्या दिवशीं तीहि न करतां ते माजघरांतून बाहेर येऊन बसले आणि त्या स्त्रीचें म्हणणें ऐकूं लागले.

त्या स्त्रीचा नवरा एका देवालयाचा पुजारी होता. त्या देवळांतील देवाचे दागिने चोरांनी लुटले होते. चोर बेपत्ता झाल्यानें जबाबदारी पुजाऱ्यावर येऊन त्याच्याविरुद्ध कोर्टांत काम चाललें व त्या भटजीला पांच वर्षांची आफ्रिकेची सजा झाली. अपिलांतहि तोच दोषी ठरून भटजीला सजा भोगणें भाग झालें व कैदेंत जावें लागलें. आतां तीनच दिवसांनी त्याला मोसांबिक येथें पाठविण्याचें ठरलें होतें.

आतांच्याप्रमाणें बोटींची रहदारी नसल्यानें त्यावेळीं आफ्रिकेचे कैदी सरकारी किंवा व्यापारी गलबतांवर जात असत. बाई निराधार असून तिला पांच वर्षांचें एकच अपत्य होतें.

घोडेकरांनी तिजकडून सर्व माहिती टिपून घेतली आणि तिला निर्धास्त जाण्यास सांगितलें. दुसऱ्या दिवशीं त्यांनी गव्हर्नरांची भेट घेऊन त्यांना सर्व प्रकार सांगितला आणि अभिवचन दिल्याप्रमाणें दुपारीं दोन वाजेपर्यंत त्या बाईच्या नवऱ्याची सुटका होऊन तो घरीं गेला. अशा अनेक अवघड प्रसंगींहि घोडेकरांनी लोकांना निरपेक्षपणें मदत करून जनतेचे आशीर्वाद घेतले आहेत.

घोडेकर सत्यवचनी व सत्यमार्गी होते. सत्यासाठीं ते कोणाचीहि पर्वा करीत नसत. अशा त्यांच्या वृत्तीमुळें पुढच्या काळांत दोघां अधिकाऱ्यांत व त्यांच्यांत अशाच कांहीं कारणानें बेबनाव उत्पन्न झाला. थोड्याच दिवसांनी त्याचें पर्यवसान शत्रुत्वांत झालें. आणि एके दिवशीं दरबारांत जातांना रस्त्यांत मानुयल जॉर्ज कारव्हाल्यु व लुईज आंतोनियु या दोघां युरोपियन अमलदारांनी त्यांना गोळ्या घालून ठार केलें !

घोडेकर यांचे वंशज आजला कुंभारजुवें व कुंकळ्ळी येथें आहेत.

— २८ —

सांतू शेणवीं डांगी

अठराव्या शतकाच्या सुरवातीस कुशल मुत्सद्दी म्हणून सांतू शेणवीं डांगी हे पोतुर्गीज दरबारांत बरेच चमकले.

डांगी हे फोंडें महालांतील बांदिवडें या गांवचे रहिवासी असून हल्ली त्यांचे वंशजहि तेथें आहेत. धुमे, कामत, वाघ, सुखठणकर, वालावलीकर, लाड यांच्याच बरोबरीनें डांगी यांनीहि पोर्तुगीजांतर्फे चांगलें राजकारण केलें आहे.

स. १७३९ च्या मराठ्यांच्या गोव्यावरील स्वारीच्यावेळीं तर सांतू शेणवीं यांनी इतर हिंदु राजकारणी लोकांसोबत मनःपूर्वक भाग घेऊन कुशलतेनें मराठे अधिकाऱ्यांचीं मनें वळविलीं व त्यांना तहासाठीं तयार केलें होतें.

सांतू शेणवीं डांगी हे कांहीं काल सौंदेकर राजांचे प्रधान होते. ही प्रधानकीची जबाबदारीहि त्यांनी कुशलतेनें पार पाडली आहे.

— २९ —

राघो राम पागे

यांचें घराणें मूळचें सासष्टी महालांतील कुठ्ठाळ हें असून उपनांव राजाध्यक्ष होतें. त्यांचा कुलदेव मंगेश. ख्रिस्तीकरणाच्यावेळीं जे कित्येक तेथून निघून गेले तसेच राजाध्यक्षहि गोव्यांतून निघून सावंतवाडी संस्थानांतील आरंवंदें येथें जाऊन राहिले. यांचे वडील राम शेणवीं राजाध्यक्ष हे रांगणे किल्ल्याचे किल्लेदार म्हणून कित्येक वर्षें मराठ्यांच्या नोकरींत होते. त्यामुळें त्यांना पुढें रांगणेकर असें नांव मिळालें.

राघो राम वयांत आल्यावर सातारा येथें मंत्री यांकडे गेले व मंत्र्यांनी त्यांना आश्रय देऊन त्यांची दरबारांत वर्णी लावली. त्यांची कुशलता पाहून पेशवे यांनी त्यांना मुद्दाम आपणांकडे पुण्यास नेलें. चार दिवस इतर किरकोळ कामें केल्यावर पेशवे सरकारनें त्यांना आपल्या पागेचे मुख्याधिकारी नेमलें. या जागेवर आल्यापासून त्यांचें 'पागनीस' हेंच उपनांव सुरू झालें.

यांनी पागनिसीचें काम छान केलें. हे जन्मतःच चलाख व शूर असल्यानें घोड्यावर बसण्यांत त्यांनी बरेंच प्रावीण्य मिळविलें. त्याकालीं मराठ्यांच्या सैन्यांतील सैनिक घोड्यावर बसतांना 'राघोरामकी जय' असें म्हणून बसत. हा प्रघात पुढेंहि बराच काल टिकला.

यांची कामगिरी पाहून रामचंद्रबाबांनीं त्यांच्याबद्दल पेशव्यांकडे शिफारस केली आणि पेशवे सरकारनें त्यांची नेमणूक शिंद्यांच्या दरबारांत करून टाकली.

शिंद्यांच्या लष्करांत यांनी वेळोवेळीं आपलें शौर्य प्रगट करून सेनापतीला खूष केलें. जयाप्पाच्या कालांत नागोरच्या वेढ्यांत व दत्ताजी

शिंद्यांचेवेळीं कुंजपुऱ्याचे व इतर लढायांत त्यांनी फार मोठें शौर्य गाजविलें. शिंद्यांना त्यांच्या शौर्याचा व मुत्सद्देगिरीचा वेळोवेळीं चांगला उपयोग झाला.

ते नेहमीं हत्यारबंद व फार सावध असत. तरवार लागलीच हातीं मिळावी म्हणून जेवतेवेळीं-सुद्धां ते ती जवळ ठेवीत असत. त्यांनी आपल्या अंगरख्याचा छातीवरील बंध कधींच बांधला नाहीं.

— ३० —

आपाजी राम

यांचे पूर्वज ख्रिस्तीकरणाच्यावेळीं गोमंतकांतून निघून कर्नाटकांत वास्तव्य करून राहिले. विद्यार्थीदशेपासून आपाजी राम हे मोठे चतुर व बुद्धिमान होते. ते प्रथम साधे कारकून या नात्यानें हैदर अल्लीच्या दरबारांत प्रवेशले आणि आपल्या हुशारीनें वाढत जाऊन अल्पावधींतच त्याच्या कारभाऱ्याची जागा त्यांनी पटकावली. पुढें मुख्य प्रधानकीची जागा लाभतांच त्यांनी राज्यांत निरनिराळ्या प्रकारची सुधारणा करून मोठी प्रगति साधली.

हैदरच्यामागें त्याचा मुलगा टिपू सुलतान हा गादीवर आला. त्याला सर्व कांहीं नवीन करावयाचें होतें. त्याशिवाय त्याला राज्य-कारभारांत हिंदूंचा सल्लाच नव्हे तर छाया देखील नको होती. म्हणून त्यानें आपाजी रामांना जागेवरून कमी करून प्रधानांच्या जागेवर आपल्या मामाचीच नेमणूक केली. हा नवा प्रधान आरंभापासूनच विचित्रपणें वागूं लागला आणि पुढें फंद-फितुरी करून त्यानें टिपूचें राज्यच घालवलें !

— ३१ —

आबाजी रघुनाथ चिटणीस

महादजी शिंद्यांच्या राजकारणांत हे बरेच प्रकाशले. यांचे पूर्वज मूळचे गोव्यांतलेच. ते सावंतवाडीस जाऊन स्थायीक झाले. आबाजी तेथूनच शिंद्यांकडे गेले. हे लखबादादा लाड यांच्या समकालीन होते.

आबाजी चिटणीस हे आरंभी शिंद्यांचे दरबारी चिटणीस होते. त्यांच्याकडे विशेषतः परराष्ट्र खातें होतें. इंग्रज, इतर राजे व पेशवे यांच्या राजकारणांत हेच प्रमुखत्वानें भाग घेत.

यांचा बंधु गोपाळराव सेनापति व मुत्सद्दी म्हणून बराच गाजला. दुसरा बंधु कृष्णाजी रघुनाथ पागनिशीच्या कामावर होता. अशा रीतीनें तिघांहि बंधूंनी शिंदे सरकारची सेवा एकनिष्ठेनें बजावली आहे.

पुढें दौलतराव शिंद्यांचा सासरा सर्जेराव घाटगे यानें राहूप्रमाणें शिंदेशाहीस ग्रासल्यानें सगळीच उलथापालथ झाली. त्यावेळीं आबाजींनीहि शिंद्यांच्या राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें आणि ते शिंद्यांच्या राज्यांतून निघून गेले.

विठोजी शेणवीं धुमे

धुमे यांचें घराणें मूळचें साष्टींतील कुङ्काळी येथील असून ख्रिस्तीकरणाच्यावेळीं धुमे मंडळी डिचोली येथें गेली आणि बऱ्याच कालानंतर स्वास्थ्य लाभल्यावर त्यांचे वंशज कुंभारजुवें येथें येऊन स्थायीक झाले. या घराण्यांतील नारायण आर्य शेणवीं धुमे हे कुङ्काळींतील एक गांवकर असल्याचा ता. २ सप्टें. १६३७ च्या एका जुन्या दाखल्यांत उल्लेख मिळतो. त्यांचा मुलगा विठ्ठल शेणवीं यांचा नातू म्हणजे लक्ष्मीधर शेणवीं यांचा मुलगा चंद्र किंवा चंद्रेश्वर शेणवीं हाच विठ्ठल ऊर्फ विठोजी शेणवीं धुमे यांचा बाप होय.

विठोजी शेणवीं धुमे हे राजकारणांत बरेच नांवाजले होते. त्यांच्या मुत्सद्दीपणामुळें तत्कालीन व्हिसिरेनें त्यांचें फार कौतुक केलें आहे.

सन १७३९ सालीं व्यंकटराव घोरपडे यांनी साष्ट व बार्देसवर स्वारी करून त्या भागांत मराठ्यांची सत्ता प्रस्थापित केल्यावर पोर्तुगिजांच्या वतीनें मराठ्यांकडे तहाच्या वाटाघाटी करण्यास गोवें येथील व्यंकटी कामत व बेतीं येथील उप्या कामत यांची योजना झाली होती; ती सफल न झाल्यानें त्या जागीं धुमे यांची नेमणूक झाली आणि त्यांनी मोठ्या चतुराईनें साताऱ्यास श्रीशाहू छत्रपतींच्या दरबारांत, कोल्हापूर-दरबारांत आणि पुणें येथें पेशव्यांच्या दरबारांत राजकारणें सुरू केलीं व त्यांत यश मिळविलें.

श्रीशाहू छत्रपतींचे मंत्री नारो राम मंत्री हे विठोजी शेणवीं धुमे यांचे निकट स्नेही होते. नारो राम मंत्री यांचा पुतण्या घनःश्याम मंत्री यांची मुलगी विठोजी धुमे यांच्या एका मुलास देण्यांत आल्यानें मंत्री व धुमे यांचें नातेंहि जुळलें होतें. अशा रीतीनें सातारा दरबारांत धुम्यांचें वजन बरेंच वाढलें होतें आणि त्यामुळें पोर्तुगीज दरबारांतहि धुमे यांना विशेष महत्त्व प्राप्त झालें होतें.

सन १७४० च्या जानेवारींत नारो राम मंत्री आपल्या कुलदेवीकडे कवळें येथें आल्यावेळीं विठोजी धुमे यांना पोर्तुगिजांनी वाडकर भोंसल्यांच्या तहासंबंधीं वाटाघाट करण्यास मंत्र्यांकडे पाठविलें आणि धुमे यांच्याच खटपटीनें वाडकर भोंसले व पोर्तुगीज यांच्यांत तह होऊन ता. १२ मार्च सन १७४० रोजीं वाडकर भोंसल्यांकडून विठोजी शेणवीं धुमे यांनी बार्देस सोडल्याचें फर्मान मिळविलें.

पोर्तुगीज व्हिसिरे मार्केज द आलोर्न यानें वाडकर भोंसल्यांविरुद्ध लढाई सुरू करून त्यांचा बराच प्रदेश घेतला होता. वाडकर भोंसले हे पेशव्यांचे हस्तक असल्यानें पोर्तुगिजांनी घेतलेला मुलूख त्यांचा त्यांना परत करावा याबद्दल पुणें दरबारांत बरींच खलबतें सुरू झालीं. या कामासाठीं रामचंद्र मल्हार सुखठणकर सन १७४६ च्या जानेवारींत फोंडें येथें आले. त्यावेळीं पोर्तुगीज व्हिसिरेच्या वतीनें त्यांच्यासाठीं नजराणा घेऊन ता. २९ जानेवारी रोजीं विठोजी शेणवीं धुमे फोंडें येथें त्यांकडे गेले होते. रामचंद्र मल्हार व धुमे या उभय मुत्सद्द्यांची तेथें भेट झाली. या भेटींत अनेक प्रश्नांची चर्चाहि झाली.

रामचंद्र मल्हार सुखठणकर यांची ही गोव्यांतील फेरी अनेक कारणांमुळें इतिहासांत नमूद आहे.

पुढें कांहीं दिवसांनीं सदाशिवराव भाऊ यांच्या आधिपत्याखालीं तीस हजार घोडेस्वार व अगणित पायदळ असें पेशव्यांचें ताज्या दमाचें सैन्य गोव्याच्या हद्दीवर येऊन थडकलें. त्यावेळीं विठोबा शेणवीं यांच्यामार्फत सदाशिवराव भाऊंनीं वाडकर भोंसले यांकडे सलोखा करण्याबद्दल फिरंग्यांना निकड लावली. त्यावरून धुमे यांचें पेशव्यांकडील वजन कळून येतें.

मराठ्यांकडून फोंडें येथील किल्ला घेण्याचा प्रयत्न व्हिसिरै कोंदि द आल्व याकडून अयशस्वी झाल्यानंतर सन १७५७ च्या सुमारास त्र्यंबकराव विश्वनाथ फोंडें येथें आले असतां त्यांच्याशीं बोलणें करण्यासाठीं व्हिसिरैनें विठोजी धुमे यांची योजना केली होती.

विठोजी शेणवीं धुमे यांच्याबद्दल गोव्याचा जमाबंदीखात्याचा तत्कालीन मुख्याधिकारी (व्हेदोर द फाझेंद) आपल्या ता. १६ जानेवारी १७६० च्या शेऱ्यांत म्हणतो—

" Hé certo que o dito Vithogi Sinay servio a este Estado com distinto prestimo zelo e desinteresse, não só adiantando a Fazenda Real grossas quantias de dinheiro em tempo de seus grandes necessidades, mas tambem em adquerir noticias certas dos gabinetes dos Regulos vizinhos, e o mais assinalado serviço nesta materia foi dever-se-lhe inteiramente o evitar-se a bem traçada e secreta surpreza dos Bounsulós contra a fortaleza da Aguada no ano de 1741, e ficar aquele importante lugar livre de hum evidente perigo ou perda certa..."

" Em remuneração dos grandes serviços que Vithogi Sinay Dumó havia feito ao Estado assim para conseguir a paz com o Marata no tempo de guerra, como por remediar com mantimentos comprados com o seu dinheiro as muitas necessidades do moradores das praças e fortalezas, o vice-rei Conde de Sandomilem 1741, fez-lhe mercê do cargo de 'corretor dos mercadores balagateiros' para elle em sua vida, e seus descendentes o exercitarem" (Agentes Hindús de Diplomacia Portuguesa — Dr. P. S. Pissurlencar).

— ३३ —

पांडुरंग शेणवीं धुमे

हे विठोजी शेणवीं यांचे थोरले चिरंजीव. यांना पोक्या शेणवीं असेंहि म्हणत. हेहि एक चांगले मुत्सद्दी होते. यांनीं पोर्तुगीजांतर्फे मराठ्यांकडे कित्येक प्रसंगीं चांगलें राजकारण केलें आहे.

माधवराव पेशव्यांचे मामा सरदार गंगाधरराव रास्ते १७६७ च्या मार्चमध्यें सांखळीस आल्यावेळीं गोव्याच्या गोव्हेर्नादोरातर्फे पोक्या शेणवीं धुमे त्यांच्या भेटीस गेले होते." असा सेक्रेतार जेराल याच्या १९ मार्च १७६७ च्या पत्रांत उल्लेख आहे.

यांच्या महत्त्वाच्या कामगिरीमुळें तत्कालीन गोव्हेर्नादोर यानें आपल्या ३१ जानेवारी १७६६ च्या पत्रांतून त्यांना उघडपणें पालखींतून फिरण्याची व छत्री वापरण्याची सवलत मिळावी अशी पोर्तुगालच्या राजाकडे मागणी केली होती.

(त्यावेळीं हिंदूंना पालखी व छत्री वापरण्याची बंदी होती.— आ. हिं.— डॉ. पिसुर्लेकर.)

— ३४ —

नारायण विठ्ठल शेणवी धुमे

विठोजी शेणवी धुमे यांचे हे दुसरे चिरंजीव. राजकारणांत हे वडिलांपेक्षांहि जास्त चमकले. पेशव्यांच्या दरबारांतील फिरंग्यांचे वकील या नात्यानें यांनीं सन १७७५ पासून १७९० एप्रिल-पर्यंत फार महत्त्वाची कामगिरी बजावली. हे चतुर मुत्सद्दी अशी त्यांची पुणें येथें फार ख्याती होती. तेथें त्यांना नारायणराव विठ्ठल असें म्हणत.

दों जुझे पेद्रु द कांम्र या गव्हर्नरनें ३ जानेवारी १७७५ रोजीं त्यांना पहिल्यानदांच पुण्यास पाठविलें होतें. फिरंग्यांचे वकील या नात्यानें त्यांनीं पुणें येथें विविध प्रसंगीं जें राजकारण केलें त्यामुळें फिरंगी सरकारनें त्यांचें वेळोवेळीं कौतुक केलें आहे. त्यांकडून प्रत्येक वेळीं राजकारण विषयक जी बातमी येई ती महत्त्वाचीच असे असा जुन्या कागद पत्रांतून उल्लेख मिळतो. ता. २६ ऑगस्ट १७७६ च्या एका पत्रांतून धुमे गोव्याच्या गव्हर्नरला लिहितात कीं—"हरीपंत फडके, आप्पा बळवंत राव, त्रिंबक विनायक, कृष्णराव दलाल, सखारामपंत इ. अधिकारी माझे मित्र असून चालू प्रकरणांचा निकाल आमच्या हितीं लागेल यांत शंका नाहीं."

पेशवे व पोर्तुगीज यांच्यांत ४ मे १७७९ रोजीं जो तह झाला तो मोठ्या कुशलतेनें घडवून आणण्याची कामगिरी नारायणराव धुमे यांचीच होय. या तहान्वयें दमणकडील बारा हजार रुपये उत्पन्नांचीं ७२ गांवें फिरंग्यांना देण्याबद्दलचें पेशव्यांचें फर्मान वसईच्या सरसुभेदाराकडे गेलें. तीं गांवें म्हणजेच 'परगणा' प्रदेश होय. (डॉ. पिसुर्लेकर— आइयेंतिस् द दिप्लोमासीअ पुर्तुगेज.)

नारायणराव धुमे यांनीं पेशव्यांची बरीच मर्जी संपादन केली होती. पेशव्यांकडून त्यांना चार गांव इनाम मिळाले होते. पेशव्यांचा परराष्ट्रखात्याचा मुख्याधिकारी बहिरोपंत मेहेंदळे नानांस लिहिलेल्या ८ मार्च १७८६ च्या पत्रांत धुमे यांच्याबद्दल म्हणतो कीं—"माणूस प्रामाणिक, चांगले, सरकार लक्षांतील व पुढेंहि त्या दरबारीं चाकरीचे उपयोगी व उमेदवार आहेत. यासाठीं त्यांना निरोप देतांना जवाहीर, दागिना इ. देऊन बहुमान करणें योग्य."

नारायणराव धुमे यांनीं पेशवे व पोर्तुगीज यांच्यांत फारच सलोखा निर्माण केला होता. त्यामुळें ते जरूर तेव्हां एकमेकांना सहाय देण्यास सज्ज असत. नबाब टिपू सुलतान व मराठे यांच्यांत वैमनस्य आल्यानें टिपूवर स्वारी करण्यासाठीं पेशवे दरबारनें नारायणराव धुम्यां-तर्फे पोर्तुगिजांकडे सहाय मागितलें. त्यासाठीं पुणें-दरबारचे परराष्ट्रखात्याचे अधिकारी बहिरोपंत रघुनाथ मेहेंदळे यांचा खलिता घेऊन धुमे स. १७८६ त गोव्यांत आले व त्यांनीं त्यासाठीं गोवा सरकारची मंजुरीहि मिळवली. तथापि पेशव्यांची मोठी तयारी पाहून टिपू सुलतान यानें ४८ लाख रुपये खंडणी देण्याचें कबूल करून १७८७ सालच्या मार्चमध्यें पेशव्यांशीं तह केल्यानें टिपूवरील लढाईचा प्रसंगच आला नाहीं.

वाडीचे तिसरे खेमसावंत भोंसले यांच्या उत्कट इच्छेप्रमाणें शिंद्यांचे प्रख्यात सेनापति बक्षीबहाद्दर जिवबादादा केरकर यांच्या शिफारशीनें मोंगल

बादशहा शहाअलम यांनी त्यांना 'राजेबहादूर' हा किताब व मोर्चेलांचा मान बहाल केला. हा किताब व मोर्चेलें देण्याचा समारंभ दिल्लीदरबारांत ता. १२ मे सन १७८५ रोजीं झाला.

वाडकर भोंसले हे करवीरकर छत्रपतींचे मांडलीक असल्यानें व त्यांनी स्वीकारलेलीं मोर्चेलें स्वातंत्र्यनिदर्शक असल्यानें ती गोष्ट करवीरकरांना रुचली नाहीं. पेशवे यांनाहि तें गैरच वाटलें.

त्यामुळें करवीरकर छत्रपतींनी रागानें वाडकरांवर स्वारी केली. तथापि वाडकर सावंत मंडळीसह गुपचूप गोव्यांत निघून आले. अशा प्रसंगीं वाडकरांनी ताबडतोब ही बातमी ग्वाल्हेरास व. जिवबादादा यांना कळविली आणि त्यांनी परस्पर कोल्हापूरकरांकडे पत्रव्यवहार करून त्या प्रकरणाचा निकाल लावलाच; पण इकडे वाडकरांनी पोर्तुगिजांकडेहि सहाय मागितलें. पोर्तुगिजांनी त्याविषयीं आपले पुण्याचे वकील नारायणराव विठ्ठल धुमे यांना जें पत्र लिहिलें तें असें —

Em carta de 7 do corrente teve o Illmo. e Exmo. Sr. Govr. e Cap. Gen. parte do Bounsuló de terem os seus carcunos concluido em Puném as diferenças que elle tinha com Maha Raja de Colapor aceitando esse Sarcar a consignação sobre certos mercadores da quantia que elle dito Bounsuló se obriga a dar ao mencionado Colapor em virtude do que Ramji Zadhou Patil subdito do Sindó, Sacu Bay Sinde e os ditos carcunos conseguirão que o dito Colapor restetuisse a elle Bounsuló as terras, e fortalezas que lhe havia tomado conservando-o com as honras do Raja, pelo que ja os carcunos do Colapor tiverão, segundo, diz licença p[a]. se retirarem de Puném e o mesmo farão seus bragmanes.

Como V. M. não tem escrito proxim[e]. sobre esta materia, me ordena S.Exa. que eu o avize da dita parte do Bounsuló para que V. M. me comunique o que ahy puder saber de certo pois que nada ha que fiar das asseveraçoens e noticias dadas pelo dito Bounsuló muito principalmente quando se sabe que o Colapor está ajuntando gente, e parece incrivel q'elle cedesse sobre a materia de Morchais .... Goa, 14 de Outubro de 1789 - Sebastião Joze F. Barroco. (Agentes da Diplomacia Portuguesa - Dr. Pissurlencar.)

नारायण विठ्ठल धुमे हे ता. १२ मे सन १७९० रोजीं पुणें येथेंच कालवश झाले. त्यांचे वंशज कुंभारजुवें येथें राहात आहेत.

पुंडलीक शेणवी वर्दे वालावलीकर

हे वत्सगोत्री गौड सारस्वत केळोशीकर असून यांचें घराणें मूळचें सासष्ट भागांतील केळोशी येथील आहे. यांची कुलदेवी श्रीशांदुर्गा. सोळाव्या शतकाच्या सुरवातीस श्रीशांतादुर्गेचें देवालय जीर्ण स्थितीस आल्यावेळीं ज्या अनू शेणवीं नांवाच्या वत्सगोत्री श्रीमंत व्यापाऱ्यानें हें देवालय स्वयंस्फूर्तीनें व स्वखर्चानें बांधलें तो यांच्याच घराण्यांतील असावा असें वाटतें. सासष्टींतील ख्रिस्तीकरण प्रसंगीं सन १५६६ त तें जाळण्यांत आलें. त्याच गडबडीच्या वेळीं जीं तेथील कित्येक घराणीं परागंदा झालीं त्यांतच या वर्दे घराण्याचाहि समावेश होतो.

त्यावेळीं गोव्यांतून गेलेल्या यांच्या मूळ पुरुषाचें नांव कळत नाहीं. तथापि येथून तिकडे गेलेले यांचे पूर्वज सरदेसाई यांच्या राज्यांत वालावली येथें स्थायीक झाले आणि तेथेंच त्यांना वालावलीकर हें उपनांव मिळालें. तिकडे गेलेल्या यांच्या घराण्यांतील एक पुरुष गोरक्ष ऊर्फ गोरकी शेणवीं वर्दे हा होय. पुंडलीक शेणवीं वर्दे हे यांचेच चिरंजीव असून ते वाडकरांच्या राज्यांत ओटवणें येथें कुलकर्णी होते. कांहीं कालानें वाडकरांच्या दरबारांत हे सबनिशीच्या हुद्द्यावर आले. सबनिशीच्या हुद्द्यावर येणारे या घराण्यांतील हे दुसरे पुरुष आहेत. यापूर्वी सन १६९१ सालीं वर्दे नांवाचा एक पुरुष कुडाळच्या एका लढाईवर राजे सावंतवाडकर यांच्या बरोबर लष्करी सबनीस म्हणून गेल्याचा इतिहासांत उल्लेख मिळतो. हा गोरक्ष शेणवीं यांचा चुलतबंधु असावा. यांचेच वंशज पुढें सबनीस या उपनांवानें प्रसिद्धीस आले (बॉम्बे गॅझेटियर).

या सबनीस घराण्यांतील जिवबा सबनीस नांवाचा गृहस्थ सन १७६४ सालीं सावंतवाडकरांचा प्रधान होता.

पुंडलीक शेणवीं वर्दे हे सबनिशीच्या हुद्द्यावर आल्यापासून राजे वाडकर यांकडे त्यांचा विशेष संबंध येऊं लागला. हिशेबी लेखनव्यवहार, दरबारी कामें, राजकारणी कुशलता या कामगिरींतील पुंडलीक शेणवीं यांची हुशारी पाहून राजे फार खुष होत. सावंतवाडकर भोंसले सरदेसाई यांचा पुंडलीक शेणवीं वर्दे यांच्यावर फार विश्वास असल्यानें त्यांनी त्यांना आपले वकील म्हणून गोव्यांत फिरंगी दरबारांत पाठविलें. हे राजकारणांत मोठे चतुर होते.

त्यावेळीं गोवा सरकारची राजधानी जुनें गोवें येथें होती. तेथून जवळचें व सोयीचें गांव म्हणून जुवें (Santo Estevam) येथेंच त्यांनीं आपलें निवासस्थान केलें व तेथेंच ते राहूं लागले.

हे मोठे नेमनिष्ठ होते. स्नानसंध्या, देवपूजा, नित्यपाठ इ. आपल्या धार्मिक कार्यांत ते कधींच कसूर करीत नसत. दरबारांतील आपलें काम संभाळूनहि ते ठराविक वेळीं धार्मिक काम व्यवस्थित पार पाडीत.

कॅप्टन गोरक्षराव वालावलीकर

पुंडलीक शेणवीं वर्दे यांचे हे चिरंजीव असून त्यांना गोरक्षराव वालावलीकर ऊर्फ गोरकी शेणवीं वर्दे वालावलीकर असें म्हणत. यांनीं पोर्तुगीज दरबारची तीस वर्षें नोकरी केली. व्हिसिरै मार्केज द आलोर्न यांनीं त्यांच्या कामगिरीचें बरेंच कौतुक केलें आहे.

गोरक्षराव हे गोमंतकीय शिपायांच्या पलटणीचे कॅप्टन होते. लष्करी अधिकारी या नात्यानें त्यांनीं बजावलेल्या कामगिरीबद्दल त्यांच्या नोकरीच्या कालांत आलेल्या प्रत्येक लष्करी जनरलनें आणि व्हिसिरै किंवा गव्हर्नर जनरलनें बरेच प्रशंसोद्गार काढले आहेत.

लष्करी अधिकारांत त्यांनीं जो मान, कीर्ति व शाबासकी मिळविली तशीच राजकारणांतहि त्यांची फार कुशलता दिसून आल्याचे इतिहासांत उल्लेख मिळतात.

गोरक्षराव पेशव्यांच्या दरबारांत पुणें येथें बराच कालपर्यंत पोर्तुगिजांचे वकील होते.

मोंगल व पोर्तुगीज यांच्यांतील तेढीचे प्रसंग सलोख्यानें मिटविण्याची कामगिरी गोरक्षराव यांनीं फार चांगली केली असून मोंगलांच्या फोंडें येथील तत्कालीन दिवाणानें त्याबद्दल त्यांच्या बुद्धिमत्तेचें कौतुक केलें आहे. तो म्हणतो कीं— "मनुष्य अनुभवी व समंजस आहे."

वाडकर भोंसले सरदेसाई आणि पोर्तुगीज सरकार यांच्यांतील अनेक राजकारणी व्यवहार गोरक्षराव वर्दे वालावलीकर यांतर्फे कुशलतेनें झाल्यानें पोर्तुगीज दरबाराप्रमाणेंच सावंतवाडीच्या सरकार-दरबारांतहि गोरक्षरावांचें चांगलें वजन असे. त्यामुळें एका राजकारणी व्यवहारांत गुंतले असतांना देखील सेक्रेतारियु दु इश्तादु बे. जुझे व्हाज द कारव्हाल्यु यानें ९ फेब्रुवारी १७६४ च्या पत्रांतून त्यांना सावंतवाडीकडे जाण्यास जरूरीनें बोलावलें. "पत्र मिळतांच वेंकू नाईक देसाई यांसह लवकर यावें, कारण लगेच एका महत्त्वाच्या कामासाठीं सावंतवाडीस जाणें आहे. वाडकर सावंत यांचे प्रधान जिवबा सबनीस यांनांहि येत असल्याची तावडतोब सूचना द्यावी इ."

गोरक्षराव वालावलीकर हे बोलण्यांत पटाईत, तसेच लिहिण्यांत हुशार व दिसण्यांतहि वजनदार पुरुष दिसत होते. हे पोर्तुगीज सुंदर बोलत; तसाच मराठी बोलण्याचाहि यांचा व्यासंग चांगला होता.

पुणें दरबारांत गेल्यापासून गोरकी किंवा गोरका शेणवीं वर्दे वालावलीकर या ऐवजीं 'गोरक्षराव वालावलीकर' हेंच त्यांचें नांव विशेष प्रचारांत आलें आणि पेशवे सरकारांतून त्यांना 'राव' ही वंशपरंपरा पदवी व पालखीचा मान मिळाल्यापासून तर वर्दे वालावलीकर घराण्यास पुढें 'राव' हेंच उपनांव प्राप्त झालें.

— ३७ —

कॅप्टन विठ्ठल राव वालावलीकर

कॅप्टन विठ्ठल राव वालावलीकर यांनाच विठ्ठल गोरक्ष राव, विठोजी गोरकी शेणवीं, विठ्ठ शेणवीं गोरकी अशींहि नांवें होतीं. हे गोरक्षरावांचे थोरले चिरंजीव असून दुसरे पुंडलीक गोरक्ष वालावलीकर हे होत. विठ्ठलराव यांचा जन्म सन १७३१ सालीं झाला.

वडिलांच्यामागें लगेच हे कॅप्टनच्या हुद्द्यावर आले. त्यापूर्वी त्यांच्याच पलटणींत हे कांहीं काल आल्फेर होते. व्हिसिरै कोंदि द येग यांच्या कारकिर्दीपासून हे कॅप्टन व कमांडंटच्या हुद्द्यावर होते. सांखळीच्या घनघोर लढाईत फिरंग्यांच्या बाजूनें यांनीं चांगली मर्दुमकी गाजविली. लष्करी अधिकारी या नात्यानें त्यांनीं दाखविलेलें निरनिराळ्या प्रसंगींचें शौर्य व त्यांची धडाडी पाहून व्हिसिरै कोंदि द येग (१७५८–६५), गव्हर्नर जनरल दों जुआंव जुझे द मेल (१७६८–७४), गव्हर्नर ज. दों जुझे पेद्रु द काम्र, गव्हर्नर ज. दों. फे. गिल्येर्मि द सौज (१७७९-८६), गव्हर्नर ज. फ्रांसिस्कु द कु. मिनेझिश् (१७८६–९४) वगैरे प्रांताधिपतींनीं त्यांची फार प्रशंसा केली आहे. (आर्ष्ये. द दि. पुर्तुगेज— डॉ. पिसुर्लेकर).

कॅप्टन विठ्ठलराव वालावलीकर हे जसे शूर व धडाडीचे अधिकारी होते. तसेच ते राजकारणांतहि मोठे चतुर व बुद्धिमान होते. पोर्तुगिजांचे परराष्ट्र खात्याचे वकील या नात्यानें त्यांनीं पुणें येथें पेशवे सरकारच्या दरबारांत आणि सावंतवाडी येथें राजे सावंत भोंसले सरदेसाई यांच्या दरबारांत महत्त्वाचें राजकारण केलें आहे.

मराठ्यांचे वसई येथील सरसुभेदार सरदार विसाजीपंत यांच्या सैन्यानें व्यापलेला गोव्यांतील सांखळीपर्यंतचा भाग कुशलतेच्या राजकारणानें सोडविण्यांत यांची विशेष मुत्सद्देगिरी दिसून आली.

तेनेंत जेनेराल फ्रांसिस्कु आंतोनियु व्हैग काब्राल यांच्या कालांत गुजरातमधील परगणा प्रकरणाची तेढ पुणें दरबारांत कुशलतेच्या राजकारणानें मांडून ती दूर करण्यांत यांनीं बरीच बुद्धिमत्ता दाखवली.

पोर्तुगिजांचे वकील या नात्यानें कॅप्टन विठ्ठलराव यांची नेमणूक पेशव्यांच्या दरबारांत पुणें येथें पांच खेपा झाली. अखेरच्या कालांत त्यांचें वास्तव्य पुणें येथेंच कायम होतें. कॅप्टन व परराष्ट्र खात्याचे वकील अशा अधिकारांत त्यांनीं सतत २९ वर्षें नोकरी केली.

पोर्तुगीज सरकारांत, त्याचप्रमाणें पुणें येथें पेशव्यांच्या दरबारांत यांनीं चांगला लौकिक व मानमरातब मिळविला. यांची बोलण्याची पद्धत अतिशय गोड व मुद्देसूद होती. त्या प्रेमळपणामुळें पुणें दरबारांत एखाद्या विरोधी प्रसंगींसुद्धां त्यांच्यांत व दरबारी लोकांत किंवा सरकारांत कधींच वितुष्ट आलें नाहीं. उलट सगळ्यांकडे त्यांचा सारखाच स्नेह होता. पेशवे दरबारांतून यांना पालखीचा व मशालीचा मान मिळाला होता.

कॅप्टन विठ्ठलराव बालावलीकर यांनी पुणें दरबारांत वेळोवेळीं पोर्तुगीजांच्या हितीं केलेल्या राजकारणामुळें त्यांच्या कारकिर्दीत गोव्यांत आलेल्या प्रत्येक प्रांताधिपतीला व सेक्रेटरीला ते फार प्रिय असत व त्यांना ते फार मानीत. खालील दोन पत्रांवरून त्याबद्दलचा सहज पुरावा मिळतो.

— 1 —

Honrado Vital Rao Gorqui.

Recebi com muito gosto a carta que V. M. me dirigio na data de 24 do mez proximo passado, porque o bom acerto, fidelidade, zello, e inteligeñcia, com que V. M. tem desempenhado a Comissão, de que o encarreguei nessa Corte, justifica a boa elleição que fiz da sua pessoa, a quem dezejarei ter occazioens de obsequeziar ………Deos Ge. a V. M. m. a. Goa 14 de Dezembro de 1794.

Francisco da Cunha e Menezes

Governador e Capitão-general do Estado da India

— 2 —

Para o nosso Emissario em Punem Vital Rao Gorqui.

O Illmo. e Exmo. Sr. Tenente-General e Governador da India foi servido despachar a hum de seos filhos no posto de Alferes, eu dou a V. M. os parabens por esta prova que o mesmo Sr. acaba de dar do muito que contempla a sua caza e familia.

Secretaria 9 de Janeiro de 1795—José Caetano Pacheco. Secretario do Estado.

(Agentes da Diplomacia Portuguesa—Dr. P. S. Pissurlencar.)

सन १७७१ पासून १८०८ पर्यंतच्या कालांत फिरंग्यांचे वकील या नात्यानें बजावलेली पुणें दरबारांतील यांची कामगिरी डोळयांत भरण्यासारखीच आहे. पेशव्यांचे सरदार विसाजीपंत लेले यांची फोंडें प्रांतावर स्वारी होण्याचा जो प्रसंग टेपला त्यावेळीं स्वारी न करण्याबद्दल श्रीमंत माधवराव पेशवे यांकडे राजकारण करण्यासाटीं फिरंगी सरकारनें सन १७७१ सालीं कॅप्टन विठ्ठलराव वालावलीकर यांना पेशव्यांच्या दरबारांत पुणें येथें पहिल्याप्रथम पाठविलें होतें.

पेशवे दरबारांतील फिरंग्यांचे वकील या अधिकारावर असतांनाच वयाच्या ७८ व्या वर्षी ता. २३ जून सन १८०८ रोजीं कॅप्टन विठ्ठलराव वालावलीकर यांनी इहलोक सोडला. (आझ्यें. द दिप्लो. पुर्तुगेज – डॉ. पां. स. पिसुर्लेकर).

कॅप्टन गोरक्ष विठ्ठलराव वालावलीकर

प्रसिद्ध मुत्सद्दी कॅप्टन विठ्ठलराव वालावलीकर यांच्या तीन मुलांपैकीं पहिला मुलगा हाच गोरक्षराव वालावलीकर होय. गोरक्षरावांना मराठी व संस्कृत या भाषांचा बरा सराव असून पोर्तुगीज भाषेचाहि त्यांचा अभ्यास चांगला होता. तत्कालीन अपुऱ्या साधनांमुळें इच्छा असूनहि इंग्रजीचा अभ्यास त्यांना साधला नाहीं. पोर्तुगीज लिहिण्यापेक्षांहि बोलण्यांत ते मोठे पटाईत होते. वडिलांच्या वशिल्यापेक्षांहि त्यांच्या भाषाप्राविण्यामुळें तत्कालीन गव्हर्नरांची गोरक्षरावांवर विशेष मर्जी बसली.

गोरक्षराव हे स्वभावतःच मुत्सद्दी होते व त्याहिपेक्षां त्यांच्या अंगीं जो शिपाईबाणा पुरेपूर होता तो लष्करी अधिकाऱ्यांचें लक्ष सहज वेधून घेई. आणि त्यामुळेंच पलटणींत सुरवातीलाच 'आल्फेर' या अधिकारावर नेमणूक होऊन पोर्तुगीज सरकारच्या लष्करी नोकरींत त्यांचा प्रथम प्रवेश झाला. यांना गोरकोबाराव असेंहि म्हणत. पोर्तुगीज कागदपत्रांत गोरक्षराव व गोरकोबाराव अशा यांच्या दोन्हीं नांवांचा उल्लेख आहे.

गोरक्षरावांवर प्रांताधिपतींची बहाल मर्जी असल्यानें त्यांनी अल्पावधींतच इंफांतारीच्या तेनेंतच्या व पुढें लगेच कॅप्टनच्या हुद्यावर त्यांची नेमणूक केली. त्यांच्या हुशारीस अनुसरून हा अधिकार कुशलतेनें चालवून त्यांनी मुख्य सेनापति व प्रांताधिपति यांकडून वेळोवेळीं शाबासकी मिळविली.

कुशलतेच्या कामगिरीमुळें पोर्तुगीज सरकारांतून त्यांना कांहीं बक्षिसेंहि मिळालीं आहेत. सरकारांतून त्यांना मिळालेल्या एका इनामी सनदीची नक्कल पुढें दिली आहे :—

Sonodo a Gorcobá Rao

O Dr. Francisco de Noronha e Mota Ouvidor Geral do Crime, Provedor mor dos Defuntos e auzentes, e Juiz Intendente das Provincias de nova conquista etc.

Faço saber aos Gaoncares, e Escrivaens das Alds. de Piligão, e Cudném da Provincia de Pondá, e ao Rendeiro da Alfandega de Bicholim, e Cansarpale, e a qm. o conhecimento desta pertencer, q Gorcobá Rao Vittal Valaulicar Capm. da Infantaria com exercicio nas partidas volantes requereo ao Illmo e Exmo Sr. Gor. e Capm. General do Estado, q era constante o disvello com q Gorquy Sinai avó do supa.

servira a S. Mag. de e serve tbem Vitol Rao Gorquy pay do mesmo supe. no Sarcar de Puném, e o supe. igualmente, e por q seja carrego de família, recorria a generozidade e grandeza de S. Exa. pa. fazer merce ao supe. das tenças de Bosty da Alfandega de Bicholim, e de Cansarpale do interesse do gancar da dita aldeia Piligão e do Escri.m da dita aldeia Cudném da mesma Provincia de Bicholy, q tudo em portaria por ano duzentos e cincoenta xerafins pouco mais ou menos, cujos beneficios se achavão vagos por falecimento dos seus ultimos possuidores.

Pallacio de Pangim a 14 de Agosto de 1800.

(Livro dos Registos Gerais da Fazenda 1803-1805, fls. 12.)

— Agentes da D. P. — Dr. Pissurlecar.

— ३९ —

नारायणराव वालावलीकर

नारायण वालावलीकर हे कॅप्टन विठ्ठलराव वालावलीकर यांचे द्वितीय चिरंजीव व कॅप्टन गोरक्षराव यांचे बंधु होत. हे वडिलांप्रमाणें किंवा बंधूंसारखे लष्करी शिस्तीचे असल्याची माहिती उपलब्ध नसली, तरी मुत्सद्देगिरींत हुशार असल्याचे कांहीं उल्लेख मिळतात.

अनेक महत्वाच्या राजकारणप्रसंगीं नारायणराव यांना पोर्तुगीज सरकारनें पुणें येथें पाठविलें होतें. आणि त्यांनी पेशवे दरबारांत फिरंगी सरकारतर्फे बोलणीं करण्यांत वडिलांना सहाय्य केलें होतें.

नारायणराव वालावलीकर यांनी राजे सौंदेकर यांकडेहि कित्येक वेळां महत्वाचीं बोलणीं केलीं होतीं.

ग्वाल्हेर सरकारच्या परराष्ट्र खात्याच्या कागदपत्रांत नारायणराव विठ्ठल वर्दे नांवाच्या एका इसमाचा उल्लेख मिळतो. कदाचित् ते हेच असूं शकतील.

नारायणराव यांना भवानी-शंकर असें दुसरें नांव होतें व तेंच विशेष प्रचारांत असल्याचें दिसतें.

— ४० —

कॅप्टन लक्ष्मीनारायणराव वालावलीकर

कॅप्टन विठ्ठलराव वालावलीकर यांचे हे तृतीय चिरंजीव. यांचा मराठी, संस्कृत व पोर्तुगीज भाषेचा अभ्यास चांगला होता. बंधु कॅ. गोरक्षराव यांच्या पलटणींत स. १७९४ त यांनी प्रवेश केला. व लगेच ते आल्फेरिसच्या अधिकारावर आले. त्याच पलटणींत ते तेनेंत झाले व पुढें पोर्तुगिजांच्या पुणें येथील वकिलातींत वडिलांचे सहाय्यक म्हणून त्यांनी बरींच वर्षे काम केलें. त्यामुळें परराष्ट्रीय राजकारणाची त्यांना फार चांगली माहिती झाली. पेशव्यांशीं त्यांचा चांगला परिचय झाला होता व त्यांच्या मंत्र्यांच्या राजकारणाची आणि तेथील दरबारी चालीरीतींचीहि त्यांना उत्कृष्ट माहिती मिळाली होती.

ता. १६ फेब्रुवारी स. १८०७ ला वडिलांच्या असिस्टंटच्या जागीं पुणें वकिलातींत त्यांची नेमणूक झाली. आणि पुढें वृद्धापकालामुळें वडील विठ्ठलराव निवर्तल्यावर त्यांच्या जागीं पोर्तुगिजांचे

वकील म्हणून लक्ष्मीनारायणरावांची नेमणूक करण्यांत आली.

लक्ष्मीनारायणराव यांच्या नेमणुकीचें फर्मान

Porquanto pelo falecimento de Vital Rao Gorqui, Emissario do Estado na Corte de Punem, se acha vago aquelle emprego, e em seu filho Lacximina Narana Rao que o substituio por muitas vezes nos seus impedimentos, concorrem todas as circunstancias precizas de experiencia, zelo e actividade para dezempenhar as obrigaçoens do mesmo emprego: Hey por bem nomear ao dito Lacximina Narana Rao no referido emprego de Emissario do Estado na Corte de Punem, com o mesmo vencimento que percebia seu Pay; de que na Contadoria Geral da Junta da Real Fazenda, e mais partes competentes se farão as clarezas do costume. Palacio de Pangim a 3 de Julho de 1808. —Rubrica do Governador. (A. D. P.— Dr. Pissurlecar.)

लक्ष्मीनारायणराव यांनी पोर्तुगिजांचे पुण्याचे वकील या नात्यानें सन १८११ च्या १५ डिसेंबर पर्यंत फार चांगली कामगिरी बजावली. पोर्तुगीज सरकारप्रमाणेंच पेशवे सरकारचीहि त्यांच्यावर बहाल मर्जी होती. हे जात्याच चतुर असल्यानें आणि वडिलांकडील विविध कामांच्या अनुभवामुळें कोणत्याहि कठिण प्रसंगींहि न गांगरतां त्यांतून कुशलतेनें मार्ग काढून कामांत यश मिळविण्याची कला त्यांना चांगली साधली होती. हे दिसण्यांतहि रुबाबदार व बुद्धिमान होते.

पोर्तुगाल सरकारच्या हुकुमावरून पुणें येथील पोर्तुगिजांची वकिलात गोव्याच्या गव्हर्नरनें १६ डिसेंबर सन १८११ पासून बंद केली. त्यामुळें अर्थातच लक्ष्मीनारायणराव वालावलीकर सहकुटुंब गोव्यांत आले.

गोव्यांत आल्यावर त्यांनी सरकारांत एक अर्ज सादर करून वडिलांप्रमाणें आपणांस कॅप्टनचा हुद्दा व स्वतंत्र पलटण बाळगण्याचे अधिकार मिळावे अशी मागणी केली. त्याचप्रमाणें भास्करराव नांवाच्या आपल्या पुतण्यास त्या पलटणींत आल्फेर चा अधिकार मिळावा असेंहि लिहिलें. तथापि त्या वेळीं हिंदी पलटणींत बदल करण्याचें काम सुरू असल्यानें स्वतंत्र पलटण न देतां त्यांना फक्त कॅप्टनचा दर्जा व पगार देण्याचा पोर्तुगाल सरकारचा गव्हर्नरला हुकूम आला.

पोर्तुगाल सरकारच्या हुकुमाप्रमाणें गव्हर्नर जनरलनें फर्मान काढून लक्ष्मीनारायणराव यांना कॅप्टनचा दर्जा दिला व वेतन सुरू केलें.

वेतन - फर्मान

Conforme a dispozição de S. Mge. participada por V. Exa. ao meu antecessor no seu oficio no. 105 de 25 de Janeiro do ano precedente, estabeleci a Lacximi Naraena Rao Vital

a pensão anua de trezentos e secenta xerafins, equivalente ao soldo do Posto de simples Capitão de sipais...Goa em 12 de Janeiro de 1817.

— Rubrica do Gov.

(A. D. P.— Dr. Pissurlecar.)

कॅप्टन गोरक्ष विठ्ठलराव वालावलीकर यांचाच वंश चालू आहे. नारायणराव ऊर्फ भवानी शंकरराव यांच्या येथें कृष्णराव नांवाचा एकच मुलगा होता. कॅप्टन लक्ष्मीनारायणराव यांचे मुलगे तीन. थोरल्या मुलाचें नांव श्रीपतराव, दुसऱ्याचें महिपतराव व तिसऱ्याचें अमृतराव. श्रीपतराव हे फोंडेंजवळच्या कपिलेश्वरीं येथें स्थायिक झाले होते. त्यांचा एकच वंशज सध्या हयात असून त्याचें नांव आनंदराव असें आहे. त्यांचें वास्तव्य सहकुटुंब वेरें येथें आहे.

कॅ. गोरक्षराव यांना सहा मुलगे होते. पहिला आनंद, दुसरा राम, तिसरा भास्कर चौथा व्यंकटेश, पांचवा गोपाळ व सहावा गोविंद ऊर्फ दौलत.

व्यंकटेशराव हे डिचोली येथें स्थायिक झाले होते. यांचे मुलगे तीन. बलवंत, शिवराय व गणपत. भिकबा हा गणपतरावांचा एकच मुलगा. भिकबारावांचे वंशज सध्या डिचोली येथें आहेत. सुप्रसिद्ध साहित्यिक कै. वामनराव वर्दे वालावलीकर ऊर्फ शेणै गोंयबाब हे भिकबा-रावांच्याच वंशजांपैकीं एक होत.

आनंदरावांना महादेव नांवाचा एकच मुलगा होता. रामरावांनाहि विरुपाक्ष नांवाचा एकच मुलगा झाला. भास्कररावांना पुरुषोत्तम, गंगाधर व चिंतामण असे तीन मुलगे होते. चिंतामण-रावांचें वास्तव्य मुंबई येथेंच होतें. हे धार्मिक भावनेचे गृहस्थ होते. गोपाळराव यांना गोरक्ष व यशवंत असे दोन मुलगे झाले.

कॅ. गोरक्षराव यांचे सहावे चिरंजीव गोविंद-राव ऊर्फ दौलतराव वालावलीकर हे सांगें येथें स्थायिक झाले होते. यांना लाडकोबाराव ऊर्फ शांबाराव, नारायणराव व आत्मारामराव असे तीन मुलगे होते.

शांबाराव वालावलीकर यांचे मुलगे तीन. मंगेशराव ऊर्फ बाबूराव, अनंतराव आणि विश्वनाथराव. अनंतराव हे धार्मिक वृत्तीचे व देवभक्त होते. त्यांच्या दत्तक मुलाचें नांव शांतारामराव असें आहे. विश्वनाथराव यांनाहि तीनच मुलगे झाले. श्रीपादराव, माधवराव व शांतारामराव; हाच अनंतरावांचा दत्तक होय.

आत्मारामराव वालावलीकर यांना मुकुंदराव, गोपाळराव व गोविंदराव असे तीन मुलगे होते. पैकीं पहिले निपुत्रिक, दुसरे श्रीपतरावांकडे, कपिलेश्वरीं, दत्तक गेलेले आणि तिसरे गोविंदराव; यांचें कायम वास्तव्य सांगें येथेंच होतें.

गोविंदराव वालावलीकर यांच्या पहिल्या मुलाचें नांव गोरक्षराव, दुसऱ्याचें दत्तात्रेयराव आणि अंबादासराव हा त्यांचा तिसरा मुलगा होय.

विसाजी नारायण जाखी

नारायण विश्वनाथ शेणवीं जाखी यांचे पूर्वज गोमंतकांतील सासष्टीमधील केळोशी गांवचे रहिवासी होते. त्यांची कुलदेवी श्रीशांतादुर्गा व गोत्र वत्स असून त्यांना वर्दे असें उपनांव होतें. ख्रिस्तीकरणाच्या प्रसंगीं त्यांना आपलें मूळ गांव सोडावें लागल्यानें ते कोंकण भागांत रत्नागिरी-कडे गेले.

नारायण व गोपाळ असे विश्वनाथ शेणवीं यांचे दोनच मुलगे. पैकीं नारायण हा रत्नागिरीस स्थायिक झाला आणि गोपाळ सावंत-वाडीस आला.

विसाजी नारायण जाखी यांना विश्वनाथ नारायण असेंहि म्हणत. हे नारायण शेणवीं यांचे दुसरे चिरंजीव. वडिलांनीं आपल्या या उपजतच हुशार अशा चिरंजिवांना मराठीबरोबरच संस्कृतहि शिक्षण दिलें होतें. त्यांचा थोरला मुलगा गोविंद. आपल्या वृद्धापकालीं आपलें कुलकर्णी-पणाचें काम त्यांनीं या गोविंद शेणवीं यांकडेच संपवलें होतें.

कांहीं कालानें गोपाळ शेणवीं व विसाजी नारायण हे पेडणें महालांत आले. गोपाळ शेणवीं तेथेंच स्थायिक झाले आणि विसाजी नारायण एका वर्षानंतर कोल्हापुराकडे गेले. कोल्हापुरास त्यांचा मुक्काम तब्बल दोन वर्षें होता. या कालांत तेथें त्यांनीं लष्करी शिक्षण घेतलें आणि पुढें लवकरच ते साताऱ्याकडे गेले.

सातारा त्यावेळीं मराठ्यांची राजधानी होती. विसाजी नारायणासारख्या योग्य मनुष्याचा तेथें सरकारी नोकरींत प्रवेश होण्यास विलंब लागला नाहीं. त्यांच्या हुशारीमुळें वरिष्ठांची त्यांच्यावर बहाल मर्जी झाली व कित्येक जबाबदारीचीं कामें देऊन त्यांची कर्तबगारी दिसतांच लगेच त्यांची बढती करण्यांत आली. प्रत्यक्ष रणांगणावरहि जाऊन त्यांनीं आपली तरवार बहाद्दरी दाखविली आहे. तथापि चांगले मुत्सद्दी म्हणूनच त्यांची विशेष प्रसिद्धि झाली.

विसाजीनारायणांची राजकारण-कुशलता पाहून छत्रपति शाहूमहाराज यांनी आपले पंतप्रतिनिधि भवानराव यांच्या मुख्य चिटणीशीच्या जागीं त्यांची कायम नेमणूक केली. पुढें ही चिटणीसी जाखी घराण्याकडे सतत पांच पिढ्यांपर्यंत होती.

मोंगल बादशहा औरंगजेब यानें विशाळगडास वेढा घालून गडबड उडविली त्यावेळीं जाखी यांनी आपल्या शौर्याची व बुद्धीची कमाल केली.

विसाजी नारायण जाखी यांचा व पंतप्रधान बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचा फार घरोबा होता. पेशवे व प्रतिनिधि यांच्यांत वैमनस्य होतें. एकमेकांकडे मोठ्या शत्रुत्वानें वागणाऱ्या या उभयतांत सलोखा घडवून आणण्याचें कार्य विसाजी नारायण जाखी यांनी मोठ्या कौशल्यानें केलें.

तिसां अशर मया व आलफ छ॥ १५ सवाल (स. १७१८) च्या पंतप्रधान बाळाजी विश्वनाथ पेशवे यांनी विसाजी नारायण जाखी यांना लिहिलेल्या पत्रांतील मजकुरावरूनच त्यांच्यांतील घरोबा कळून येतो. पहा —

"पूर्वी अंजनवेलीस असतां आमचें सर्व प्रकारें आपण चालविलें. संकटें आम्हांवरी पडलीं त्या प्रसंगीं आपण आम्हांवरी कृतोपकार फार केला. आम्हांमुळें सर्वस्वें खराब होऊन आमचें संरक्षण केलें. हल्लीं ईश्वरें आम्हांवरी कृपा केली यास्तव आपण आम्हांपाशीं राहवें. आम्हीं सर्व प्रकारें चालवावें हें आमचें मानस. यास्तव आग्रह बहुत केला त्यास आपण सांगितलें जे, आपला वृद्धापकाळ आणि योगक्षेम चालत आहे. ज्यांचे संनिध आहों तेही उत्तम प्रकारें चालवितात. मुलें ठेवावीं तर तीं लहान. यास्तव त्यांचे उपयोगी पडे ऐसें पत्र लेहून द्यावें म्हणोन बोलिलां त्यावरून हें पत्र तुम्हांस लेहून दिल्हें असे. प्रस्तुत आम्हीं आपणास रुपये ७०० प्रतिवर्षी करार करून दिले आहेत. दरसाल प्रविष्ट करूं." (भा. इ. सं. मं. वृ. १८३६ ले. ९)

विसाजी नारायण जाखी यांना नारो, रामचंद्र व काशी असे तीन मुलगे होते. काशी विश्वनाथ यांना व्यंकोजी हा एकच मुलगा. रामचंद्र विश्वनाथ यांनाहि चिटकोबा नांवाचा एकच मुलगा होता. याच्याच वंशजांकडे विसाजी नारायणाच्या वामणोली गांवचें इनाम चालू आहे.

नारो विश्वनाथ यांना बाळाजी व गोपाळ असे दोन मुलगे होते. बाळाजीच्या मुलाचें नांव नारो बल्लाळ. यांचे मुलगे दोन; बाबाजी व रामचंद्र. रामचंद्र नारायण यांनी आपणांस चिटणीस असें उपनांव घेतलें. हरि हा यांचा एकच मुलगा होता. हरिपंत चिटणीस यांना कृष्णाजी हरि चिटणीस व नारायण हरि चिटणीस असे दोन मुलगे होते. यांचे वंशज हल्ली सातारा व पुणें येथें आहेत. यांपैकींच कृष्णराव नांवाचे एक तरुण ब्राझील येथें कॅप्टनच्या हुद्द्यावर होते.

गोपाळ शेणवीं जाखी यांना गोविंद व विश्वनाथ नांवाचे दोन मुलगे होते. गोविंद जाखी यांचे वंशज पेडणें महालांत आरोबा वगैरे ठिकाणीं आहेत आणि विश्वनाथ जाखी यांचे वंशज साष्टी महालांत येऊन स्थायिक झाले होते. हे साष्टींत आलेले त्यांचे वंशज 'ज्याक' असें उपनांव वापरीत. यांपैकीं एका इसमाचें घर मडगांवला, कोंबवाडींत, वशी-तळें ठिकाणच्या वरच्या बाजूनें होतें.

हल्याळकडे असणारे आर्यवैद्य विठ्ठल शेणवीं ज्याक आणि मुंबईस वास्तव्य करणारे बाळकृष्ण ऊर्फ बाळू शेणवीं ज्याक व शांताराम शेणवीं ज्याक हे याच घराण्यांतील होत.

— ४२ —

सरदार यशवंतराव वागळे

वागळे यांचें मूळ घराणें गोमंतकांतील सासष्टी महालांतील कुठ्ठाळी येथील असून त्यांचें कुलदैवत श्रीमंगेश हें आहे. ख्रिस्तीकरणाच्या वेळीं यांचे पूर्वज गोमंतकांतून निघून वेंगुर्लें येथें जाऊन राहिले.

यशवंतराव वागळे यांनी मराठी शिक्षणाबरोबर संस्कृतचाहि थोडा अभ्यास केला होता. दांडपट्टा, लेजिम वगैरे व्यायामशिक्षणहि त्यांना लहानपणापासून मिळालें होतें.

यांच्या वडिलांचा व केरकर घराण्याचा फार घरोबा; त्यामुळें यशवंतराव लहानपणापासून कोणत्या ना कोणत्या कारणानें पेडणें महालांतील केरी येथें येऊन केरकरांकडे राहात. पुढें पुढें त्यांचें वास्तव्यच केरी येथें झालें होतें.

बक्षीबहाद्दर जिवबादादा केरकर हे शिंद्यांचे लष्करी मंत्री व मुख्य सेनापति झाल्यावर यशवंतरावांच्या मनांत शिंदे सरकारांत नोकरीस जाण्याचा विचार घोळूं लागला आणि तसें त्यांनी जिवबादादांना पत्रहि लिहिलें.

यानंतर आपल्या कुलदेवाची भेट घेण्यासाठीं दादा गोव्यांत आले आणि परत जातांना यशवंतरावांना आपल्याबरोबर ग्वाल्हेरास घेऊन गेले.

आरंभीं जिवबादादांनी त्यांचा लष्करांत प्रवेश करून दिला. जन्मजात उत्साही, योग्य शारीरिक शिक्षणानें शरीर कमावलेलें आणि शिस्तीची आवड यांमुळें त्यांचें मन सैन्यांत चांगलें रमलें. लष्करी पेशाचें कोणतेंहि काम ते इतकें मनःपूर्वक करीत कीं, त्यामुळें कोणत्याहि प्रसंगीं वरिष्ठांकडून शाबासकीच मिळावी. त्यांची हुशारी व कर्तबगारी पाहून लगोलग त्यांना बढती मिळत गेली.

वागळे यांनी माळवा व मेवाड येथील लढायांत जें शौर्य व धैर्य दाखविलें त्यामुळें खुष होऊन शिंद्यांनीं त्यांना एका लष्करी तुकडीचे सेनापति केलें. पुढें दिल्लीच्या व राजपुताना इ. ठिकाणच्या लढाईंत सेनापति या नात्यानें त्यांनी मोठा पराक्रम केला. राजपुताना येथील लढाईंत तर पराक्रमाबरोबरच त्यांनी आपल्या अंगच्या और मुत्सद्देगिरीनें सगळ्यांनाच चकित करून सोडलें.

त्यांच्या पराक्रमामुळें स्वतः जिवबादादा तर फार खुष होऊन त्यांनी त्यांच्या बढतीबद्दल शिंद्यांकडे शिफारस केलीच; शिवाय राजे शिंदेहि त्यांच्यावर बेहद्द खुष झाले. त्या प्रसंगीं सगळ्या दरबारी लोकांनी त्यांची मुक्तकंठानें प्रशंसा केली.

वागळे यांचें धैर्य, शौर्य व मुत्सद्देगिरी अवलोकन करून जिवबादादा केरकर यांनी त्यांना शिंदे दरबारचे सरदार करून जहागिरी देण्याची शिफारस केली. लवकरच झालेल्या जाहीर दरबारांत राजे शिंदे यांनीं यशवंतराव वागळ्यांना सरदारकीचीं वस्त्रें, जहागिरीची सनद आणि रत्नखचित मुठीची तरवार देऊन त्यांचा मोठा गौरव केला.

नागपूरकर भोंसले यांना त्यांच्या शत्रूंनी फार छळलें व ते नाना प्रकारांनी त्यांना त्रास देऊं लागले. त्यांचें पारिपत्य करण्याइतकी सुसज्ज फौज नागपूरकरांकडे नसल्यानें त्यांनी शिंद्यांची मदत घेण्याचें ठरविलें आणि त्याप्रमाणें शिंदे दरबारकडे भोंसल्यांचा मदतीबद्दलचा खलिता आला. लष्करी मंत्री व मुख्य सेनापति या नात्यानें तो खलिता राजे शिंदे यांनीं जिवबादादांकडे पुढील व्यवस्थेसाठीं दिला.

त्यावेळीं नागपूरकर भोंसले यांच्या शत्रूंचें पारिपत्य करण्याची कामगिरी सेनापति जिवबादादा केरकर यांनी सरदार यशवंतराव वागळे यांच्यावर संपवली. ते लागलेच आपल्या सैन्यासह नागपूरकडे गेले आणि त्यांनीं भोंसल्यांच्या शत्रूंचा बंदोबस्त केला.

या कामगिरीबद्दल भोंसल्यांकडून सरदार वागळे यांना मिळालेला इनाम गांव त्यांच्या वंशजांकडे सतत चालू होता.

सरदार वागळे हे बराच काल हर्दा येथें शिंद्यांचे सुभेदार अर्थात् गव्हर्नर होते. सुभेदार या नात्यानें हर्दा सुभ्यांत त्यांनीं जनतेची फार सहानुभूति मिळविली. त्यांच्या इतकी लोकप्रियता तेथें दुसऱ्या कोणत्याहि सुभेदारास प्राप्त झाली नाहीं.

वागळे यांचे कांहीं वंशज अजून हर्दा येथें आहेत. जीं कांहीं सारस्वत घराणीं हर्दा येथें आज आहेत तीं सुभेदार वागळे यांच्याच कालीं तेथें स्थायिक झालीं होतीं.

सरदार वागळे हे माळवा प्रांतांतहि सुभेदारीच्या हुद्यावर होते. नर्मदाकांठीं जळोदा येथें त्यांनीं किल्ल्यासारखा मजबूत व सुंदर वाडा बांधून भोंवतालच्या खंदकांत नर्मदेचें पाणी घेतलें होतें. खंदक नेहमीं पाण्यानें तुडुंब भरून राही.

जवळच त्यांच्या हाताखालील लोकांचे अनेक सुंदर वाडे होते. जळोद्याची नगररचना व्यवस्थित, स्वच्छ, हवाशीर व मोहक अशी करण्यांत सरदार वागळे यांची शिल्पकलात्मक दृष्टि सहज दिसून येई.

जळोदा नगरच्या त्या सुंदर व मोहक ठिकाणास जवळपासच्या साऱ्या लोकांनीं 'द्वारका' असें नांव दिलें होतें.

लढाई व राजकारण यांच्याइतकीच वागळे यांना स्नान, संध्या, देवपूजा व अन्य धार्मिक कृत्यें यांचीहि आवड होती. हे नर्मदेवर स्नानास जातांना शिंग वाजे व त्यावेळीं आजूबाजूचे लोकहि स्नानास येत.

सरदार यशवंतराव यांची कीर्ति असह्य होऊन व आपल्या कृष्णकृत्यांस त्यांचा उपसर्ग होऊं नये अशा दुष्ट हेतूनें दौलतराव शिंद्यांचा कारस्थानी नीच श्वशुर सर्जेराव घाटगे यानें आपल्या जामाताकडे भलतीच चुगली करून वागळ्यांना पकडण्याचा परवाना मिळविला आणि त्यांना अपघाती धरून लगेच ठार केलें.

दौलतराव शिंद्यांना हा प्रकार कळला तेव्हां ते अस्वस्थ झाले आणि सरदार वागळे हे निरपराधी असून आपला कारस्थानी मार्ग मोकळा होण्यासाठीं घाटग्यानें ही अरेरावी केल्याचें कळून तर त्यांना विशेष दुःख झालें. वागळ्यांसारखीं माणसें गमावल्याचे दुष्परिणाम दौलतरावांना पुढें लवकरच कळून आले.

सुभेदार नारो शंकर दाणी

दाणी यांचे मूळ पुरुष पेडणें महालांतील असून आबाजी नांवाचा त्यांचा एक इसम तेथून कोंकणमार्गें महाराष्ट्रांत गेला होता. त्यांच्या मुलाचें नांव शंकर दाणी. यांच्या तीन मुलांपैकीं पहिला मुलगा नारो शंकर दाणी हा होय. शौर्य आणि मुत्सद्दीगिरी या उपजत गुणांच्या जोरावर मराठेशाहींत नारोपंत उदयास आले.

माळवा प्रांत जिंकण्यासाठीं जी फौज दक्षिणेंतून उत्तरेंत गेली तींत नारोशंकर उदाजी पवाराचे दिमतीस होते. १७-१०-१७२० च्या मंडलोई दप्तरांतील एका पत्रांत नारोशंकर उदाजी पवार यांच्या सोबत असल्याचा उल्लेख आहे. सन १७३० सालीं मल्हारराव होळकर यांच्याकडे त्यांची नेमणूक झाली. पण लगेच त्यांना कांहीं कारणावरून त्या कामावरून कमी केलें. त्याबद्दल एका पत्रांत मल्हारराव होळकर लिहितात — "रा. तेजकर्ण मंडलोई व कुवर न्यहालकर्ण प. इंदूर गोसावी यांसी स्ने. मल्हारजी होळकर दंडवत. सु. सल्लास सल्लासीन मया व आलफ. तुम्हीं ज्येठमल पाठविला त्यास रा. नारोशंकर यांजला पेशजीस प्र. मजकूरच्या धंद्यावरून दूर केलें होतें. हल्ली जेठमल यानें सांगितलें कीं नारोशंकर प्र. मजकुरास गेलीया प्र. उज्याड होईल. त्यास साल मजकूर नारोशंकर यांजकडून धंदा दूर केला असे. तरी तुम्हीं आपली खातरजमा राखोन तमाम प्र. म. च्या रयतीस कोल करार देऊन आबादी करणें. बोहरे डज्जनीस पळोन गेले त्यांस घेऊन येणें. तुम्हीं कोणे गोष्टीचा वसवसा न धरणें. जे गोष्टीनें परगण्याची कीर्द आबादानी होय तें करणें. जाणीजे. छ २७ रबिलाखर."

"नारोशंकर, अंताजी माणकेश्वर, गोविंदपंत बुंदेले वगैरे मंडळी आरंभापासून शिंदे होळकरांबरोबर उत्तरेंतील उद्योगांत थेट पानपतापर्यंत वावरत होती. नारोशंकर होळकरांसोबत असं. स. १७४२ त नानासाहेब पेशव्यांनी झांशीच्या दक्षिणचें ओर्छा ठिकाण हस्तगत केलेलें. हातचें गेलें तें परत घेण्याची नारोशंकरास आज्ञा झाली. या कामावर ते कित्येक वर्षें होते. शिंदे होळकरहि जाऊन येऊन त्या उद्योगावर असून त्या संबंधांत रामचंद्रबाबास लिहिलेलीं पेशव्यांचीं कित्येक पत्रें उपलब्ध आहेत." (पारसनीस संग्रह)

त्यावेळीं नारो शंकर यांनी पेशव्यांस लिहिलेलें ३१-५-१७४६ चें एक पत्र श्री. गुप्ते यांतर्फे उपलब्ध झालेलें आहे. अखेरीस ओर्छा जिंकून झांशी सुभा नारो शंकर यांनींच मोठ्या शौर्यानें हस्तगत केला. (२८-११-१७५०).

पुढें पेशवे सरकारनें झांशीचे सुभेदार म्हणून नारोशंकराचीच नेमणूक केली. तो तीस पसतीस लाख उत्पन्नाचा प्रांत हस्तगत केल्याबद्दल पेशवे दरबारनें त्यांचा मोठा सन्मान केला. खुद्द झांशी

त्यावेळीं एक खेडें होतें. त्याची वसाहत व सुधारणा करण्यासाठीं स्वतः नारो शंकरांनी फार मेहनत घेतली. लाखों रुपये खर्च करून सुभ्याच्या राजधानीस योग्य असें झांशीचें सुंदर शहर बनविलें.

नारोपंतांची कामगिरी व पेशव्यांची त्यांच्यावरील मर्जी पाहून त्यांच्या कांहीं हितशत्रूंच्या पोटांत मळमळूं लागलें. त्यांनी त्यांच्याविरुद्ध पेशव्यांकडे अनेक कागाळ्या केल्या. पेशव्यांनी त्यांना पुण्यास बोलावून आणलें. ते नौबत वाजवीत शहरांतून पेशव्यांकडे वाड्यांत गेले व तेथें त्यांनी उतरण्यास जागा मागितली. संभाषणांतून इतराजीचा रंग दिसला. तेव्हां दत्ताजी शिंद्यांनी त्यांच्या शौर्याबद्दल, मुत्सद्देगिरीबद्दल व चोख कारभाराबद्दल स्पष्टपणें सांगून खरी गोष्ट त्यांच्या नजरेस आणली व पेशव्यांचें मत बदललें. त्यांनी त्यांचा गौरव करून लगेच पुनः उत्तरेंत पाठविलें (सन १७५७).

पानिपतच्या घनघोर युद्धाच्या वेळीं नारोपंतांकडे दिल्लीच्या संरक्षणाची प्रमुख जबाबदारी संपवण्यांत आली होती.

माधवरावांच्या कारकिर्दीतहि नारोपंतांनी बजावलेली कामगिरी उल्लेखनीय आहे.

भवानराव प्रतिनिधि व पेशवे यांच्यांत कांहीं कारणानें जें वैमनस्य उत्पन्न झालें त्यावेळीं अर्थात् पेशव्यांची भवानरावांवर फार इतराजी झाली व त्यामुळें उभयपक्षीं एकमेकांचे शत्रूच बनले. त्या प्रसंगीं सन १७६२ सालीं प्रतिनिधींचें काम कांहीं दिवस नारोशंकर यांकडे संपवण्यांत आलें होतें. हा हुद्दाहि नारोपंतांनी फार कुशलतेनें चालविला.

नारायणराव शंकर दाणी यांचा कुशल मुलगा त्रिंबकराव नारायण यांची कांहीं दिवस शिंद्यांच्या दिवाणगिरीवर नेमणूक झाली होती. नारोपंत यांचे भाऊ आबाजी शंकर व लक्ष्मण शंकर हेहि त्यांच्या सोबतच शिंदे दरबारांत कित्येक महत्वाच्या कामावर वावरत होते.

लक्ष्मण शंकर यांचा मुलगा विश्वासराव हा कांहीं काल झांशीच्या सुभ्यावर सुभेदार होता.

श्रीमंत माधवराव पेशवे यांच्या कारकिर्दीत मराठ्यांची जी निजामाशीं लढाई झाली त्या लढाईत नारोशंकर यांनी जो पराक्रम दाखविला त्याबद्दल स्वतः श्रीमंतांनी विस्तारपूर्वक लिहिलें आहे.

नारोशंकर दाणी यांची एक जुनी बखर इतिहासाचार्य राजवाडे यांनीं प्रकाशनांत आणली आहे.

आबाजी दांडी यांचा मुलगा शंकर व शंकरराव यांचा ज्येष्ठ चिरंजीव नारोपंत होय.

नारोपंतांना राघोपंत व त्रिंबकराव असे दोन मुलगे होते. त्रिंबकपंतांचे मुलगे चार. रंगराव, गोपाळराव, केशवराव व माधवराव. गोपाळराव

यांचा मुलगा शिवराव यानेंच नारोशंकर यांची सदरील बखर लिहिलेली आहे.

— ४४ —

राजाज्ञा उद्धव योगदेव

उद्धव योगदेव यांचे पूर्वज पेडणें महालांतील पालयें येथील असून तेथून ते सावंतवाडीस व नंतर महाराष्ट्रांत गेले.

छत्रपति श्रीशिवाजीमहाराज यांच्या प्रधान-मंडळांत राजाज्ञा-पद नव्हतें. "औरंगजेबानें रायगड काबीज करून सन १६९० सालीं येसूबाई, श्रीशाहूछत्रपति वगैरे मंडळीस पकडून नेलें त्यावेळीं त्यांच्याबरोबर उद्धव योगदेव नांवाचा राजाज्ञा होता." असा उल्लेख बखरींतून मिळतो.

त्यावरून पहातां असें दिसतें कीं, राजाज्ञा-पद श्रीशिवाजीमहाराज यांच्या मागें फार करून छत्रपति श्रीसंभाजीमहाराज यांच्या कारकिर्दीत उत्पन्न झालें असावें. इतर अष्टप्रधानांप्रमाणेंच राजाज्ञा याचाहि दर्जा असून सरकारी कागद-पत्रावर 'संमत सरकार' अशीं अक्षरें लिहून इतर प्रधानांप्रमाणेंच तोहि सही करी.

श्रीशाहूछत्रपतींच्या कालांत या राजाज्ञाची फार महती होती. श्रीशाहू बादशहाच्या कैदेंत असतांना त्यांचा राजकीय कारभार खुद्द उद्धव योगदेव हेच पहात होते. यांनींच प्रथम मुलगी पसंत करून श्रीशाहूंचें लग्न झालें.

श्रीशाहू सुटून दक्षिणेंत आले त्यावेळीं उद्धव योगदेव हे येसूबाईबरोबर दिल्ली येथें गेले होते. यांच्या मागें त्यांचा मुलगा रंगराव उद्धव हा राजाज्ञा-पदावर होता. हाहि कुशल राजकारणी होता.

राजाज्ञा उद्धव योगदेव हे राजकारणांत मोठे कुशल होते. कोणत्याहि कठिण प्रसंगीं हताश न होतां मुत्सद्देगिरीनें त्यांतून ते मार्ग काढीत. त्यामुळें श्रीशाहूंची त्यांच्यावर फार मर्जी होती.

— ४५ —

दिवाण रामाजी अनंत दाभोळकर

दाभोळकर यांचें मूळ घराणें पेडणें महालांतील कोरगांव येथील असून पुढें त्यांचा एक पुरुष दाभोळला, तेथून रत्नागिरीस व यानंतर त्याच जिल्ह्यांतील बसणी गांवांत जाऊन स्थायिक झाला. कित्येक हें घराणें सारस्वत म्हणतात तर कित्येक कोंकणस्थ म्हणतात. रियासतकार सरदेसाई यांचें मत हें घराणें कोंकणस्थच असें आहे. या घराण्याचें मूळचें उपनांव काय होतें हें निश्चित कळत नाहीं. कित्येक म्हणतात त्यांचें मूळचें उपनांव 'मोळये' आहे; तर कित्येक म्हणतात तें 'काळे' आहे. मोळये असल्यास सारस्वत असें म्हणतां येईल व काळे असल्यास कोंकणस्थ हेंच खरें. कांहीं का असेना उपनावांशीं किंवा वर्णाशीं पहावयाचें नसून दिवाण रामाजी पंत यांच्या कामगिरीकडेच आपल्याला पहावयाचें आहे.

रामाजीपंत कोंकणांतून महाराष्ट्रांत गेले व पुणें येथें जाऊन कित्येक दिवसांच्या खटपटीनंतर त्यांनी एका सरदाराकडे नोकरी धरली. पुढें त्याच सरदाराच्या वशिल्यानें श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या हिशेबी कचेरींत त्यांना कारकुनाची जागा मिळाली.

कारकुनींत त्यांची कुशलता दिसून आल्यावर त्याच खात्यांत त्यांची बढती झाली. पुढें त्यांचा प्रवेश दरबारांत झाला. दरबारांतील कामें मुत्सद्दीपणानें कुशलतनें हाताळण्याची त्यांची पात्रता पाहून दिवाण रामचंद्र मल्हार सुखठणकर यांच्या नंतर ता. २४ जून सन १७५० रोजीं पेशवे सरकारनें त्यांची नेमणूक शिंदे यांच्या दिवाणाच्या जागीं केली. दिवाणगिरीचीं वस्त्रें देऊन पेशव्यांनी त्यांना उत्तरेकडे पाठविलें त्या वेळीं पुणें येथें त्यांच्या मित्रमंडळीनें त्यांचा फार गौरव केला.

त्यांच्या दहा वर्षांतील कारकिर्दीची त्यांनी पेशवे दरबारांत लिहिलेली सर्वच पत्रें राजकारणांतील त्यांच्या ज्ञानाचें व्यवस्थित दिग्दर्शन करतात. त्यांचीं बहुतेक सारीं पत्रें उपलब्ध आहेत.

शिंद्यांच्या दिवाणगिरीवर असतांना तें काम संभाळून ते लढाईवरहि जात असत. त्यांनी लष्करी शिक्षण व्यवस्थित घेतल्यामुळें त्यांच्या लष्करी हालचालीहि व्यवस्थित होत असत. ते मोठे तरवारबहाद्दर होते.

पानपत - संग्रामांत रामाजीपंतांनींहि भाग घेतला होता. त्यांच्या तरवारीनें अनेक शत्रूंना कापून काढलें होतें. पुढें लढाईचें पारडें फिरून पानपतावरील पळ सुरू झाल्यावर नाना फडणीस, रामाजी अनंत, बापूजी महादेव यांनी आपणाजवळील सर्व कांहीं टाकून देऊन लंगोट्या लावून मध्यरात्रीं निसटण्याचा प्रयत्न केला. जातां जातां रणभूमीच्या पश्चिमेच्या बाजूस दहा बारा कोसांच्या अंतरावर ते पोंचले. पाठलाग करणारे शत्रुपक्षीय लोक धांवत येऊन त्यांनी त्यांना पकडलें व त्यांचा कसून झाडा घेतला. बापूजीपंत यांचें त्यांनी मुंडकेंच कापलें आणि रामाजी अनंत दाभोळकर यांच्या पायांवर वार केल्यानें ते खालीं कोसळले. इतक्यांत दुसरा एक सैनिक धांवत येऊन त्यानें त्यांचें मस्तकच धडापासून वेगळें केलें. या गडबडींत नाना फडणीस मात्र बचावला व व्यवस्थित पळून गेला.

रामाजी अनंत दाभोळकर यांची वंशावळ अशी मिळते. कृष्णा दाभोळकर हा मूळ पुरुष. कृष्णाच्या येथें एकच मुलगा नारायण व त्याचाहि एकच मुलगा अनंत. हेच अनंत रामाजी दाभोळकर रामाजी अनंत दाभोळकर यांचे वडिल होत. यांच्या थोरल्या बंधूचें म्हणजे अनंत रामाजीच्या वडिल मुलाचें नांव हरि अनंत असें होतें. रामाजीपंतांना व्यंकटराव व मोरोपंत असे दोन मुलगे होते. व्यंकटरावांना नारायणराव नांवाचा मुलगा होता. त्यांना बाळकृष्ण नांवाचा एकच चिरंजीव. या बाळकृष्णरावांचा दामोदर व दामोदराचे दोन मुलगे नारायण व गोपाळ असे होते. नारायणरावांना भालचंद्र नांवाचा एकच मुलगा होता.

रामाजी अनंत दाभोळकर यांना नगर जिल्ह्यांत अकोळनेर येथें पेशव्यांकडून जहागीर मिळाली होती. ही जहागीर अलीकडे सुद्धां त्यांच्या वंशजांकडे चालू होती.

— ४६ —

मंगेश शेणवीं देशपांडे

गोमंतकाच्या सासष्ट विभागांतील कुड्डाळ गांवचे पूर्वी जे कित्येक गांवकर होते त्यांपैकींच मंगेश शेणवीं हे एक होत. ज्यावेळीं गोमंतकावर आदिलशाही सत्ता चालू होती त्यावेळीं सन १४९० च्या सुमारास रोजगारासाठीं त्यांनीं सरकार-दरबारांत प्रवेश केला.

मंगेश शेणवीं यांचे वडील नुकतेच निवर्तले होते. भाईबंदांनीं उत्पन्न बळकावून त्यांना कफल्लक बनवलें होतें. चरितार्थासाठीं त्यांना कांहीं व्यवसाय शोधणें अपरिहार्य होतें. ते वयानें तरुण, घोड्यावर बसण्यांत पटाईत, भालाफेंकीत व तरवार चालविण्यांत हुशार अन् शिकारीचेहि नादी होते. त्यांची लेखणी तर फरडीच होती. अशा माणसाला कोण जवळ करणार नाहीं ?

गोवानगरींत आदिलशहाच्या वाड्यांत एका सद्‌गृहस्थाच्या वशिल्यानें त्यांनीं प्रवेश केला आणि आदिलशाहीसत्तेचे गोमंतकाचे सुभेदार यांनीं त्यांना जवळ केलें. सुभेदारींत कारकुनी-च्या कामावर असतांना त्यांची कुशलता पाहून सुभेदारांनीं विजापूर दरबारांत त्यांच्याबद्दल शिफारस केली आणि सन १४८६ च्या सुमारास विजापूरचे बादशहा आदिलशहा यांकडून त्यांना खानापूर परगण्याच्या देशकुलकर्ण्यांची सनद मिळाली. या देशकुलकर्ण्याला देशपांडे असेंहि म्हणत आणि त्यांकडे देशाच्या जमाबंदीचा हिशेब असे. या अधिकाऱ्याला वेतनाबद्दल ठरा-विक जमीन इनाम असे. हे अधिकार मिळाल्या-पासून मंगेश शेणवीं यांना देशपांडे असें उपनांव प्राप्त झालें.

मंगेशराव लेखणीनें हुशार असल्याचें सर्वांना माहीत होतेंच; पण अनेक महत्वाच्या प्रसंगीं ते शूर व मुत्सद्दी असल्याचें दरबारच्या निदर्शनास आल्यानें त्यांना देसायांप्रमाणें नाडगौडाचेहि अधिकार देऊन जरूरीपुरतें थोडें सैन्य बाळग-ण्याचीहि मुभा दिली. तसेंच खर्चासाठीं खास इनाम जमिनीहि दिल्या.

परगण्यांतील देसायांनीं कांहीं कारणानें बंड-वाल्यांस सामील होऊन बंड केलें. त्यावेळीं देशपांडे यांनीं बंडांत सामील न होतां सरकारास मदत केली व बंडाचा मोड केला. सदर प्रसंगीं देशपांडे यांनीं दाखविलेलें शौर्य कौतुकास्पद आहे. त्या रागानें बंडवाल्या लोकांनीं रात्रीच्या वेळीं सारे लोक झोपेंत असतांना देशपांडे यांचें घर जाळून टाकलें. खुद्द देशपांडे व त्यांची मंडळी कांहीं कारणानें बाहेरगांवीं गेली होती, म्हणून त्या कृष्णकृत्यास त्यांना अनुकूल संधि मिळाली. पण त्या गडबडींत देशपांडे यांच्या ज्या अनेक वस्तु अग्नीच्या भक्षस्थानीं गेल्या, त्यांत सनदाहि जळून गेल्या.

पुढें त्यांना दरबारकडून दुसऱ्या सनदा देण्यांत आल्या. आदिलशाहीनंतर मराठ्यांच्या सत्तेंतहि या घराण्यानें आपली ठीक कुशलता दाखविली.

मंगेश शेणवी देशपांडे यांच्यामागें विठोजी शेणवी, तानाजी कृष्ण, विठोजी अनंत, संभाजी महादेव, मंगेश रामचंद्र असे या घराण्यांत बरेच मुत्सद्दी होऊन गेले.

तुडयें, कुसमळी, तीर्थकुंडे, अंकले, होनकल, ढोकरवाडी अशा पूर्वकालीन इनाम जमिनी देशपांडे घराण्याकडे अगदीं अलीकडेसुद्धां चालू होत्या. हें इनामदार देशपांड्यांचें घराणें बेळगांव जिल्ह्यांतील खानापूर येथें असून हल्लीं त्यांचे वंशजहि तेथेंच राहात असतात.

— ४७ —

अनंत रामचंद्र होनवाडकर

होनवाडकर यांचें घराणें मूळचें पेडण्याकडील असून त्यांचा एक वंशज रामचंद्र शेणवी हा कुडाळ प्रांतांत कुलकर्ण्याच्या कामावर जाऊन राहिला होता. हा मोठा देवभक्त असल्यानें तीर्थयात्रेची संधि कधींहि दवडीत नव्हता. हा काशीयात्रेस गेल्यावेळीं त्याला स्नान करतांना गंगा नदींत तीन बाणलिंगें मिळालीं. तीं आणून कुडाळ प्रांतांत त्यानें तीन ठिकाणीं स्थापन करून देवालयेंहि बांधलीं.

रामचंद्र शेणवी यांना त्यांच्या उतार वयांत एकच मुलगा झाला. त्याचें नांव अनंत. हा जन्मतःच मोठा चतुर होता. बौद्धिक शिक्षणा-सोबतच याला शारीरिक शिक्षणहि लाभल्यानें तो तरवार चालविण्यांतहि हुशार बनला. पुढें कांहीं कालानें विजापूर दरबारांत त्याचा प्रवेश झाला व अनंतराव म्हणून प्रसिद्धीस आला.

अनंतराव कित्येक लढायांत रणांगणावर प्रत्यक्ष हजर होते व त्या त्या युद्धांत त्यांनी चांगली तरवारहि गाजविली होती. आदिलशहाच्या दरबारांतील हे एक प्रसिद्ध मुत्सद्दी होते. खुद्द आदिलशहा बादशहांना यांची मुत्सद्देगिरी बऱ्याच वेळां हितकारक झाल्यानें ते त्यांना फार मानीत. त्यांच्या शौर्याबद्दल व राजकारणाबद्दल खुष होऊन आदिलशहानें त्यांना पालखीचा मान, मशाल व विजापुराकडील होनवाड हा गांव इनाम दिला होता. होनवाड इनामगांवांमुळें पुढें यांना होनवाडकर असें उपनांव मिळालें.

अनंतराव होनवाडकर यांची बायकोहि खंबीर मनाची व शूर होती. एके दिवशीं होनवाडच्या आपल्या वाड्यांत ती दरवान व दासी यांच्यासह कांहीं कारणानें एकटीच राहिली होती. चोरांनी संधि साधून मध्यरात्रीच्या सुमारास वाड्यावर हल्ला केला आणि दरवाजा न उघडल्यास वाडा पेटवून देण्याची त्यांनी दहशत घातली. दरवान व दासी घाबरली आणि दरवाजा उघडण्याचा विचार करूं लागलीं.

बाई त्यावेळीं नागिणीसारखी चवताळली आणि तिनें उभयतांना खोलींत ढकलून कुलूप लावलें. बाहेर चोरांचा जमाव बराच होता तो गडबड करूं लागला व दरवाजावर धक्के देऊं लागला. दिवाणखान्यांत पतीची बंदूक होती; ती व्यवस्थित भरून शांतपणें ती दरवाजाजवळ गेली आणि दाराजवळच्या भोंकांतून तिनें गोळी घातली. गोळी वर्मी लागून चोरांचा पुढारीच गतःप्राण झाला. हा प्रसंग पाहून तें धूड घेऊन चोरांनी पोबारा केला. हिचें नांव उमाबाई असें होतें.

पतिनिधनानंतर ही सती गेली. होनवाडास अजून तिचें वृंदावन असून तिकडचे लोक या सतीला नवस करतात. विजापूरकडे कर्नाटकी भाषेंत हिचे पोवाडे गाण्यांत येतात.

होनवाडकरांच्या वंशांतील वामनराव होनवाडकर नांवाचे एक गृहस्थ बेळगांव जिल्ह्यांतील कोकटनूर येथें येऊन स्थायिक झाले होते. रामकृष्णराव होनवाडकर यांचे हे वडील होत.

रामकृष्ण वामन होनवाडकर हे सज्जन गृहस्थ होते. यांच्या येथें दान-धर्म बराच होत असल्यानें लोकांची गर्दी होई. सन १९२७ च्या सप्टेंबरांत वयाच्या ८० व्या वर्षी यांनी इहलोक सोडला.

— ४८ —

साबाजी अनंत

यांचे पूर्वज गोमंतकांतील अंत्रूज महालांतील असून बराच काल तेथें त्यांचें वास्तव्य होतें. कांहीं कालानें साबाजी अनंत यांचे वडील विजापूर येथें जाऊन राहिले. तेथेंच साबाजी यांचा जन्म झाला. विद्यार्जनानंतर तरुणपणीं साबाजी अनंत यांचा अहमदनगरला निजामशाहींत प्रवेश झाला. निजामशहाच्या दरबारांत येतांच त्यांच्या बुद्धीचा प्रकाश फांकला व ते बरेच प्रसिद्धीस आले. अहमदनगरला निजामशहाच्या दरबारांत त्यांच्या इतके हुशार व बुद्धिमान मुत्सद्दी दुसरे नव्हते.

मोंगल राजवटींत अकबर बादशहाच्या दरबारांत जसा बिरबल चमकला, तसाच अहमदनगरच्या निजामशाहींत साबाजी अनंताचा प्रकाश पडला. अहमदापासून तिसऱ्या मूर्तजापर्यंतच्या तेराहि निजामशहांच्या राजवटींत सन १४९० ते स. १६३३ पर्यंतच्या कालांत साबाजी अनंतासारखा अन्य चतुर मुत्सद्दी निजामशाहीला लाभलाच नाहीं.

बादशहा अल्पवयी, राज्यकारभारांत गडबडी आणि निजामशाही बुडविण्याचा मोंगल बादशहाचा महान प्रयत्न अशा प्रसंगीं साबाजी अनंत यांनी राज्यव्यवस्था उत्तम रीतीनें चालवून मोंगलांचा शहाणपणा चालूं दिला नाहीं.

शहाजी भोंसले यांना अगत्यपूर्वक तिकडे नेऊन बादशहाकडून दरबारची सरदारकी व वजिरी देण्यांत साबाजी अनंत यांनी बरेंच अगत्य दाखविलें होतें.

साबाजींनी जमिनीची मोजणी करून नवीन पद्धतीनें धारा बसविण्यांत फार कुशलता दाखविली. यांनीं प्रोत्साहन देऊन बऱ्याच ओसाड जमिनी लागवडीस आणल्या. रयतेस तगाई दिली. जरूर तेथें जनावरेंहि दिलीं आणि राज्याचें उत्पन्न वाढविलें. बिरबलासारख्या, चातुर्याच्या यांच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत.

साबाजी अनंत यांची विद्वत्ता व बुद्धिमत्ता असामान्य असल्यानें जनता व दरबार यांकडून त्यांना 'चतुर साबाजी' असें नामाभिधान प्राप्त झालें होतें. यांच्याबद्दलचे कांहीं उल्लेख शिवप्रताप व शिवदिग्विजय या पुस्तकांत मिळतात.

— ४९ —

नरोत्तमपंत सौदागर

नरोत्तमपंत सौदागर यांचे पूर्वज बार्देस महालांतील असून त्यांपैकीं एक इसम सावंतवाडीकडे गेला होता. वाडीस स्थायिक झालेला हा इसम नरोत्तमपंतांचा आजोबा होय.

वाडकर सावंतांच्या भरभराटीच्या कालांत नरोत्तमपंतांचा दरबारांत प्रवेश झाला. ते चांगले बुद्धिमान असल्यानें त्यांचा उदयहि लवकरच झाला. हे प्रथम हवालदार व नंतर नगरकोतवाल होते. तेव्हांपासून त्यांना हवालदार हेंच उपनांव मिळालें. पुढें लवकरच त्यांना दरबारच्या सरदारकीचा मान मिळाला व वार्षिक आठशें रुपये उत्पन्नाची छोटी जहागिरीहि लाभली. यांना पालखीचा मान होता.

दरबारच्या राजकारणी बैठकींत यांचा सल्ला महत्वाचा मानीत. तरवार चालविण्यांतहि हुशार असल्यानें वाडकर सावंतांच्या कित्येक लढायांत यांनीं भाग घेतला होता.

सातर्डें येथें या हवालदारांचा एक वाडा होता.

नरोत्तमपंत हवालदारांचे वंशज वेंगुर्लें येथें असून पुण्यासहि एक इसम आहे.

— ५० —

रघू नाईक पार्सेकर

रघू व्यंकटेश नाईक पार्सेकर यांचें घराणें पेडणें महालांतील पार्से येथील असून हे चांगले मुत्सद्दी असल्याचा उल्लेख मिळतो; तथापि त्यांचें कार्यक्षेत्र कोठें होतें याबद्दलची स्पष्ट माहिती मिळत नाहीं.

— ५१ —

संगलै पै

उत्तर कोंकणचे सत्ताधीश महामंडलेश्वर शिलाहार पहिले अपराजित यांचे संगलै पै हे मुख्य प्रधान असून त्यांचे चिरंजीव अणप्पै हे त्यांचे प्रतिहस्त होते, असा सदर सत्ताधीशांच्या स. ९९७ च्या शासनपट्टयांत उल्लेख मिळतो. संगलै पै हे लोटली गांवचे गांवकर व श्रीरामनाथ देवाचे महाजन होते. हे शूर आणि मुत्सद्दी असून अनेक लढायांत यांनीं यश मिळविलें होतें.

— ५२ —

सरदार सदाशिव मल्हार

सरदार सदाशिव मल्हार यांना भाऊ दिवाण व भाऊ बक्षीहि म्हणत. हे मोठे बुद्धिमान, मुत्सद्दी, तसेच तरवारबहाद्दरहि होते. यांचीं राजकारणी कारस्थानें और असत.

सदाशिवराव भाऊ हे प्रथम शिंद्यांच्या दिवाणगिरीवर होते, त्यामुळेंच त्यांना भाऊ दिवाण हें नामाभिधान प्राप्त झालें. यांनी अनेक राजांकडे शिंद्यांतर्फे राजकारण केलें आहे. पेशवे, नागपूरकर भोंसले, गायकवाड व दक्षिणेंतील कित्येक राजांकडील शिंद्यांचे तह यांच्याकडूनच झालेले आहेत.

मराठे व इंग्रज यांच्यांतील अत्यंत महत्वाच्या राजकारणप्रसंगीं इंग्रजांनी सदाशिवरावांना चार लक्ष उत्पन्नाचा 'भडोच' महाल सन्मानपूर्वक जहागीर म्हणून दिला आणि तो मुलूख सदाशिवरावांनीं शिंद्यांच्याच राज्याला जोडला. या मुलखांतील नर्मदा कांठीं असलेलें शुक्लतीर्थाचें क्षेत्र तेवढें त्यांनी स्वतःकडे ठेवलें. या तीर्थास व देवस्थानास त्यांनी तेथील बारा हजार रुपये उत्पन्नाचें इनामगांव पूजा-अर्चा व धार्मिक कृत्यांसाठीं लावून दिलें होतें.

यांचें घराणें गोमंतकीय असून ख्रिस्तीकरण-प्रसंगीं त्यांचे पूर्वज सावंतवाडीकडे गेले होते.

— ५३ —

वामन कामती

तिसवाडी महालांतील दिवाडी बेट पोर्तुगिजांच्या सुरवातीच्या कालांत बरेंच प्रसिद्ध होतें. तेथील नागरिक सुसंस्कृत व बुद्धिमान होते. दिवाडी येथील वामन कामती हे मोठे चतुर गृहस्थ होते. त्या बेटांतील गांवकर जमातींत बुद्धिमत्तेंत यांचें नांव तेथील रवळू कामती-इतकेंच प्रसिद्ध होतें.

गोव्यांत फिरंग्यांचा प्रवेश होतांच ख्रिस्तीकरणाच्या कार्यास त्यांनी सुरवात केली. ख्रिस्ती झालेल्यांना नाना प्रकारचीं बक्षिसें देऊन खुष करण्यास स्वतः आल्बुकेर्क मनःपूर्वक झटत असे. ता. १ एप्रिल सन १५१२ रोजीं पोर्तुगालच्या राजास पाठविलेल्या पत्रांत तो लिहितो कीं, "येथील कांहीं ब्राह्मण व नाईक वगैरे ख्रिस्ती झाले आहेत; तथापि अजून पुष्कळ आहेत." हे जे हिंदु शिल्लक होते त्यांत रवळू कामती, वामन कामती वगैरे प्रमुख होते.

कामतीचा सरकारी अधिकाऱ्यांकडे फार परिचय होता. खुद्द गव्हर्नरांकडेहि त्यांचें वजन असे; तथापि हिंदुधर्म सोडण्याची त्यांचीं मुळींच तयारी नसल्यानें त्यांनी मोठ्या कुशलतेनें त्यांना बगल देऊन परधर्म स्वीकारण्याचें टाळलें होतें.

श्रीसप्तकोटेश्वराच्या देवालयाजवळ यांचें घर असून त्या देवालयाजवळ असलेल्या संस्कृत विद्यालयाच्या चालकवर्गाशीं यांचा संबंध होता. पुढच्या कालांत यांचें वास्तव्य ग्वाल्हेरास असून ग्वाल्हेर दरबारच्या परराष्ट्रखात्यांत ते अधिकारी असल्याचा उल्लेख मिळतो.

— ५४ —

कॅप्टन भीमाजीराव देशपांडे

कॅप्टन भीमाजीराव हे राजकारणी, तसेच धाडसी वृत्तीचे होते. यांच्या पलटणींत दोनशें लोक होते. कित्येक लढायांत यांनी धाडसी वृत्तीनें तरवार गाजविली.

ता. २३ जानेवारी सन १७३९ रोजीं दिगी घाटांतून उतरलेलें मराठ्यांचें सैन्य पारोड्याच्या बाजूनें रात्रीं साष्टींत शिरलें. मुळें येथून थेट बाणावली अशा दिशेनें मराठे मडगांवजवळ पोंचले, व त्यांनी तेथें तळ दिला. त्यांच्या सैन्यांत ४ हजार घोडेस्वार, ६ हजार पायदळ व २ हजार पेंढारी असे लोक होते. या फौजेचा मुख्य सेनापति बाजीराव पेशवे यांचा मेहुणा व्यंकटराव घोरपडे व त्यांचा सहाय्यक दादाजीराव भावे नरगुंदकर हा होता. या हल्ल्याच्या वेळीं कॅप्टन भीमाजीराव देशपांडे यांनी फिरग्यांच्या वतीनें दोन हात करण्यांत बरेंच धाडस दाखविलें. पुढें मराठ्याच्या सैन्यानें २६ जानेवारी रोजीं मडगांव घेऊन साष्टींत आपला अंमल बसविला ही गोष्ट वेगळी.

— ५५ —

मुकुंदराव देशपांडे

कॅप्टन भीमाजीराव यांच्याच घराण्यांतील मुकुंदराव हे गृहस्थ आहेत. हे तरवारबहाद्दर नसले तरी राजकारणांत मोठे चतुर म्हणून यांची प्रसिद्धि आहे.

सन १७९१ सालीं फिरंग्यांनी सदाशिवगड काबीज केला त्यावेळीं जीं राजकारणें झालीं त्यांत फिरंग्यांतर्फे कुशलतेनें राजकारण करून यांनी चांगली प्रसिद्धि मिळविली.

देशपांडे यांचे वंशज हल्ली पणजी येथें असून न्या. मू. शिवराम बळवंत राव, श्री. रवळोबा राव, वकील श्री. माधव यशवंत राव इ. गृहस्थ याच घराण्यांतील आहेत.

— ५६ —

देवजी मुकुंद लाड

देवजी मुकुंद लाड हे सरदार लखबादादा लाड यांचे बंधु असून राजकारणांत मोठे कुशल होते. यांना गोवें दरबारांत फार महत्व होतें. पोर्तुगिजांच्या वतीनें यांनीं इतर दरबारांतून बरेंच राजकारण केलें आहे. पोर्तुगीज दरबारांतील यांचीं अनेक पत्रें उपलब्ध आहेत.

बंधु लखबादादा लाड यांच्या मार्फतीनें मोंगल बादशहाकडून यांनी गोव्याच्या गव्हर्नरास पालखी-सरंजाम मिळवून दिला होता. फिरंग्यांच्या वतीनें यांनीं राजकारणांत ठळक कामगिरी केली. पोर्तुगिजांच्या सुरतच्या वखारीविषयीं जो तंटा झाला तो चतुरपणें मिटविण्यांत यांची और कुशलता दिसून आली. अनेक राजकारणांत फिरंग्यांनी देवजी मुकुंद यांचें सहाय्य घेतलें होतें.

— ५७ —

कॅप्टन पांडुरंग देवजी लाड

प्रसिद्ध राजकारणी देवजी मुकुंद लाड यांचे हे चिरंजीव. यांना आरंभीं ३० शिपायांच्या तुकडीचे अधिकारी म्हणून फिरंगी सरकारनें यांची काणकोण भागावर नेमणूक केली होती. पुढें त्यांची हुशारी पाहून कॅप्टनच्या हुद्यावर त्यांची बढती केली. या नेमणुकीचें फर्मान २६ ऑगस्ट सन १८०० रोजीं निघालें होतें.

कॅप्टन पांडुरंग लाड यांना ग्वाल्हेर दरबारांत जाण्याची संधि लाभली होती; पण ते गेले नाहींत.

कॅप्टन लाड हे चतुर राजकारणी व धाडसी अधिकारी होते.

— ५८ —

विष्णु नाईक सरदेसाई

हे चतुर मुत्सद्दी असून राजकारणांत कुशल होते. विष्णु नाईक हे फोंडें येथील सरदेसाई होते. फोंडें महालांतील प्रतापराव सरदेसाई यांचेच वंशज आहेत.

सन १७५९ व १७६० सालच्या राजकारणी लोकांत यांचें नांव बरेंच झळकतें. मुत्सद्दी वालावलीकर यांच्या प्रभाकर भट श्रोत्रीय, गण शेणवीं मडकैकर इ. राजकारणी सहाय्यकांत विष्णु नाईक प्रमुख होते.

पेशव्यांच्या वतीनें फिरंग्यांकडे राजकारण करून पेशवे दरबारांत विष्णु नाईक यांनी चांगला मान व प्रसिद्धि मिळविली होती.

त्यांनी पुण्याहून फिरंगी सेक्रेतारियु दु इस्तादु यास लिहिलेलीं कित्येक पत्रें उपलब्ध आहेत.

त्याचप्रमाणें त्यांनाहि फिरंगी सरकारतर्फे जीं पत्रें गोव्यांतून पुण्याकडे गेलीं त्यांच्याहि नकला दप्तरांत मिळतात.

विष्णु नाईक यांचें जसें पेशव्यांच्या दरबारांत वजन होतें, त्याचप्रमाणें गोव्याच्या फिरंगी दरबारांतहि त्यांना फार मानीत.

— ५९ —

सरदार जगन्नाथ राम केरकर

हे गोमंतकीय शूर व मुत्सद्दी गृहस्थ बक्षी-बहाद्दर जिवबादादा केरकर यांचे चुलतबंधु होत. शिंद्यांच्या दरबारांत यांचा प्रवेश झाला त्यावेळीं ते लहानशाच कामावर होते; पण पुढें त्यांच्या मुत्सद्दी व धाडसी वृत्तीमुळें त्यांची भराभर बढती होत गेली, व ते लष्करी अंमलदार झाले.

तीन चार लढायांत जें शौर्य त्यांनीं प्रगट केलें त्यामुळें खुष होऊन राजे शिंदे यांनी त्यांना सरदारकीचीं वस्त्रें बहाल केलीं. त्यांना शिंदे दरबारची जहागिरीहि मिळाली होती.

सरदार जगन्नाथराव केरकर यांच्या सैन्यांत १५ हजार घोडेस्वार, २५ हजार गारदी, २०० तोफखानेवाले असे लोक होते. उत्तरेकडील सुभ्यावर त्यावेळीं सरदार केरकर सुभेदार होते.

दिल्लीवर आलेली गिलच्यांची स्वारी परतवून लावण्यांत सरदार केरकर यांनी चांगली धडाडी आणि मुत्सद्देगिरी दाखविली, त्यामुळें ते विशेष प्रसिद्धीस आले.

— ६० —

नीळ नाईक देसाई

नीळ नाईक किंवा निळू नाईक देसाई हे काणकोणचे रहिवासी असून तेथील नाईक देसाई त्यांचेच वंशज होत. हे मोठे धडाडीचे गृहस्थ होते. पूर्वकालास अनुसरून यांचें शिक्षणहि फारसें नव्हतें पण मुत्सद्दीपणांत ते तरबेज होतें. पोर्तुगिजांतर्फे मराठ्यांकडे यांनी बरेंच राजकारण केलें होतें.

काणकोणकडे मराठ्यांचें लष्कर उपस्थित होण्यापूर्वी पोळें येथें पोर्तुगिजांच्या लष्कराची एक पलटण मोठ्या सरंजामानिशीं ठेवण्यांत आली होती, आणि प्रतिकाराची ठीक व्यवस्था लावल्या-नंतर नीळ नाईक देसाई यांना गोव्याच्या गव्हर्नरनी मराठ्यांकडे बोलणें करण्यास पाठवून दिलें होतें.

— ६१ —

गणा शेट

गणा शेट यांचा उल्लेख पोर्तुगीज कागदपत्रांत 'गोना शार्ती' असा आहे. हे मूळचे राहाणारे साष्टीच्या लोटली गांवचे, अर्थात् हे लोटलीकर आहेत. यांना पोर्तुगीज भाषा ठीक येत असून त्यांचें गुजरातीचें ज्ञान तर उत्तमच होतें.

सन १५१३ च्या अक्टोबर महिन्यांत पोर्तुगीज सरकारच्या दुभाषाच्या जागीं यांची नेमणूक झाली होती. यांनी गुजरातमधील खंबायतच्या राजाकडे जाऊन पोर्तुगिजांचे वकील या नात्यानें फार चांगली कामगिरी केल्याचा उल्लेख आहे.

गास्पार कुन्हे याच्या 'लेंदस्' या पुस्तकांत यांच्यासंबंधींची कांहीं माहिती मिळते. "यांना गुजराती भाषा चांगली बोलतां येते" असेंहि त्या पुस्तकांत लिहिलें आहे.

राजकारणांत हे कोणत्याहि चतुर मुत्सद्याला हार जाणारे नव्हते. इतिहासकालांत दैवज्ञ समाजांतील यांच्या इतके दुसरे हुशार मुत्सद्दी दिसत नाहींत. अतएव त्या वंशांत हेच एकमेव होते असें वाटतें.

'लोटलीकर' उपनांवाच्या दैवज्ञ वर्गाच्या पूर्वजांपैकींच हे असावेत असें दिसतें.

गणा शेट यांच्या कामगिरीमुळें खुष होऊन पोर्तुगीज सरकारनें त्यांचा गौरवहि केलेला होता.

— ६२ —

कॅप्टन आत्माराम प्र. दे. देशप्रभु

पेडणें येथील रावराजे देशप्रभु घराणें इतिहासकालापासून प्रसिद्ध आहे. विजयनगर राजवटींत या घराण्याकडे अधिकार आले त्यावेळीं यांचें उपनांव प्रभु एवढेंच होतें. या घराण्यांतील नागेश प्रभु यांना नारसिंह राजाकडून सरदारकीचा मान मिळाल्याचें 'सारस्वत-भूषण' या ग्रंथांत (पृ. ४०३) के. ग. रा. शर्मा यांनीं लिहिलें आहे. पुढें विजापुरकर सुलतानाकडून त्यांना प्रथम देसाई व नंतर देशप्रभु हा किताब व अधिकार मिळाला. देसाई, सरदेसाई, देशप्रभु हे शब्द पंधराव्या शतकापासूनच प्रचारांत आलेले दिसतात. पूर्वीच्या शिलालेखांतून प्रभु, महाप्रभु, नाडप्रभु असे शब्द आढळतात. (Epig. Carn. VL. 6) महाप्रभुऐवजीं पुढें देशप्रभु हा शब्द प्रचारांत आला. देसाई किंवा देशप्रभु यांकडे सारावसुलीचें काम प्रमुख असे. पुढें सैन्य बाळगून लढाईच्या प्रसंगीं राजसत्तेस सहाय्य करण्याची त्यांच्यावर नवी जबाबदारी आली व त्यामुळेंच त्यांना सहज जहागिरदारांची योग्यता आली.

देशप्रभु घराण्याचे मूळ पुरुष गणेश प्रभु हे असून त्यांचे चिरंजीव धाके प्रभु यांच्या येथें महादेव प्रभु यांचा जन्म झाला. सरदार नागेश प्रभु यांचेच हे वडील. नागेश प्रभु यांचेच चिरंजीव आत्माराम प्रभु देसाई हे होत.

"आत्माराम प्रभु यांनी उसप, मणेरी, तेरेखोल, रेडी येथें फिरंगी सरकारच्या वतीनें लढाया मारून गोवें सरकारास मदत केली व जय मिळविला. यांना स. १८२५ सालीं 'आल्फेर' व १८२७ सालीं गोवें सरकारांतून 'कप्तान' असे दोन किताब मिळाले होते" (सारस्वत-भूषण). यांच्या पलटणींत दोनशें शिपाई होते.

कॅप्टन आत्माराम प्र. दे. देशप्रभु हे चतुर मुत्सद्दी व शूरहि होते, त्यामुळें ते राजदरबारांत बरेच चमकले. यांच्या चिरंजीवाचें नांव रघुनाथ प्र. दे. देशप्रभु. हेच वासुदेव प्र. दे. देशप्रभु यांचे वडील. हे मोठे हुशार व कर्तबगार होते. यांना पोर्तुगीज सरकारांतून 'बारांव' हा किताब मिळाला होता. यांचें औदार्यहि उल्लेखनीय होतें.

— ६३ —

व्हिस्कोंदि आत्माराम प्र. दे. देशप्रभु

बारांव वासुदेव प्र. दे. देशप्रभु यांचे हे एकुलते एक चिरंजीव. बाबूसाहेब याच नांवानें हे विशेष प्रसिद्ध होते. मराठी, संस्कृत, पोर्तुगीज अशा अनेक भाषा यांना अवगत होत्या. हे भारदस्त पोर्तुगीज बोलत होते. मराठी व संस्कृत साहित्य आणि वैदिक संस्कृति यांचे हे फार अभिमानी होते. 'प्रमाणसहस्री' वगैरे कित्येक सांस्कृतिक ग्रंथांना यांनी आर्थिक

प्रोत्साहन दिलें आहे. त्याचप्रमाणें अनेक साहित्यिक, विद्वान, कलावंत यांना पारितोषिकें देऊन त्यांचा यथोचित सत्कार केला आहे.

व्हिस्कोंदि बाबूसाहेब देशप्रभु हे चतुर, बुद्धिमान, मुत्सद्दी व गुणज्ञ होते. यांची धडाडी तर कौतुकास्पद होती. यांचें धार्मिक औदार्यहि प्रशंसनीय होतें. दानधर्म नेहमीं सत्पात्रीं व्हावा याकडे मात्र त्यांचा विशेष कटाक्ष असे. यांकडून अनेक धार्मिक यज्ञकार्येंहि मन:पूर्वक घडलीं आहेत.

यांनी आपले चिरंजीव श्री. वासुदेवराव यांच्या उपनयनसंस्कारसमारंभाच्या प्रसंगीं लेले-शास्त्री यांकडून 'संस्कारदर्श' नांवाचा मराठी ग्रंथ लिहून घेऊन प्रसिद्ध केला. उपनयन-समारंभांतील वैदिक लोकांना दक्षिणा वांटण्या-साठीं यांनी खास सुवर्णनाणें तयार करविलें होतें.

व्हिस्कोंदि बाबूसाहेब यांना पोर्तुगाल सरकारां-तून प्रथम बारांव व नंतर व्हिस्कोंदि (व्हायकौंट) अशा पदव्या मिळाल्या. सरकारांत यांचें चांगलें वजन होतें. कोल्हापूरचे राजे शाहू-महाराज यांनी बाबूसाहेबांना आदरपूर्वक आमंत्रण देऊन तिकडे नेलें आणि दरबारतर्फे 'रावराजे' ही वंशपरंपरा पदवी व हत्तीचें वाहन देऊन मोठा सत्कार केला.

रावराजे **वासुदेव आत्माराम प्रभु देसाई देशप्रभु** ऊर्फ काकासाहेब हे व्हिस्कोंदि रावराजे बाबूसाहेब यांचे चिरंजीव. लक्ष्मी आणि सरस्वती या उभय देवतांची कृपा यांच्यावर चांगली आहे. गोमंतकांतील हे प्रमुख जमीनदार व चांगले साहित्यिक आहेत. आचार्यपीठांची अवनति, शहाजी-जिजाबाई यांच्या लग्नाचे परिणाम, नागदेवाचा ताम्रपट, आफ्रिकेचा प्रवास अशीं त्यांचीं कांहीं पुस्तकें प्रकाशनांत आलीं असून कांहीं अप्रकाशित आहेत. निरनिराळ्या नियतकालिकांतून त्यांचे स्फुट लेखहि प्रकाशित झाले आहेत.

श्रीमंत काकासाहेब हे साहित्याभिमानी असल्यानें अनेक साहित्यिकांना यांकडून आर्थिक प्रोत्साहन लाभलें आहे. अत्यंत आवडीमुळें अजूनहि इतर व्यापांतून संधि मिळेल तेव्हां त्यांचें लेखनवाचन चालूच असतें.

रावराजे वासुदेवराव देशप्रभु यांना श्री. रघुराज देशप्रभु व श्री. राजेंद्र देशप्रभु असे दोघे चिरंजीव असून ते सुसंस्कृत आहेत.

रावराजे **रघुराज देशप्रभु ऊर्फ भाऊ-साहेब देशप्रभु** यांच्यांतहि घराण्याची चतुराई आणि औदार्य हे गुण चांगले असून बहुश्रुतपणा व प्रेमळपणा यांची त्यांना जोड आहे. वाङ्मया-चीहि त्यांना अत्यंत आवड असून त्यांचें वाचन नेहमीं चालूच असतें. ते लेखहि चांगले लिहितात.

श्रीमंत भाऊसाहेब हे वाङ्मयाचे जसे अभि-मानी तसेच कलांचेहि गुणज्ञ व रसिक आहेत. कला आणि वाङ्मय या उभय क्षेत्रांत यांचें औदार्य चांगलें प्रगट होतें. कॅप्टन आत्माराम प्र. देशप्रभु यांची धडाडी व व्यक्तिमत्व यांच्यांतहि चांगलें दिसून येतें. यांचे विचार उच्च असून समाजसेवेची आवड कौतुकास्पद आहे. रावराजे भाऊसाहेब यांचा शिक्षणसंस्थांबद्दलचा अभिमानहि प्रशंसनीय असून त्यांच्या घराण्यातर्फे चालू असलेल्या 'व्हिस्कोंदि द पेडणें' कॉलेज,

'श्रीसीताराम पाठशाळा' या शिक्षणसंस्थांवर त्यांची सूक्ष्म दृष्टि असते.

— ६४ —

केशव प्रभु देसाई

केशव प्रभु देसाई हे आजच्या पार्सेकर देसाई यांचे पूर्वज होत. हे दिसण्यांत रुबाबदार व धिप्पाड गृहस्थ होते. यांनी वाडकर सावंत, आदिलशहा, श्रीशिवाजी व पोर्तुगीज यांकडे बरेंच राजकारण केलें आहे. हे मुत्सद्दी, तसेच तरवार चालविण्यांतहि फार हुशार होते.

यांचें मूळ उपनांव प्रभु असें होतें, पण आदिलशहाकडून त्यांना पेडणें महालाच्या पश्चिम भागाच्या देशमुखीची सनद मिळाल्यापासून त्यांना देसाई हें नवें उपनांव मिळालें.

आदिलशहाच्या अमदानींत या भागाचे सरदेसाई, वाडकर भोंसले हे असल्यानें पेडणें येथील सारावसुलीची रक्कम आरंभीं त्यांना वाडकरांकडे सरदेसाई या नात्यानें भरावी लागे.

कुडाळ प्रांत आदिलशहाकडून शिवाजीमहाराजांनी घेतला. त्या प्रांताचे अधिकारी सरदेसाई वाडकर भोंसले लखमसावंत यांनी लगेच स. १६५९ सालीं त्यांच्याशीं तह केला. पण पुन्हा तो आदिलशहास मिळाल्यानें स. १६६० च्या फेब्रुवारींत त्यांनी कुडाळ किल्ल्याचा ताबा घेतला. पुढें लवकरच रुस्तुमजूमच्या विजयामुळें तो भाग आदिलशाहींत आला. लखम सावंताजवळ १२ हजार सैनिक होते. शिवाय त्यांना आदिलशहाचें सहाय्य होतें. तथापि शिवाजीमहाराजाचें त्यांना फार भय वाटे. त्यामुळें स. १६६१ सालीं त्यांनी फिरंग्यांशीं सख्य करून मराठी सैनिकांनी कुडाळवर पुन: हल्ला केल्यास आपणास गोव्यांत आश्रय मिळावा अशी विनंति केली. त्या विनंतीप्रमाणें फिरंगी सावंताला सहाय्य करी. तथापि केशव प्रभु व केशव नाईक ज्या पेडणें महालाची वहिवाट पहात त्याचा ताबा घेण्यास मात्र फिरंग्यांनी सावंतास संमति दिली नाहीं.

पुन: स. १६६३च्या जून महिन्यांत शिवाजीमहाराजांनी कुडाळ प्रांत घेतला. त्यावेळीं आदिलशहाचे तेथील सारे अधिकारी पळून गेले. लखमसावंतहि ६०० शिपायांनिशीं निघून जाऊन घाटाच्या आसमंतांतील अरण्यांत वास्तव्य करूं लागला.

कांहीं दिवसांनंतर आदिलशहाकडून त्र्यंबक काळो या आपल्या फोंडें येथील किल्लेदारास असा हुकुम आला कीं — "लखमसावंत, केशव नाईक, केशव प्रभु, रवळू शेणवीं, चंदा राणे या आमच्या सरदेसाई व देसाई यांच्या सहाय्यानें शिवाजीकडील प्रांत परत मिळवावे. सावंत सरदेसाई व पेडण्याचे केशव प्रभु प्रभृति देसाई राजकारणांत हुशार आहेत." तथापि त्र्यंबक काळोला धीर झाला नाहीं, ही गोष्ट वेगळी.

श्रीशिवाजी व पोर्तुगीज यांच्या लढाईंत केशव प्रभु पोर्तुगिजांच्या बाजूस होते. मराठी सैन्यानें पेडणें महाल घेतला त्यावेळीं केशव प्रभु इतर देसायांप्रमाणेंच पोर्तुगिजांच्या आश्रयास गेले. युद्धजन्य परिस्थिति जाऊन शांतता होईपर्यंत केशव प्रभु व केशव नाईक हे देसाई पोर्तुगिजांच्या हद्दींत गोव्यांतील सासष्टी येथील कोलवें गावांत वास्तव्य करून होते.

श्रीशिवाजी व पोर्तुगीज यांच्यांत ६ डिसेंबर

१६६७ रोजीं तह झाला. त्या तहान्वयें मराठ्यांनी बार्देसमधील कैद करून नेलेले लोक पोर्तुगिजांकडे परत केले. पोर्तुगिजांनी लखम सावंत (कुडाळ), केशव प्रभु व केशव नाईक (पेडणें), रवळू शेणवी व मल शेणवी (भतग्राम) वगैरे गोव्यांत (जुन्या काबिजादींत) राहाणारे कोंकणांतील देसाई यांचा बंदोबस्त करण्याची हमी देऊन स. १६६८ च्या जूनच्या सुरवातीस त्यांना गोव्याच्या हद्दीबाहेर घातलें (-Portugueses e Maratas — Shivaji—डॉ. पिसुर्लेकर, गोमंतक-इतिहास-दिग्दर्शन, पृ. ४८–ना. भा. नायक).

सन १६८३ च्या डिसेंबरच्या ११ तारखेस संभाजीमहाराजांचा गोव्यावर हल्ला झाला. पोर्तुगीज व मराठे यांच्यांत घनघोर लढाई जुंपली. त्या लढाईत मराठ्यांचे अंकित तळ-कोंकणचे देसाई यांनी फिरंग्यांची बाजू धरली, अर्थात् इतर देसायांप्रमाणेंच केशव प्रभु यांनीहि फिरंग्यांच्या हितींच हालचाल केली. या देसा-यांची यादी आझ्यूद येथील ग्रंथसंग्रहालयांतील एका ऐतिहासिक कागदपत्रांच्या संचांत आहे. तिचें छायाचित्र डॉ. पिसुर्लेकर यांनी आपल्या Tentativas dos Portugueses para a ocupação do Concão या पुस्तकास जोडलें आहे.

— ६५ —

केशव नाईक देसाई

केशव प्रभु व केशव नाईक या पेडणेंच्या उभय देसायांचा उल्लेख पोर्तुगीज कागदपत्रांतून बहुतेक एकत्र मिळतो. केशव प्रभु यांच्याप्रमाणेंच केशव नाईक यांनाहि आदिलशहाकडूनच देश-मुखाची सनद मिळाली. पेडणें महालाच्या दक्षिण भागावर यांचा अधिकार चाले. हे मुत्सद्दीपणांत केशव प्रभुंइतकेच हुशार होते. देशमुखीची सनद मिळाल्यावर यांना देसाई असें नवीन उपनांव प्राप्त झालें. पुढें कांहीं कालानें मराठ्यांकडे चाललेल्या लढाईत आदिलशहातर्फे लढतांना केशव नाईक यांनी यश मिळविल्यानें विजापुरकर दरबारनें त्यांना जसवंतराव अशी पदवी व तरवार देऊन त्यांचा गौरव केला आणि तेव्हांपासून त्यांचें हें नूतन उपनांवच विशेष प्रचारांत आलें.

आजचे आरोबेकर जसवंतराव देसाई हे केशव नाईक यांचेच वंशज आहेत. जसवंतराव देसाई यांच्यासंबंधीं सरदार लखबादादा लाड यांनी गोवें सरकारला लिहिलेलीं बरींच पत्रें इतिहास-खात्यांत आहेत. तशींच देवजी मुकुंद लाड यांचींहि कित्येक पत्रें मिळतात.

संभाजीमहाराज यांच्या लढाईच्या प्रसंगीं गोवें-सरकारची बाजू घेतल्यानें मराठ्यांनी केशव नाईक व केशव प्रभु यांचीं इनामें जप्त केलीं, त्यावेळीं त्या उभयतांची जी स्थिति झाली ती निवेदन करून पोर्तुगिजांकडे सहाय्य मागितलेलीं व फिरंगी सरकारनें त्यांना तशावेळीं सहाय्य दिल्याबद्दलचींहि कित्येक पत्रें दप्तरांत मिळतात.

केशव प्रभु देसाई यांच्याप्रमाणेंच केशव नाईक देसाईहि दिसण्यांत रुबाबदार होते. त्यांची वृत्ति नेहमींच उत्साही असे. केशव नाईक यांच्या वंशजांचा म्हणजे आरोबेकर देसा-यांचा वाडा सध्या आरोबा येथें आहे.

— ६६ —

रवळू शेणवीं देसाई

सन १४८९ सालीं गोमंतक आदिलशाही सत्तेंत गेला आणि सन १४९० पासून त्यांनी ज्यांना देशमुखीचे हक्क बहाल केले त्यांत डिचोली भागाच्या म्हणजे बतग्रामच्या देशमुखीची सनद रवळू शेणवीं यांना मिळाली. रवळू शेणवीं शूर तसेच मुत्सद्दी होते. सुरवातीच्या कालांत आदिलशहाला यांचें फार सहाय्य झालें आहे.

सन १६६३ च्या जूनच्या आरंभीं श्रीशिवाजींनी कुडाळ प्रांत घेतल्यावर सांखळी डिचोली भागाचे आदिलशहाचे अधिकारी मराठ्यांच्या सैन्यास तोंड देण्याइतकी तयारी नसल्यानें तेथून निसटले. मराठ्यांकडील मुलूख परत मिळविण्यासाठीं आदिलशहाकडून फोंडें येथील आपला सुभेदार त्र्यंबक काळो यास जो हुकूम आला त्यांत या प्रसंगीं रवळू शेणवीं आदि देसायांचें सहाय्य घ्यावें असें लिहिलें होतें.

त्यावेळीं डिचोलीचे देसाई रवळू शेणवीं हे तिसवाडींतील पनवेल येथें फिरंगी हद्दींत वास्तव्य करीत होते. ते इतर देसायांप्रमाणेंच अधूनमधून आपल्या शिपायांसह मराठ्यांच्या हद्दींत छापे घालीत. या देसायांना पकडण्यासाठीं विशेषत: कांदोळी येथें वास्तव्य करणारे कुडाळचे सावंत देसाई यांच्या बंदोबस्तासाठीं सन १६६७ च्या नोव्हेंबरांत मराठ्यांनी बार्देसवर हल्ला केला. पुढें त्याच सालच्या डिसेंबरांत फिरंगी व मराठे यांच्यांत तह झाला व त्या तहाप्रमाणें फिरंग्यांनी आपल्या हद्दींतून त्या देसायांना बाहेर रवान केलें. यावेळीं सगळ्यांनी श्रीशिवाजीमहाराजांची माफी मागून पुन: मराठ्यांकडून आपले अधिकार मिळविले असा सभासद यांच्या बखरींत उल्लेख आहे.

डिचोलीचे रवळू शेणवीं यांनीहि श्रीशिवाजीमहाराजांकडे स्वत: जाऊन सलोखा केला व त्यांच्याकडून बतग्रामची देशमुखीची सनद मिळविली. त्यांना मिळालेली मराठ्यांची सनद ती हीच असावी.

डिचोलीचे देसाई रवळू शेणवीं यांचे वंशज लामगांव येथील विश्वासराव देसाई, वेरें (फोंडें) येथील सूर्यराव देसाई आणि डिचोली व नार्वे येथील देसाई हे आहेत (Shivaji, p. 13— —डॉ. पिसुर्लेंकर).

छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांच्यामागें श्रीसंभाजींचा गोवा सरकारकडे पन्हाळा येथूनच मित्रत्वाचा संबंध जुळला; पण पुढें सन १६८२ सालच्या डिसेंबर महिन्यांत फिरंग्यांनी आपल्या उत्तरेकडील मुलखांतून मराठी हद्दींत जाण्यास मोंगलांना वाट दिल्यानें संभाजींनी फिरंग्यांविरुद्ध लढाई पुकारली.

सन १६८३ सालच्या डिसेंबरच्या ११ तारखेस मराठ्यांची फौज साष्टींत घुसून त्यांनी तो प्रांत काबीज केला. त्याच दिवशीं बार्देसवर चाल करून जाऊन तोहि प्रांत मराठ्यांनी घेतला आणि गोवा देखील आतां मराठ्यांच्या ताब्यांत जाणार असें व्हिसिरे कोंदि द आल्व्होर यास वाटूं लागलें (Sambaji— डॉ. पिसुर्लेंकर).

या लढाईत इतर देसायांप्रमाणें बतग्रामचे देसाई यांनीहि फिरंग्यांची बाजू धरली होती.

पुढें सन १६८९ त मोंगलांनी मराठ्यांचा कोंकणांतील सारा मुलूख काबीज केला. त्यावेळीं फिरंग्यांच्या मध्यस्थीनें डिचोलीचे देसाई यांनी मोंगलांकडून देशमुखीची सनद मिळविली.

श्रीराजाराम छत्रपतींची सत्ता जिंजीस प्रस्थापित झाली त्यावेळीं मोंगलांचें बरेंच सैन्य कोंकणांतून तिकडे गेलें. त्यामुळें मोंगलांविरुद्ध लढण्यास इकडील लोकांनां जास्त जोम येऊन मराठी सैन्यानें मोंगलांवर जबरदस्त हल्ले चढविले व त्यांना कोंकणांतून घालवून दिलें. अमात्य रामचंद्रपंतानें संताजी व धनाजी यांच्या सहाय्यानें महाराष्ट्रांतीलहि बराच मुलूख मोंगलांकडून परत मिळविला. या लढाईत मणेरी, सांखळी, सत्तर, फोंडें, चंद्रवाडी येथील देसाई स्वामींचें राज्य देव ब्राह्मणांचें विश्रामस्थान असें मानून मराठ्यांच्या सैन्यांत दाखल झाले. (मराठ्यांच्या गोव्याकडील स्वाऱ्या -- डॉ. पिसुर्लेकर).

डिचोलीचे देसाई रवळू शेणवीं यांचे वंशज यांनीहि त्यावेळीं मराठ्यांकडे जाऊन खुद्द राजाराम छत्रपति यांना भेटून आपला देशमुखीचा अधिकार पुनः मिळविण्याची खटपट केली. छत्रपतींचें एक तत्कालीन आज्ञापत्र पुढीलप्रमाणें आहे —

आज्ञापत्र (शिक्का)

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १८ प्रजापति नाम सवत्सरे मार्गशिर्ष शुद्ध सप्तमी इंदुवासरे क्षत्रीयकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति यांणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यांसी आज्ञा केली ऐसिजे. अंताजी सूर्याजी देसाई तपे डिचोली हे हुजूर चंचीचे मुकामी स्वामी सनिध येऊन विदित केलें तें ता। मजकूर पहिले कैलासवासी स्वामी सलाबत जाहाले ते समयीं महालींचें वर्तमान मनास आणिलें आणि तह करून दिधला. देसमुखीचा हक वतन बहूतच होता त्यास दरबार दंडक प्रमाणें देशमुखीस हक सालीना होन निशाणी चारी हजार मोईन करून दिली.

त्यामध्यें आपले आजे सूर्यराऊ देसाई यांस तिघी स्त्रियांचें संतान होतें. वडील स्त्रिंच संतान गणबाराऊ, दुसरे स्त्रिंच संतान नारबा रवल शेणवीं, तिसरे स्त्रिंचें संतान आपला बाप नारबाराऊ यांस तीन तक्षिमा करून देविले. तेणेप्रमाणें चार पांच वर्षं बिलाकुसूर चालिले त्यावरी नारबा रवल शेणवीं यांची वर्तणूक स्वामीच्या पायांसी विरुध प्रकार देखिली. याकरतां राजश्री अनाजीपंत सचीव यांनी त्यास दस्त केलें. घरदार नागवून सहकुटुंब प्रसिद्धगडीं ठेविलें. गणबाराऊ व आपला बाप नारबाराऊ महालीं असते. त्यांस दिवाणांतून जुजबी हक पावत असे त्या उपर नारबा रवल सेणवीं यास पांच हजार होन निशाणी खंड बांधोन सोडिले तो महालास आला हक मोइनी प्रमाणें तिघांस विभागें पावाला त्याणें आपणास खंड पडिला आहे त्याचा निर्वाह करणें आहे याकरितां विभागाप्रमाणें न घ्यावें जुजबी वेचापुरते पावेल ते पावेल वरकड खंडाचे निर्वाहास घ्यावे. खंड झाडा झालियावरी विभागप्रमाणें घ्यावें ऐसें महाली कारकुनाचा निशा करून केलें उभयेतांस जुजबी वेचास पावूं लागले ....

मोंगलांची धामधुम जहाली अबदुलखान फणी यास तो देश जागीर जाहला त्यास रामजीराऊ

भेटोन देशमुखीचा कार्यभाग चालवूं लागला तेव्हां गणबाराऊहि जाऊन जागिरदारास भेटोन त्याच प्र॥ आपुली विले करून घेतली. तिसरा आपला बाप नारबा सूर्यराऊ याणी विचार केला — महाराज स्वामी कर्नाटक प्रांतीं आहेति फौजा पाठवून मोंगलांस मारून काढीत आहेति स्वामीचे राज्य देव ब्राह्मणांचें विश्रामस्तान म्हणून आपण स्वामीचे पायांपासीं एकनिष्ट होऊन जाऊन स्वामीस विनंती करोन आपले वतनाचे विले करून घेऊन स्वामी सेवा करून दाखऊं ऐसा विचार करून स्वामीच्या पायांपासीं यावयास निघाले इतकेयांत त्यास देवाज्ञा जाहाले. सेवक स्वामीचे सेवेसीं आलों आहेत स्वामींनें कृपाल होऊन त्या प्रांतीं राजश्री रामचंद्रपंत अमात्य आहेत व देशाधिकारी आहेत त्यांस आज्ञापत्र दिलें पाहिजे कीं —

"गणबाराऊ व रामाजीराऊ देसाई मोंगलांसी मिळाले आहेति त्याणि मोंगलांचें राजकारण तोडोन तुम्हांस भेटतील म्हाल कबाज करायास सामील होतील तर त्यास व अंताजीराऊ यास देशमुखीचा हक विभाग वाटून घेऊन त्याचे हातें देशमुखीचा कार्यभाग घेणें. रामाजीराऊ व गणबाराऊ मोंगलासी सुलुखें राखून वर्ततील तर अंताजी सूर्यराऊ स्वामीसनिध ठेवून एकनिष्टपणें वर्ततो यासच हातीं धरोन देशमुखीचा हक वतना यासच देऊन याचे हातीं कार्यभाग घेत जाणें असें आज्ञापत्र देविलें पाहिजे."

"आपण स्वामीचे फौजेबरोबर जाऊन म्हाल कबाज करायाचा ईलाज करूं म्हणोन विनंती केली तें सविस्तर अंतकर्णास आणिलें. एका पुरुषाचे तिगे पुत्र त्यांस वतनाचा हक तिघांस घ्यावा तिघांपासून सेवा घ्यावी स्वामीचे पायांसी रुजवात असिले तर त्यामधें कोणही गनिमाचे सुलखें असतील स्वामीसीं विरोध करतील त्याला वतने चालवावे हें गैर हिशेबी आहे. अशास तुम्हीं त्या प्रांतें आहां म्हणवून हें आज्ञापत्र सादर केलें आहे तरी सदरहू वर्तमान मनास आणून गणबाराऊ व रामजीराऊ देशमुख त॥ डिचोली हे मोंगलाचे सुलुखें तोडून आपल्याकडे येतील म्हाल कबाज करावया जमाव मिलवून शेवा करितील तर ते दोघे व त्यांचा तक्षिमदार अंताजीराऊ स्वामी सनिध आला होता त्यास पाठविले असे. हा तिसरा असे तिघजणयांपासून सेवा घेत जाणें. देशमुखीचा हक वतन मोईन प्र॥ हक तक्षिमा करून देविले होते त्याप्र॥ सालोधार चालवीत जाणे. गणबाराऊ व रामजीराऊ मोंगलांसी मिलोन असतील तर अंताजीराऊ यासच देशमुखीचे हक मोईन प्र॥ हक तक्षिमा करून देविले होते तैंसेच चालवित जाणें. स्वामींनी मोईन करून दिली आहे तो सारोत्धारा चालवून याचे हातीं देशमुखीचा कार्यभाग घेत जाणे वतनदार आहे येकनिष्टेनें स्वामीसनिध आला या करितां सदरहू प्र॥ चालविणें जाणीजे. अनमान न करणें बहूत काय लिहिणें तुमी सूज्ञ असो निदेश समक्ष."

(मोर्तब)

बतग्रामचे देसाई रवळू शेणवीं हे राजकारण-कुशल, तसेच तरवारबहाद्दरहि होते. त्यांच्या सैन्यांतील शिपाईहि त्यांच्याच शिस्तींत तयार झालेले व वाढलेले असल्यानें हुशार होते. त्यांना परिस्थिति अनुकूल असती तर ते बरेच चमकले असते; तथापि डिचोलीसारख्या राजधानीच्या ठिकाणीं त्यांचें वास्तव्य, तिथल्याच आसपासच्या भागांत देशमुखी, शिपायांची संख्या मर्यादित आणि धाडसाला प्रोत्साहक वातावरणाचा अभाव यांमुळें त्यांचें खरें तेज प्रकाशूं शकलें नाहीं.

विश्वासराव देसाई, सूर्यराव देसाई, डिचोलीचे देसाई व नावेंचे देसाई अशीं रवळू शेणवीं यांच्या वंशजांचीं सध्या चार घराणीं आहेत. पैकीं विश्वासराव यांचें वास्तव्य डिचोलीजवळच्या लामगांव येथें असून तेथें त्यांचे दोन वाडे आहेत. पहिल्या वाड्यांत भाऊसाहेब यांचे चिरंजीव रा. गोविंदराव वगैरे बंधु राहातात आणि दुसऱ्या वाड्यांत कै. नानासाहेब यांचे नातू रा. गणपतराव व त्यांचे चुलतबंधु कृष्णराव वगैरेंचें वास्तव्य आहे. भाऊसाहेब हे प्रेमळ गृहस्थ असून आर्यवैद्यकीची त्यांना चांगली माहिती होती. त्यांचे चिरंजीव श्री. गोविंदराव हे मराठी भाषेचे अभिमानी व बहुश्रुत असून त्यांच्यांत औदार्याचा गुणहि चांगला आहे. कै. नानासाहेब हे शिकारींत व बंदूक मारण्यांत पटाईत होते. एका क्रूर वाघाला टाळी मारून जागृत करून तो जबडा उघडून धांवून येतांच जबड्यांत गोळी घालून त्यांनी त्याला ठार केलें होतें. यांचे नातू श्री. गणपतराव यांच्यांतहि घराण्याचें औदार्य बरेंच असून त्यांची मराठी वाङ्मयाची आवड प्रशंसनीय आहे. यांचे वडील कै. श्यामराव हेहि बंदुक मारण्यांत हुशार होते.

सूर्यराव देसाई यांचें घराणें सावै-वेरें येथें असून प्रसिद्ध साहित्यिक श्री. शांबाराव सरदेसाई, प्रेमळ वकील श्री. व्यंकटेशराव सरदेसाई, साहित्य व कला यांचे अभिमानी श्री. मलबाराव सरदेसाई प्रभृति गृहस्थ याच घराण्यांतील आहेत.

लोकसेवक वकील म्हणून ज्यांची फार ख्याती होती ते कै. सखारामराव देसाई, कै. सोनबाराव देसाई वकील, 'श्रीसप्तकोटेश्वर देवस्थान' या पुस्तकाचे लेखक श्री. जयवंतराव देसाई वगैरे डिचोलीच्या देसाई घराण्यांतील आहेत.

प्रसिद्ध लघुकथालेखक श्री. जयवंतराव देसाई प्रभृति मंडळी नार्वे येथील देसाई घराण्यांतील आहे.

बतग्रामचे देसाई रवळू शेणवीं यांच्या कुलाचा असा हा आजचा विस्तार आहे.

फोंड नाईक सरदेसाई

यांच्या घराण्याचे ज्ञात मूळ पुरुष नागण नाईक देसाई हे होत. त्यापूर्वीच्या त्यांच्या पूर्वजांचीं नांवें उपलब्ध नाहींत; तथापि विजय-नगरचे सम्राट नरसिंहराय यांच्या राजवटीपासून नागण नाईक यांच्या पूर्वजांकडे देशमुखीचे अधिकार असल्याचा उल्लेख मिळतो.

प्रसिद्ध मुत्सद्दी व विजयनगर सम्राटाचे गोमंतकाचे प्रतिहस्त (व्हाइसरॉय) माईन शेणै वागळे (नागेशींच्या शिलालेखावरून हे सर्वांना ज्ञात आहेत) यांनी राजे रामराय यांकडून अठरा टप्पेची सरदेशमुखीची सनद आणून आपले श्वशुर नागण नाईक यांना बहाल केली; तथापि कन्यादान दिलेल्या जामाताकडून हा अधिकार घेणें त्यांना प्रशस्त वाटलें नाहीं म्हणून या सनदेचा त्यांनी उपयोग केला नाहीं. त्यांच्या पुढच्या पिढींत कांहीं पुरुषांनंतर फोंड नाईक हे कर्तेसवरते झाले आणि विजयनगरकालीन आपल्या पूर्वजांची सनद तत्कालीन नवीन राज्यकर्ते आदिलशहा यांना दाखवून त्यांकडून आदिल-शाहीची अठरा टप्पेची सरदेशमुखीची सनद त्यांनी मिळविली. त्यांत कुडाळ खेरीज करून गोमंतकाचा सारा दक्षिण भाग, सुपें, खानापूर, चंदगड, कोटकर्दे इ. प्रदेशाचा समावेश होतो.

सरदेसाई बांदोडकर यांच्या दप्तरांत त्यांच्या वंशवृक्षाच्या कागदपत्रांत एक बखरपत्र असून त्यांत लिहिलें आहे कीं —

"विद्यानगरीं नृसिंहराज अच्युतराज व राम-राज राज्य करीत असतां नागण नाईक देसाई यांचे वडीलपासून अंत्रूज म्हालची देसकत अणभवीत होते. त्या नागण नाईकाचा जामात माईन शेणै वागळे यार्णे राजा राम यांचें अठरा तपेचें सरदेसकतीचें पत्र नागण नाईक सासरेस आणून दिलें. दानपात्रापासून घेणें उचीत नोहे करितां चालीस न लावतां गुप्त ठेवलें. कांहीं पुरुषांतर होऊन तेच परंपरेचा फोंड नाईक जाहाला. राजा राम यास मारून आली पादशाह विजापूर तखतास बसला ते वखतीं सदर्हू पत्रें पादशहांस दाखवून अठरा तपेचें सरदेसकतीचें फर्मान मामले गोवेचें फोंड नाईक यार्णे घेऊन सरदेसाई फोंड नाईक जाहाला............"

यासंबंधीं कोंकणाख्यानांत पुढील उल्लेख मिळतो —

"कुडाळ वेगळें करून । अठ्ठावीस प्रांतां सर-देशमुखी जाणं । म्हाडपै निवर्तले पासोन । झाले राजपत्र घेवोनि बांदोडकर ॥" (कोंकणाख्यान पृ. ८०).

बखरपत्रांत 'अठरा तपे' व कोंकणाख्यानांत 'अठ्ठावीस प्रांतां' हा फरक दिसतो. याचें कारण कळत नाहीं. तथापि बखरपत्रच मूळ सनदेस धरून असावें असें दिसतें.

फोंड नाईक हे राजकारणी, तसेच तरवार बहाद्दरहि होते. त्यांनी आदिलशहास गुप्त मसलतींत व लढाईंतहि कित्येक वेळां सहाय्य केलें होतें.

रवळू नाईक, विठ्ठल नाईक, नागण नाईक व राम नाईक असे फोंड नाईक सरदेसाई यांना चार मुलगे होते. पैकीं रवळू नाईक व नागण नाईक यांना संतान नव्हतें असें दिसतें.

— ६८ —

विठ्ठल नाईक सरदेसाई

आदिलशाहींत हे राजकारणी म्हणून बरेच प्रसिद्धीस आले. लढाईंतहि आदिलशहास यांचें फार सहाय्य झालें म्हणून आदिलशाहानें त्यांना जादा जमिनीहि इनाम दिल्या. विठ्ठल नाईक सरदेसाई यांचे मुलगे दोन. रवळ नाईक ऊर्फ बाब नाईक आणि विठ्ठल नाईक.

— ६९ —

रवळ नाईक सरदेसाई

रवळ नाईक सरदेसाई ऊर्फ बाब नाईक हे राजकारणापेक्षां तरवार चालविण्यांत हुशार होते. भैरादेवीच्या लढाईंत मराठ्यांतर्फे यांनी चांगली मर्दुमकी गाजविल्यानें मराठ्यांच्या दरबारांतून यांना तरवार व 'प्रतापराव' हा वंशपरंपरा किताब मिळाला. पुढें मुसलमान सरदार शर्फन मालिक यानें स्नेहभावानें आमंत्रण करून विश्वासघातानें अकस्मात यांचा वध केला.

— ७० —

दुलबा प्रतापराव मुख्य सरदेसाई

रवळ नाईक यांचा बंधु विठ्ठल नाईक यांना रंगाजी नाईक नांवाचा एकच मुलगा होता. हाच बांदोडकर मुख्य सरदेसाई यांचा मूळ पुरुष होय. दुलबा नाईक प्रतापराव मुख्य सरदेसाई हे त्यांचेच चिरंजीव होत. दुलबा नाईक चांगले मुत्सद्दी होते. हे मराठ्यांचे अंकीत असूनहि फिरंग्यांच्या हितीं त्यांनी राजकारणी डावपेंच लढवले त्यामुळें त्यांच्यावर मराठ्यांची इतराजी झाली. तथापि पुढें मोंगलांच्या राजवटींत फिरंग्यांनी यांच्या स्नेहामुळें मोंगलांकडे शिफारस करून त्यांकडून सन १६८८ सालीं त्यांना सरदेशमुखीची सनद देवविली.

दुलबा नाईक व त्यांचा मुलगा नागोजी नाईक या उभयतांनी फिरंग्यांच्या हितीं वेळोवेळीं जी कामगिरी बजावली त्यामुळें खुष होऊन सन १७०१ सालीं फिरंगी दरबारनें त्यांना 'मुख्य सरदेसाई' ही पदवी बहाल केली. नागोजी सरदेसाई यांचे मुलगे दोन. पहिला कृष्णाजी व दुसरा जर्नादन. कृष्णाजी नाईकांचा एकच मुलगा सदाशिव नाईक व त्यांचे एकुलते एक चिरंजीव नारबा नाईक सरदेसाई हे होत. दुलबा नाईक प्र. सरदेसाई यांच्या दुसऱ्या मुलाचें नांव गोविंद असें असून मागें क्रमांक ५८ मध्यें ज्यांची माहिती येऊन गेली आहे ते विष्णु नाईक सरदेसाई यांचेच चिरंजीव होत.

नारबा प्रतापराव मुख्य सरदेसाई

नारबा प्रतापराव सरदेसाई हे मुत्सद्दी; पण मोठे कारस्थानी होते. त्यांच्या कारस्थानाचा सुगावा सहजासहजीं कोणास लागत नव्हता.

सन १७५६ त राजे सौंदेकर यांकडे थकलेल्या खंडणीबद्दल श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशवे यांनी बारा हजार घोडेस्वारांचें एक पथक फोंडें किल्ल्यावर पाठवून तो किल्ला हस्तगत करण्याचा प्रयत्न सुरू केला. फोंडें किल्ला मराठ्यांकडे जाण्यांत फिरंग्यांना धास्तीचें असल्यानें तो त्यांनी घेण्यापूर्वीच आपण ताब्यांत घ्यावा अशा हेतूनें तत्कालीन व्हिसिरै कोंदि द आल्व हा ससैन्य फोंडें येथें गेला; पण त्यांपूर्वीच किल्ला मराठ्यांकडे गेला होता. थोड्याच दिवसांनी सैन्याच्या ठीक तयारीनें व्हिसिरै यानें किल्ल्यावर हल्ला केला. निकराची लढाई झाली; पण ती फिरंग्यांना यशस्वी न होतां प्रत्यक्ष व्हिसिरैहि दगावला व किल्ला मराठ्यांकडेच राहिला. या किल्ल्यावर मराठ्यांचा सुभेदार एसाजी राम होता.

फोंडें किल्ला छत्रपति संभाजी राजे यांनी सन १६८३ साली बांधला होता व त्याचें नांव 'मर्दनगड' असें ठेवलें होतें. हा गोव्यास जवळ असणारा किल्ला परक्या सत्तेत असणें धोक्याचें असल्यानें फिरंग्यांची त्यावर दृष्टि होतीच.

पुढें ता. २३ सप्टेंबर १७५८ रोजीं नवीन व्हिसिरै मानुयेल द सालदांज्य द आल्बुकेर्क, कोंदि द येग हा गोव्यांत आला आणि त्यानें सन १७६३ सालीं तो किल्ला हस्तगत करण्याचा प्रयत्न सुरू केला. यावेळीं त्याला अंतस्थ कारस्थानासाठीं नारबा नाईक सरदेसाई यांचा चांगला उपयोग झाला.

नारबा नाईक प्रतापराव मुख्य सरदेसाई यांनी व्हिसिरै कोंदि द येग याला फोंड्याचा किल्ला घेण्याच्या बाबतींत मोठीं कारस्थानें करून मदत केल्याचा ऐतिहासिक कागदपत्रांतून उल्लेख मिळतो.

अखेरीस सन १७६३ त फिरंगी व्हिसिरै कोंदि द येग यानें हल्ला करून हा किल्ला घेतला व लगेच मोडून टाकला. यासंबंधींची साधार माहिती इतिहास संशोधक डॉ. पां. स. पिसुर्लेकर यांनी आपल्या O enigma da morte do Vice-Rei Conde de Alva या पुस्तकांत दिली आहे.

सदर कामगिरीमुळें ता. ३ सप्टेंबर १७६४ च्या फर्मानानें फिरंगी दरबारनें नारबा सरदेसाई यांना हिंदी पलटणीचे सेनापति नेमलें. त्यांच्या पलटणींत ६०० शिपाई होते. यांचा एकच मुलगा सदाशिव व त्यांचा चिरंजीव नारबा सरदेसाई हा हिंदी पलटणींत कॅप्टन होता. यांच्या मुलाचें नांव सदाशिव. सदाशिव सरदेसाई यांना नागोजी व दुलबा असे दोन मुलगे झाले. नागोजी सरदेसाई यांचे चिरंजीव सदाशिव सरदेसाई यांचे दत्तक नागोजी प्रतापराव सरदेसाई आहेत. दुलबा सरदेसाई यांचे चिरंजीव शिवाजी प्रतापराव सरदेसाई आणि त्यांचे पुत्र म्हणजे आजचे डॉक्टर दुलबा प्रतापराव मुख्य सरदेसाई, रंगाजी प्र. मु. सरदेसाई व सदाशिव प्र. सरदेसाई यांकडे दत्तक गेलेले नागोजी प्र. मु. सरदेसाई हे आहेत.

फोंड नाईक यांचा चौथा मुलगा राम नाईक यांचा एकच मुलगा नागण नाईक हा होय. नागण नाइकाचे मुलगे तीन. फोंडजी नाईक, नागोजी नाईक व राम नाईक. पैकीं फोंडजी नाईक हे कुंभारजुवें येथील आर्ककर देसायांचे, पूर्वज, नागोजी नाईक हे रासैकर देसायांचे पूर्वज व राम नाईक हे मडकैकर देसायांचे मूळ पुरुष होत. प्रो. मनोहरराव सरदेसाई, श्री. जयवंत ल. ना. प्र. मु. सरदेसाई प्रभृति मडकई घराण्यापैकीं असून वाडीचे श्री. भास्कर रु. प्र. सरदेसाई, मडगांवचे श्री. आनंद गो. प्र. सरदेसाई, कुडाळीचे श्री. बाळकृष्ण वि. प्र. सरदेसाई, आडपैचे श्री. अनंत प्र. सरदेसाई, हांतुलीचे श्री. देसू प्र. राव सरदेसाई प्रभृति मंडळी रासै घराण्यांतील आहे.

एकंदरींत म्हाड्पै खेरीज सबंध गोमंतक, सुपें, खानापूर, कोटकर्दे, वगैरे भागांच्या सरदेशमुखीची सनद मिळालेलें सबंध गोव्यांतील हेंच एक सरदेसाई घराणें असल्याचें त्यांच्याकडील सनदा व कागदपत्रांवरून दिसून येतें.

या सरदेसाई घराण्यांतील **विठोजी राम नाईक सरदेसाई** हे राजकारणी हालचालीनें आणि स्वतः फौजेनिशीं येऊन आस्थापूर्वक मराठ्यांच्या सैन्यांत मिसळले व मोंगलांच्या ताब्यांत गेलेला मराठ्यांचा फोंडें किल्ला परत घेण्याच्या लढाईत मराठ्यांना मदत केली. या त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांना मराठ्यांच्या दरबारांतून बेतगी गांव वंशपरंपरा इनाम दिल्याचें खालील सनदेवरून कळून येतें —

॥ श्रीराम ॥

राजश्री कृष्णाजी अनंत नामजाद म॥ फोंडा गोसावी यांसी —

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य— शेवक रामचंद्र निलकंठ अमात्य हुकुमतपन्हां नमस्कार सुहूर सन सलास मया व आलफ राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यांहीं लिहिले जें मामले मजकूर हस्तगत करावयानिमित्य राजश्री केदारजी सूर्यवेसीं यांबराबरी फौज देऊन रवान केले त्या प्रसंगीं राजश्री विठोजी राम नाईक सरदेसाई मामले मजकुर यांणीं राजश्री———— ———— स्वामीच्या पायांसीं येकनिष्ठा धरून माशारनिलेस सामील जाहाले त्या प्रांतींचा कितेक हवी पालत सांगोन फौज घेऊन फोंडेच्या कोटा जवळीं गेले कोट हस्तवश करावयानिमित्य सामा सुमा सर्वही अनुकुलता करून आपल्या जमावानसीं गनिमांस जूज दिल्हें कोट हस्तगत जाहाला तेव्हां पुढेही कित्येक स्वामीकार्यविसीं बहुतच उमेद धरीत आहेत, तरी मौजे बेतगी तपे अंतरूज हा गाउं अजरा मन्हामत ईनाम करून दिल्हा पाहिजे म्हणून विस्तारें लिहिलें त्या वरून मनास आणितां म॥ वतनदार पुरातन या राज्याशीं येकनिष्टपणें शेवा करून दाखऊन आपलें ऊर्जीत करून घ्यावें हे उमेद धरीत आहेत यास गांव इनाम देऊन याजपासून पुढें स्वामी शेवा घ्यावी हें उचित आहे या करितां मौजे मजकूर कुलबाब कुलकानू हालिपटी व पेस्तरपटी खेरीज हकदार करून इनाम अजरा मन्हामत करून दिल्हा असे तरी म॥ चे दुमाला करून पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालवीत जाणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें या पत्राची प्रती लेहून घेऊन असल पत्र भोगवटीयास माशारनिले जवळीं परतोन देणें जाणिजे छ १५ रजबु बहुत काये लिहिणें.

सीका थोर
बार सुरुसुद बार

सीका लान आहे
(२४ डिसें. १७०२)

प्रधान लक्ष्मण भास्कर नायक

प्रधान लक्ष्मण नायक यांचें घराणें गोमंतकच्या सासष्ट महालांतील लोटली येथील असून त्या घराण्याचा कुलदेव श्रीरामनाथ होय. लोटलींतील केणी, पै, शेणै वगैरे गांवकरांप्रमाणेंच नायक हेंहि तेथील एक गांवकर घराणें होतें. या घराण्याचा मूळ पुरुष व्यंकटेश, तथापि त्या पुरुषापासून पुढील कांहीं व्यक्तींचा नामनिर्देश कुठेंहि आढळत नाहीं. प्रधान लक्ष्मण नायक यांचे वडील भास्कर नायक असें उत्तर कोंकणचे शिलाहार राजे दुसरे अपरादित्य यांच्या शके ११०२ च्या शिलालेखावरून कळून येतें. त्यांत श्रेष्ठ प्रधान भास्करपुत्र लक्ष्मण नायक असें म्हटलें आहे.

कोंकणचे शिलाहार व कदंब हे प्रथम राष्ट्रकुटांचे व नंतर चालुक्य सम्राटांचे मांडलीक होते. अधिसत्ता एक असली तरी त्या काला-प्रमाणें त्यांचें राजकारण भिन्न व दोघांचें शत्रुत्वाचें नातें होतें. इ. स. च्या आठव्या शतकाच्या मध्यापासून अकराव्या शतकाच्या आरंभींच्या अवध्याच वर्षापर्यंत गोमंतकांत शिलाहारांचें राज्य होतें. शेवटचे शिलाहार राजे रट्टराज यांना अकराव्या शतकाच्या पूर्वार्धात कदंबांनीं जिंकलें.

कदंब हे मूळचे वैदिक धर्मी, तथापि पुढें त्यांच्यावर जैनधर्माचा परिणाम झाल्यानें त्या धर्मास प्रोत्साहन देतांना त्यांचा वैदिक धर्मीयांवर कठोरपणा होऊं लागल्यानें त्या वेळीं कित्येक लोक गोमंतकांतून उत्तर कोंकणच्या शिलाहारां-च्या राज्यांत गेले (गों. गों. वसणूक — इ. सं. वा. र. वर्दे वालावलीकर). कित्येक गोमंतकीयांना उत्तर कोंकणच्या शिलाहारांनी आपल्या राज्यकारभाराच्या व दरबारी कामाच्या उपयोगासाठीं अगत्यानेंच आमंत्रणहि करून नेलें होतें. उत्तर-शिलाहारांना गोमंतकाचा अभिमान वाटत होता (Ind. Antiq. Vol. 9, p. 35, 37).

दमणगंगेपासून गंगावली नदीपर्यंतच्या भागास कोंकण असें म्हणतात. चेऊलच्या दक्षिणेकडील कुंडलिका नदीनें या कोंकणचे दोन भाग केले होते. दक्षिण भागास दक्षिण कोंकण (म्हणजे गोमंतक) व उत्तर भागास उत्तर कोंकण म्हणत. दक्षिण कोंकणांत 'शिवचित्त' कदंबकालीन सन ११६० च्या एका कानडी शिलालेखांत ९०० गांवांचें कोंकण असें म्हटलें आहे (बॉम्बे ब्रँ. रॉ. ए. सो. जर्नल, व्हॉ. ९, पृ. २९७). उत्तर कोंकणास १४०० गांवांचें कोंकण असें सन १०९४ च्या ताम्रपटांत म्हटलें आहे (Indian Antiq. Vol. 9, p. 35).

गोमंतकावर राज्य करणारे शिलाहार, उत्तर कोंकणचे शिलाहार आणि कोल्हापूरचे शिलाहार हे एकमेकांचे भाऊबंद होते.

उत्तर कोंकणावर शिलाहारांचा अंमल सन ८१० या सालीं सुरू झाला. या शिलाहारांच्या तीन शाखा असून मुख्य कऱ्हाड-कोल्हापूरची, दुसरी दक्षिण कोंकणची व तिसरी उत्तर कोंकणची पुरी (जंजिऱ्याजवळची दंडा-राजपुरी) येथें होती. या तिन्हींचें मूळ तगर (जुन्नर) शहर होतें. तिन्हीं राजांच्या बिरुदावलींत 'तगरपूरवराधीश्वर' असा शब्द आहे.

उत्तर कोंकण शिलाहारांची सत्ता सन ८१० पासून स. १२६६ पर्यंत सुमारें साडेचारशें वर्षें

अव्याहत चालू होती. हें त्यांच्या शिलालेख व ताम्रपटांवरून कळून येतें.

कपर्दी, पुलशक्ति, लघुकपर्दी, वप्पुवन्न, झंज, गोग्गी, वज्रदेव, अपराजीत. दुसरा वज्रदेव, अरिकेसरी, चित्रराज, नागार्जून, मुम्मुनी, अनंतदेव, अपरादित्य, हरिपालदेव, मल्लिकार्जून, दुसरा अपरादित्य, केशीदेव व सोमेश्वर असे २० राजे उत्तर कोंकणच्या कुलांत होऊन गेले.

अठरावा राजा दुसरा अपरादित्य याच्या कारकिर्दीत जे कित्येक हुशार गोमंतकीय उत्तर कोंकण शिलाहारांच्या दरबारांत प्रवेशले त्यांत लक्ष्मण नायक यांचाहि समावेश होतो.

कान्हेरी शिलालेख, भादाणे ताम्रपट, ठाणें तम्रपट, अंबरनाथ शिलालेख, खारेपाटण ताम्र., जांजें शिला., सोपारें व वठार शिला., वसई शिला., मांडवें शि., रानवड शि. असे जे कित्येक उत्तर कोंकण शिलाहारांचे शिलालेख व ताम्रपट उपलब्ध आहेत त्यांतील मांडवें-शिलालेख हा विशेष प्रसिद्ध असून तो दुसरा अपरादित्य राजाचा आहे. त्यांत अनेक गोमंतकीयांचा नामनिर्देश आहे. सन ११२७ च्या दुसरा अपराजित राजाच्या एका ताम्रपटांत लक्ष्मण नायक हे प्रधान, लक्ष्मणैय प्रभु हे महासान्धिविग्रहिक श्रीकरणे भाण्डागारे प्रथमस्थे प्रधान व च्छितमै प्रभु हे द्वितीयस्थे प्रधान असें म्हटलें आहे. (ज. बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो., व्हॅ. २१ पृ. ५०९, ५१४).

मांडवें-शिलालेख हा सन ११८७ सालचा असून त्यांत महामंत्री भास्कर नायक-पुत्र लक्ष्मण नायक असा उल्लेख केला आहे (Bombay Gaz. Vol. 13, p. 427, note 1)

उत्तर कोंकणांतील पुरी जवळच्या आपल्या इनाम गांवांत मंत्री लक्ष्मण भास्कर नायक यांनी महादेवाचें एक देवालय बांधून तें अनंतभट्टादि ब्राह्मणांस ग्रहणपर्वकालीं दान दिलें होतें. त्या देवाचें नांव 'श्रीरामनाथ रामेश्वर' असून त्या जुन्या देवालयाबद्दलचा महामंत्री लक्ष्मण भास्कर नायक यांचा जो ताम्रपट आहे त्यांत त्यांनी आपला कुलदेव श्रीरामनाथ, कुलपुरुष व्यंकटेश, जन्मभूमि गोमंतक व स्वतःला लोटली-ग्रामस्थ असें म्हटलें असून आपल्या वडिल बंधूचें नांव गणेश नायक असें म्हटलें आहे.

मंत्री लक्ष्मण नायक हे महान् मुत्सद्दी आणि तरवारबहाद्दरहि होते. गुजरातजवळच्या एका लढाईत यांनी मुख्य सेनापति या नात्यानें अपूर्व शौर्य प्रगट केलें असून त्या युद्धांतील यशाबद्दल शिलाहार राजे यांनी पोषाख, तरवार व जहागीर देऊन त्यांचा मोठा गोरव केला आहे.

तंजावर येथें वास्तव्य असलेले इंजिनियर श्री. वामनराव नायक हे मंत्री लक्ष्मण नायक यांचे वंशज होत. सन १९५० सालीं मद्रासकडील प्रवासांत असतांना सरस्वती महाल ग्रंथालय पहाण्यासाठीं तंजावरला जाण्याचा योग आला आणि त्यावेळीं सदर इंजि. नायक यांची भेट झाली. श्रीरामनाथाचे महाजन व नायक हें ऐकून सहज कुतुहलानें विशेष माहिती घेतां घेतां त्यांचे पूर्वज गोमंतकीय व उत्तर कोंकण शिलाहारांचे मंत्री लक्ष्मण नायक यांचे वंशज असल्याचें समजून आलें. त्यांकडे त्यांच्या पूर्वजांची एक नामावली मिळाली. इंजि. नायक यांच्या एकाच परंपरेच्या एकेरीच पुरुषांची मंत्री लक्ष्मण

नायकापासूनची तिच्यांत माहिती मिळते ती अशी —

महामंत्री लक्ष्मण नायक, गोविंद, अच्युत, भास्कर, राम, वामन, अनंत, केशव, पुरुषोत्तम, लक्ष्मण, भास्कर, गोविंद, राम, अनंत, केशव, वामन, गोविंद, लक्ष्मण, भास्कर, वामन, गोविंद, लक्ष्मण, राम, केशव, लक्ष्मण, भास्कर, लक्ष्मण, अनंत, वामन. शेवटचे वामन हेच इंजि. वामनराव नायक होत.

मंत्री लक्ष्मण नायक यांचे वडिलबंधु गणेश नायक यांचें वास्तव्य अखेरच्या कालांत लोटली येथेंच होतें असें दिसतें. त्यांच्या वंशजांची वरील प्रमाणेंच एक एकेरी नामावली मराठी भाषेंत कानडी लिपींत लिहिलेल्या हिशेबाच्या जुन्या वहींत आरंभींच दिलेली आढळली. तिच्यावरून जीं नांवें समजून येतात तीं खालील-प्रमाणें आहेत :—

कुलपुरुष व्यंकटेश................ यानंतरच्या पुरुषांचीं भास्कर नायक यांच्या पर्यंतचीं नांवें उपलब्ध नाहींत. पुढें लिहिलें आहे कीं — "भास्कर नायक यांचे पुत्र दोन. थोरला गणेश नायक व दुसरा लक्ष्मण नायक. हाच उत्तर कोंकणांत प्रधानपदावर होता."

भास्कर नायक यांच्यापासूनचीं पुढील नांवें– भास्कर नायक, गणेश नायक, श्रीधर, व्यंकटेश, भास्कर, सुब्राय, नारायण, अनंत, वामन, व्यंकटेश, श्रीधर.

ख्रिस्तीकरणाच्या वेळीं या कुटुंबांतील मंडळी लोटलींतून निघून जाऊन विजापुरकरांच्या अंत्रूज महालांत राहिली. तेथून जे दोघे बंधु बोरी, पारोडें, काणकोण असा प्रवास करीत सहपरिवार रिवण येथें येऊन स्थायिक झाले त्यांचीं नांवें व्यंकटेश व पांडुरंग.

व्यंकटेश याचे मुलगे दोन. गणेश व सुब्राय. रिवण येथील नायक घराण्यांत यांच्या दोन शाखा वाढत गेल्या. पैकीं गणेश याची ज्येष्ठ व सुब्राय याची कनिष्ठ. या ज्येष्ठ शाखेंतील गणेश याचे मुलगे दोन, व्यंकटेश व पांडुरंग. पांडुरंगाच्या इथें पुत्रसंतान नव्हतें. व्यंकटेश नायक यांचे मुलगे पांच. भिकाजी, नारायण, वामन, रामचंद्र व दामोदर.

भिकाजी नायक यांचे एकुलते एक चिरंजीव भास्कर नायक. हे बहुश्रुत व आध्यात्मिक वृत्तीचे होते. नारायण, वासुदेव व गंगानाथ असे त्यांनां तीन मुलगे झाले. नारायण नायक हे साहित्यिक व संपादक असून वासुदेव नायक हे लेखक व विनोदी कवि होते. गंगानाथ नायक यांना एकच मुलगा असून त्याचें नांव भास्कर असें आहे.

नारायण या व्यंकटेश नायक यांच्या दुसऱ्या मुलास संतान नव्हतें. त्यांचा तिसरा मुलगा वामन नायक यांना गणेश नायक नांवांचा एकच मुलगा होता. चौथा रामचंद्र नायक यांनी दत्तक घेतला आणि पांचवा दामोदर नायक यांचे मुलगे चार.

दुसऱ्या शाखेचे सुब्राय नायक यांचा मुलगा बाबूल नायक. यांना शाबा, सुबा, कुष्ट व बाबू असे चार मुलगे झाले. शाबा नायक यांनां पुत्रसंतान नव्हतें. सुबा नायक यांचा एकच मुलगा विठ्ठल नायक होय.

विठ्ठल नायक यांचा चिरंजीव भगवंत नायक होय.

कुष्ट नायक यांना अनंत, श्रीधर, फट्ट व जगन्नाथ असे चार मुलगे होते. पैकीं अनंत नायक यांना वैकुंठ, कुष्ट, नानू व रघुवीर असे चार मुलगे झाले. पुंडलीक व दत्ता असे श्रीधर नायक यांचे मुलगे दोन. फट्ट नायक यांचा एकच मुलगा यशवंत आणि जगन्नाथ नायक यांचाहि एकच मुलगा सदाशिव होय.

बाबू नायक यांना उष्णो, राम, विष्णु व पुरुषोत्तम असे चार मुलगे होते.

— ७३ —

व्यंकटेश वामन नायक

कर्नाटकांत तीर्थहळ्ळी तालुक्यांतील केळदी येथील नायक हे विजयनगरचे मांडलीक होते. या घराण्यांतील सदाशिव नायक यांनी विजयनगरचे राजे सदाशिवराय यांकडून बारकूर, मंगळूर व चंद्रगुत्ति हे गांव मिळविले व आपली राजधानी इक्केरी येथें केली. त्यामुळें पुढें त्या केळदीच्या नायकांस इक्केरीचे नायक असें नांव पडलें. हें घराणें लिंगाईत होतें.

व्यंकटप्पा नायक हा त्या घराण्यांत पुढें पराक्रमी पुरुष झाला व त्यानें मासूर, शिमोगा, कडूर इ. भाग आपल्या राज्यास जोडून तो स्वतंत्र झाला. त्याचा नातू वीरभद्र यानें सन १६३९ त बेदनूर येथें आपली राजधानी केली. तेव्हांपासून त्यांना बेदनूरचे नायक असें नांव मिळालें. त्याच्या मागें गादीवर आलेला राजा शिवप्पा नायक (१६४५–६०) त्या सगळ्यांत विशेष प्रख्यात व पराक्रमी निपजला. त्यानें संबंध कर्नाटक व शिमोगापर्यंतचा मुलख आपल्या राज्यास जोडला. त्याकडे चाळीस ते पन्नास हजार सैन्य नेहमीं सज्ज असे (Mysore Gaz. V. 2, p. 431-34).

या शिवप्पा नायक यांच्या दरबारांत परराष्ट्र खात्याचे प्रधान व्यंकटेश वामन नायक हे गोमंतकीय मुत्सद्दी होते. ते लोटलीकर असून त्यांचा कुलदेव श्रीरामनाथ होता. त्यांचें गोत्र कौंडिण्य असून आपण व्यंकटेश कुलोत्पन्न असेंहि त्यांनी म्हटलें आहे. त्यावरून त्यांचा कुलपुरुष व्यंकटेश असें सिद्ध होत आहे.

या माहितीवरून पाहातां असें दिसून येतें कीं, नायककुलांतील नागेश भास्कर नायक या ज्येष्ठ शाखेंतील वामन नायक यांचे चिरंजीव व्यंकटेश हेच ते शिवप्पा नायक यांच्या दरबारांतील प्रधान असावे. त्यांची किंवा त्यांच्या पुढील संततीची कांहींच माहिती मिळत नाहीं.

पुढें सन १७६३ सालीं हैदर अल्लीनें केळदीच्या नायकांचें राज्य जिंकून आपल्या राज्यास जोडलें. त्यावेळीं बेदनूरच्या राजधानींत त्यानें अठरा कोट रुपयांची लूट मिळवली. पुढें बेदनूर हें नांव बदलून हैदरनें त्याला हैदरनगर असें नांव दिलें (Epig. Carn. Vol. 6, Introduction p. 229). हेंच आजचें 'नगर' होय.

मायिंदेव

इ. स. च्या १२ व्या शतकाच्या अखेरीस भिल्लमांच्या राजवटीपासून देवगिरीचे यादव आपलें साम्राज्य दक्षिणेकडे वाढवित चालले होते. त्यांत भिल्लमाचा नातू सिंघणदेव हा मोठा पराक्रमी निपजला आणि त्यानें चालुक्यांचें सारें राज्य जिंकून आपल्या राज्यास जोडलें. हा स. १२०६ च्या सुमारास सिंहासनावर आला होता. सन १२४७ पर्यंत ४१ वर्षे याची कारकिर्द मोठ्या भरभराटींत चालली.

याच सिंघण सम्राटांच्या कारकिर्दीत मायिंदेव उदयास आले. यांनी मुत्सद्दीपणा आणि लष्करी पराक्रम यांच्या जोरावर यादवांना अनेक प्रसंगीं यश मिळवून दिलें. यांचें जन्मगांव गोमंतकाचें बतग्राम. त्यावेळीं साऱ्या दक्षिण कोंकणवर कदंबांची सत्ता चालू होती. स. ११८७ ते १२१० पर्यंत तिसरा जयकेशी या कदंब राजघराण्याच्या सिंहासनावर होता.

कदंबांच्या सिंहासनाबद्दल मायिंदेव यांना फार आदर होता. तथापि कांहीं कारणानें ते लहानपणापासूनच यादवांच्या सैन्यांत दाखल झाले होते. पुढें आपल्या हुशारीनें वाढत जाऊन ते यादवांच्या सेनापतीच्या हुद्यापर्यंत पोंचले. यांच्या कुशलतेच्या राजकारणामुळें, पराक्रमांमुळें आणि राजनिष्ठेमुळें यादव सम्राट सिंघण यांचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास बसला होता.

म्हैसूर राज्यांतील केदारेश्वर देवालयाजवळच्या स. १२१५ सालच्या शिलालेखांत श्रीमन्महाप्रधान - सर्वाधिकारीमहापरम विश्वासी रायनायक श्रीमायिंदेवपंडित असा उल्लेख आहे. त्यावरून मायिंदेव यांची बढती पुढें यादवांच्या महाप्रधानाच्या हुद्यावर झाल्याचें दिसून येतें. त्यावेळीं सरसुभेदारासहि महाप्रधान म्हणत असत.

सन १२१५ सालच्या अखेरीस सम्राट सिंघणदेव यांनी मायिंदेव यांना दण्णायक ही पदवी व १२ हजार गांवच्या वनवासी प्रांताचे मुख्याधिकारी म्हणजे सुभेदार नेमलें होतें. (प्रतापचक्रवर्ति सिंहलदेवर विजयराज्यं आचंद्रार्कंबरं सलुत्तिरे । तत्पादपद्मोपजीवि मायिंदेव दण्णायकरु वनवासे नाड मेलाळिकेय अधिकारं माडुत्तिरे । — Epig. Carn VL 7, Honnali Taluk Insc. 44, 48).

सन १२१३ च्या सुमारास सिंघणदेव यांनी कोल्हापूरचा शिलाहार दुसरा भोज याला जिंकून त्यांचें राज्य आपल्या राज्यास जोडलें होतें. Bombay Gaz. Vol. I p. 524).

पुढें सन १२१७ च्या सुमारास सिंघणदेव यांनी गोमंतकच्या कदंबांवर हल्ला करून त्यांचें राज्यहि आपल्या स्वाधीन करून घेतलें. सिंघणदेवांनी कदंबांचें राज्य घेतल्यावर मात्र मायिंदेव यांना फार वाईट वाटलें; कारण मायिंदेव यांची जन्मभूमि, घर दार, जमीन इ. सर्व कदंबांच्या राज्यांत म्हणजे बतग्रामांत होतें. त्याशिवाय

कदंबांबद्दल मायिंदेव यांना फार आदर, अभिमान व प्रेम वाटत होतें.

सिंघणदेव यांनीं मायिंदेव यांना फार मोठ्या योग्यतेस चढविलें. वैभवसंपन्न केलें; तथापि कदंबांचें राज्य बळकावल्यामुळें यादवांकडील साऱ्या वैभवावर पाणी सोडून मायिंदेव कदंबांकडे धांवले. कदंबांवरील हल्ल्याचा विचार चालू असतांनांच तो हल्ला न करण्याबद्दल सिंघणदेवांना त्यांनी आग्रहाची विनंति केली होती; तथापि पुढें ती गोष्ट मायिंदेव यांना नकळतच उरकण्यांत आली.

सिंघणदेवाच्या मगरमिठींतून कदंबांचें गोमंतकचें सिंहासन सोडविणें ही साधी गोष्ट नव्हती. तथापि जय्यत तयारी करून तें सिंहासन यादवांकडून सोडविण्याच्या कार्यांत जिवापाड मेहनत घेतां घेतां मायिंदेवांना तब्बल एक तपाचा काल घालवावा लागला. आणि बारा वर्षांनंतर त्यांना त्यांत यश मिळालें. या युद्धांत यश मिळाल्यावर विजयादित्य (विष्णुचित्त) कदंबाचा नातू व तिसऱ्या जयकेशीचा पुत्र त्रिभुवनमल्ल याला त्यांनी गोमंतकच्या सिंहासनावर बसवून स्वतः त्याचें प्रधानपद स्वीकारलें आणि कारभार सुरू केला. (Memoir Sawunt Warrce State p. 303). ही गोष्ट साधारणपणें स. १२२९ च्या सुमारास घडली असावी असें वाटतें.

यानंतर कदंब सिंहासनाचा अभिमानी प्रधान व मुख्य सेनापति मायिंदेव यांनी आपली इहलोकची यात्रा संपवली त्यामुळें सन १२३८ च्या सुमारास कदंबांवर यादवांचा पुन्हा हल्ला झाला.

स. १२३८ च्या ताम्रपटांत सिंघणांचा सेनापति बीचण यानें कोंकणच्या कदंबांचें राज्य घेतलें असें म्हटलें आहे. (हेलासाधित रट्ट कोंकणकनत्कादंबगुत्त्योल्लसत्—Jour. B. B. Royal A. S. VL 15 p. 387).

सेनापति बीचण यानें कदंबांचें गोमंतकाचें राज्य यादवांच्या साम्राज्यास जोडल्यापासून सन १२४७ पर्यंत तें यादवांच्या ताब्यांत होतें. त्याच सालीं सिंघणदेव वारल्यानें यादवांचें तेज फिक्कें पडल्याचें पाहून त्रिभुवनमल्लाचा पुत्र दुसरा षष्ठदेव याला त्याचा मेहुणा (बहिणीचा पति) कामदेव यानें कदंबांच्या सिंहासनावर बसवलें. (ताम्रपट. — श्रीषष्ठदेवप्रतिष्ठापकः श्रीकामदेव भूपालः । श्रीकामभूपतिः । श्रीमत्षष्ठ महिपालश्वसा यस्य प्रियाऽभवत् । कामदेवनृपः श्रेष्ठो गरिष्ठो गुणगुंफितः। वरिष्ठ षष्ठभूपालप्रतिष्ठाधिष्ठितोऽभवत् । — Ind. Ant. VL14, p. 288).

हे मायिंदेव विश्वासराव, सूर्यराव या देसाई घराण्याच्या पूर्वजांपैकीं असल्याचा इ. सं. वर्दे वालावलीकर यांचा कयास आहे.

ताम्रपटांत मायिंदेव यांच्यानंतर मंग व त्याचा मुलगा भैरव यांचा उल्लेख आहे त्यावरून ते मायिंदेव यांचेच कोणी असावेत असा कित्येकांचा समज दिसतो. तथापि तसा कांहीं पुरावा इतिहासांत मिळत नाहीं. मंग व भैरव हे तेराव्या शतकाच्या द्वितीयार्धांत होऊन गेले हें मात्र खरें. ताम्रपटांत भैरवाची फार स्तुति आहे. "तो महापराक्रमी, उदार, पितृवचनप्रिय, राजकारणी होता." (Memoir — S. W. State p. 304).

मंग किंवा भैरव हे दोघे कदंबांचे अधिकारी दिसतात, पण त्यांच्या प्रत्यक्ष कामगिरीचा उल्लेख मिळत नाहीं.

अच्युत नायक

इसवी सनाच्या तेराव्या शतकाच्या पहिल्या पंचविशींत सिंघणदेव यादवांच्या दरबारांत गोमंतकीय राजकारणी मायिंदेव जसे फार गाजले त्याचप्रमाणें त्याच शतकाच्या द्वितीयार्धांत यादवसम्राट रामदेव यांच्या राजवटींत उत्तर कोंकण विभागांत अच्युत नायक हे गोमंतकीय राजकारणी फार प्रसिद्धीस आले.

राजकारणांतील हुशारीनें आणि पराक्रमानें यादव राजवटींत हे झपाट्यानें वाढत जाऊन महाप्रधानाच्या हुद्यावर पोंचले.

सन १२६६ च्या सुमारास उत्तर कोंकणावर राज्य करणारे शिलाहारवंशीय राजे यांना जिंकून यादवसम्राट महादेवराव यांनी सारें उत्तर कोंकण यादव साम्राज्यांत विलीन केलें होतें आणि त्या भागाचा कारभार ते 'महाप्रधान' नांवाच्या आपल्या उच्चाधिकारी सुभेदारामार्फत चालवीत होते.

सन १२७१ सालीं महादेवराव यांच्या निधनानंतर त्यांचा पुतण्या रामदेवराव हे यादवांच्या देवगिरीच्या सिंहासनावर आले. त्यावेळीं उत्तर कोंकणचा कारभार चालविण्यास पराक्रम व राजकारण या दोन्हीं दृष्टीनें भरपूर सामर्थ्यवान असलेले परम विश्वासू अधिकारी अच्युत नायक त्यांच्या डोळ्यांपुढें आले आणि त्यांची त्यांनी उत्तर कोंकणच्या महाप्रधानपदावर नेमणूक केली.

कांहीं इतिहासकारांच्या मतें हे अच्युत नायक गोमंतकांतूनच देवगिरीस गेले होते तर कांहींकांचें मत ते उत्तर कोंकणांतूनच गेले. नवव्या-दहाव्या शतकांत जे गोमंतकीय उत्तरकोंकणच्या शिलाहारांच्या दरबारांत प्रवेशले त्यांच्याच वंशजांपैकीं हे आहेत असें इतिहास संशोधक डब्ल्यू. एच्. बाथेनचें मत आहे. बाथेन यांनी प्रसिद्ध केलेल्या ताम्रपटावरून त्यांचें मत खरें असावें असें वाटतें. त्या ताम्रपटांत लिहिलें आहे कीं — "राजे रामदेवराव यांच्या कल्याणासाठीं अच्युत नायक यानें सासष्टींतील (सासटेमध्यभागे — Jour. R. A. S. VL 5, p. 187. Ins. 10). वौळें गांव बत्तीस ब्राह्मणास दान दिला. (हा ताम्रपट पहिल्यानदां बाथेन यांनी प्रसिद्ध केला पण त्यांत त्यांनी एकाच ब्राह्मणाचें नांव दिलें. पुढें तो दुसऱ्यान्दां वाचनांत येऊन एपिग्रा. इंडि. च्या १३ व्या पुस्तकांत प्रसिद्ध करण्यांत आला. त्यांत अकरा ब्राह्मणांचीं नांवें आहेत. हा ताम्रपट मुंबई येथील प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्यें असून त्यावर बत्तीसहि ब्राह्मणांचीं नांवें दिसतात).

सदर ताम्रपटांत नवव्या व दहाव्या शतकांत गोमंतकांतून उत्तर कोंकणांत जाऊन तेथें स्थिर झालेल्या प्रभु व नायक या घराण्यांतील इसमांचीं नांवें आलीं आहेत तीं अशीं :— जामदग्न्यवत्स गोत्री विष्णु प्रभु पुत्र आउ प्रभु, अत्रिगोत्री राघव नायक पुत्र वाच्छु नायक, गोतमगोत्री अच्युत नायक पुत्र अनंत नायक, जामदग्न्यवत्स गोत्री खेतल प्रभु विष्णु प्रभु पुत्र नारायण प्रभु वगैरे. त्यांत फक्त पंधरा इसमांचीं कुळनांवें दिसत नाहींत.

उत्तर कोंकणांतून देवगिरीस गेलेले असो, किंवा गोमंतकांतून परस्पर तिकडे गेलेले असो, पण एक खरें कीं, अच्युत नायक हे गोमंतकीय आहेत.

अच्युत नायक हे गौतम गोत्री श्रुतिशास्त्र-शस्त्रकुशल, सद्गुणी व चतुर राजकारणी होते. (Jour. R. A. S. VL 5, p. 186) त्यांनाच सम्राट रामदेवराव यांनी उत्तर कोंकणचे महाप्रधान नेमलें.

ठाण्याजवळ मिळालेल्या सन १२७२ च्या ताम्रपटांत अच्युत नायक यांच्याविषयीं फारच गौरवपूर्ण उल्लेख मिळतो. —

यस्मिन्नच्युतनायके विरचिते प्रौढप्रतापे वरे । लावण्यैकसि भूरिदातरि धराभारक्षमे वेधसा । सूर्यः किं घटितः किमेष विहितश्चंद्रः समुत्पादित । श्चिंतारत्नमहोमुधैवकिमपि स्रष्टाः कुलक्ष्माभृतः । यश्च मंडलीकपितामहः । ......पश्चिमरायविभाड (Jour. R. A. S. VL. 5, p.186--187).

यादव सम्राटांचा उत्तर कोंकणचा कारभार अच्युत नायक यांनी मोठ्या कुशलतेनें चालविला आणि अनेकदां सम्राटांकडून आणि जनतेकडूनहि धन्यवाद घेतले. यांच्या दबारांतील न्याय फार कडक असे. गुन्हेगारास त्यांकडून योग्य शिक्षा मिळावयाचीच; पण निरपराध्याला चुकून देखील कधीं शिक्षा होऊं नये याबद्दल त्यांचा फार कटाक्ष असे. कधीं कधीं गुप्त वेषानेंहि हे फिरत व गुन्ह्याचा स्वतःहि पत्ता काढीत. यांचें गुप्त हेरांचें खातें वाखाणण्यासारखें होतें.

अच्युत नायक यांनी अठरा-वीस वर्षें उत्तर-कोंकणची कारकिर्द यशस्वीपणें चालविली. त्यांनी आपल्या महान् पराक्रमानें व अतुल राजकारणानें सर्वांना चकित केलें. देवगिरीच्या यादवांच्या राजकारणी लोकांत पहिल्या वर्गांतील चारपांच मुत्सद्यांतच नेहमीं अच्युत नायकांची गणना असे. हा त्यांचा दर्जा अखेरी पर्यंत कायम टिकला.

यादव सम्राटांचा इतिहास हेमाद्रिपंडितां-प्रमाणेंच अच्युत नायक यांच्या राजकारणाच्या व शौर्याच्या वर्णनावांचून पुरा होऊं शकणार नाहीं अशी त्यांची राज्यकारभारांतील श्रेष्ठ कामगिरी आहे.

अच्युत नायक यांच्या संततीची किंवा त्यांच्या वंशजांची अशी कांहीं विशेष माहिती मिळत नाहीं. तथापि पुढील कालांत ठिकठिकाणीं अधिकारावर आलेल्या गौतमगोत्री नायकांचा मात्र कित्येक ठिकाणीं उल्लेख मिळतो.

सन १२९० च्या ताम्रपटांत यादव सम्राट रामदेव यांचा प्रधान कृष्णदेव यानें रामदेवरायां-च्या आयुष्य वैभववर्धनार्थ अणजोर गांव चाळीस ब्राह्मणांस दान दिला आहे. हा गांव ठाणें जिल्ह्यांत भिवंडीच्या दक्षिण-पश्चिमेस सुमारें सात मैलांवर आहे. तें दान घेणाऱ्या ब्राह्मणांत दामोदराग्निहोत्री महालभट्टस्य पुत्र काश्यपगोत्री असें एक नांव व दुसरें गौतमगोत्री विष्णुपुत्र रामनायक असें आहे. हीं दोन्हीं नांवें गोमंतकीय ब्राह्मणांचीं दिसतात असें इ. सं. गुंजीकर यांचें मत असून तेंच मत योग्य असल्याचें इ. सं. वर्दे वालावलीकरहि म्हणतात.

सदर ताम्रपटांतील रामनायक हा अच्युत नायकांप्रमाणेंच गौतमगोत्री असल्यानें व कुल-नावांच्याहि साम्यावरून तो अच्युत नायकांचाच कुलांतील असणें असंभवनीय नाहीं.

— ७८ —

वकील विठ्ठल शेणै

विठ्ठल शेणै यांचें घराणें गोमंतकांतील सासष्ट महालांतील असून जन्मगांव केळोशी व त्यांची कुलदेवी श्रीशांतादुर्गा होती. यांचें शिक्षण मराठी, कानडी व संस्कृत असें झालें असून पोर्तुगीज भाषेचाहि त्यांनी चांगला अभ्यास केला होता. वास्तविक त्यावेळीं पाश्चात्य भाषांकडे इकडील लोकांचा मुळींच कल नव्हता. इतकेंच नव्हे तर त्या भाषांच्या नादास लागणेंहि त्यावेळीं कित्येक सनातनी अपवित्र समजत. तथापि विठ्ठल शेणै यांना विविध भाषांचा अभ्यास करण्याची फार आवड होती.

मुत्सद्दीपणाची अपूर्व देणगी विठ्ठल शेणै यांना निसर्गानेंच बहाल केली होती. त्या देणगींत प्रत्यक्ष कार्याच्या अनुभवाची भर पडल्यानें ते राजकारणांत बरेच पुढें आले. कर्नाटकांतील इक्वेरी येथील पराक्रमी राजे वेंकटप्पा नायक यांचे राजकारणी वकील म्हणून यांनी बरींच वर्षे काम केलें.

सतराव्या शतकाच्या आरंभीं दक्षिण कर्नाटकांत बेनेगल नांवाचें एक छोटें संस्थान होतें. त्या संस्थानावर फिरंग्यांची अधिसत्ता होती. सन १६२० च्या सुमारास तेथील संस्थानाधिपतीच्या विनवणीवरून फिरंग्यांनी इक्वेरीचा वेंकटप्पा नायक यांच्यावर चढाई केली. तथापि नायक यांनी जोराचा प्रतिकार करून आपला बचाव केला.

आपणावर निरर्थक लढाईचा प्रसंग आणल्यामुळें बेनेगल संस्थानाधिपतीवर राजे व्यंकटप्पा नायक यांचा रोष झाला व तो वाढत गेल्यानें त्यांनी बेनेगल संस्थानावर हल्ला करून तें व तेथील किल्ला घेतला आणि त्या संस्थानाधिपतीस वार्षिक वेतन ठरवून टाकलें.

सदर संस्थानाबद्दल फिरंगी व्हिसिरै दों फ्रांसिस्क द गाम यांकडून राजे व्यंकटप्पांकडे रदबदली चालली होती; त्यावेळीं सन १६२३ सालीं राजे व्यंकटप्पा यांनी विशेष बोलणें करण्यासाठीं विठ्ठल शेणै यांना इक्वेरीहून मुद्दाम गोवें येथें व्हिसिरै यांकडे पाठविलें. विठ्ठल शेणै हे फिरंगी भाषा बोलण्यांत पटाईतच होते. ते त्या राजकारणाच्या प्रकरणीं गोव्यांत बरेच दिवस राहिले. अखेरीस व्हिसिरै यांनी त्यांच्याबरोबरच आपला वकील जुआंव फेर्नांदिस् लैतांव याला सलोख्याच्या तहाचीं बोलणीं करण्यासाठीं वेंकटप्पांच्या दरबारांत पाठवून दिलें.

त्यावेळीं फिरंगी व्हिसिरै यांनी वकील विठ्ठल शेणै यांना एक हुशार घोडा नजर केला आणि राजे वेंकटप्पा यांच्यासाठींहि एक सुंदर घोडा व इतर कांहीं वस्तु भेट म्हणून पाठविल्या.

सदर सालच्या ऑक्टोबरच्या १४ तारखेस विठ्ठल शेणै व फिरंगी वकील इक्वेरीस जाण्यासाठीं गोव्यांतून निघाले. त्यांच्या सोबतीला इटालियन प्रवासी पियेत्र देलव्हालि हाहि होता. फिरंगी वकीलानें विठ्ठल शेणै व देलव्हालि यांना एकमेकांची ओळख करून दिली. त्यावेळीं देलव्हालीच्या डाव्या कानांत लटकणारा हिंदु पद्धतीचा छोटा डुल पाहून शेणै यांना कौतुक वाटलें. आपल्या सदोष दृष्टीला उपकारक होण्यासाठीं एका वैद्याच्या सांगणीप्रमाणें त्यानें हा वापरण्यास सुरवात केली होती.

वकील विठ्ठल शेणै यांच्यासाठीं खास जहाज आलें होतें. घोडे वगैरे त्यांच्या इतर सामानसुमानाची व्यवस्था सोबतच्या दुसऱ्या जहाजांत केली होती. दोन्हीं जहाजें ऑक्टोबरच्या १८ तारखेस होनावर येथें पोंचलीं. तेथें फिरंग्यांचा किल्ला व छोटी वसाहत होती. तेथील किल्ल्यावर दों क्रिस्तोव्हंव फेर्नांदिस् फ्रांसिस्क हा कॅप्टन होता.

होनावर येथें पोंचतांच विठ्ठल शेणै हे नदीपलीकडील गांवांत जाऊन राहिले. ऑक्टोबरच्या २१ तारखेस ते फिरंगी कॅप्टनाला भेटण्यासाठीं बंदरवर आले. त्यावेळीं त्यांच्या स्वागतासाठीं किल्ल्याचे फिरंगी कॅप्टन, होनावरच्या वसाहतींतील फिरंगी लोक, वकील लैतांव, देलव्हालि प्रवासी आणि इतर सर्व बंदरवर सामोरा गेले.

विठ्ठल शेणै फिरंगी किल्ल्यांत प्रवेशतांच त्यांना तीन तोफांची सलामी देण्यांत आली आणि बराच वेळपर्यंत कॅप्टन, फिरंगी वकील व विठ्ठल शेणै यांचीं बोलणीं झालीं.

नोव्हेंबरच्या ८ तारखेरोजीं फिरंगी वकील फेर्नांदिस् लैतांव इक्वेरी राजधानींत राजे वेंकटप्पा नायक यांच्या मुलाखतीस गेला. स्वागत वगैरेनंतर त्यांचीं बोलणीं सुरू झालीं. विठ्ठल शेणै यांनी त्यांचीं बोलणीं एकमेकांस समजाऊन सांगितलीं. अखेरीस बेनेगलच्या संस्थानिकासंबंधीं उभयपक्षीं विचारविनिमय होऊन राजे व्यंकटप्पा यांनी आपणास सोयिस्कर असाच तह करून टाकला.

राजे यांनी प्रवासी देलव्हालि याची विचारपूस केली. त्यावेळीं विठ्ठल शेणै यांनी त्याची सर्व माहिती राजांना निवेदन करून म्हटलें कीं, या प्रवाशानें पृथ्वीवरील अनेक राज्यें पाहिलीं असून ज्या ज्या गोष्टी पाहिल्या व अनुभविल्या त्याची सर्व माहिती आपल्या प्रवासवृत्तांत लिहून ठेवली आहे.

नोव्हेंबरच्या ता. २१ रोजीं इक्वेरी राजधानींत वैभवशाली महोत्सव झाला. त्या दिवशीं अनेक कार्यक्रम होऊन रात्रीं सर्व शहरभर दिव्यांची रोशनाई करण्यांत आली. मुख्य देवालयांत तर मोठा दीपोत्सव केला. पालखींतून राजे वेंकटप्पा नायक देवदर्शनार्थ निघाले. त्यांच्या पालखीसोबत अनेक अधिकारी होते. विठ्ठल शेणै घोड्यावर स्वार होऊन राजेसाहेबांची सोबत करीत होते. अशा रीतीनें राजे यांचें देवदर्शन

होऊन देवालयांतील इच्छित उत्सव पार पडल्यानंतर सर्व लवाजम्यासह ते राजवाड्यांत परतले.

नोव्हेंबर महिन्याच्या २३ तारखेस प्रवासी देलव्हालि इक्वेरी येथून मंगळूरला जाण्यास निघाला. त्यावेळीं त्याच्या मागणीवरून विठ्ठल शेणै यांनी त्याला ताडपत्रावर लिहिलेलें एक ऐतिहासिक कानडी पुस्तक बहाल केलें. तीं भारतांतील एक अप्रतिम वस्तु इटलींत परत गेल्यावर आपल्या पुस्तक संग्रहांत ठेवण्याची प्रवासी देलव्हालि याला उत्कंटा लागली होती. (The Travels of Pietro Della--Valle, London 1892. V. I, II).

वकील विठ्ठल शेणै यांना राजे वेंकटप्पा नायक यांच्या दरबारांत मोठा मान होता. कारण राजकारणांत ते मोठे वाकबगार असून परराष्ट्रीय राजकारणांतील डावपेंच त्यांना चांगले अवगत होते. राजे वेंकटप्पांचें बहुतेक सर्व परराष्ट्रीय राजकारण विठ्ठल शेणैतर्फेच चाले. यांचा अधिकारहि परराष्ट्रीय खात्याच्या प्रधानाप्रमाणेंच होता. हे श्रीशांतादुर्गा देवस्थानच्या महाजनांच्या रेगे या गटांतील असावे असें वाटतें; तथापि त्यासबंधींची विशेष माहिती मिळत नाहीं. त्याचप्रमाणें त्यांच्या संततीबद्दलचीहि कांहीं माहिती उपलब्ध नाहीं.

— ६७ —

वकील मल्लाप्पा महाले

कर्नाटकांतील बेदनूरच्या राजाच्या व्यापार--उद्योग खात्याचे हे प्रमुख होते. दिवाण रामचंद्र विठ्ठल महाले यांच्याच घराण्यापैकीं हे असावे असें वाटतें. साध्या कारकुनीवरून वाढत वाढत हे नांवास चढले. हे राजकारणांत मोठे कुशल होते. राजकारणी धागेदोरे संभाळून देशांत व परदेशांत आपल्या व्यापारधंद्याची कशी प्रगति साधावी याची कुशल कला यांना बरी साधली होती.

यांच्या कारकिर्दींत बेदनूर दरबारचा डच लोकांशीं मोठा व्यापार चाले. डच लोक मल्लाप्पा महाले यांना Malappa Malve असें म्हणत. इंग्लिश कागदपत्रांत Mollup Molla असा त्यांचा उल्लेख आहे. वेलजी नांवांचा एक दलाल इंग्रजांसाठीं यांकडून मिरीं, वेलदोडे वगैरे मसाल्याचे जिन्नस विकत घेई.

परराष्ट्रीय राजकारणांत मल्लप्पा चतुर असल्यानें बेदनूरचे राजे त्यांना शेजारच्या राजांकडे राजकारणी वाटाघाटी करण्यास पाठवित असत. डच लोक नुकतेच हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर आपलें बस्तान बसवीत होते. त्यांनी सन १६६३ सालीं फिरंग्यांचा कोचीन येथील किल्ला घेतल्यावर फिरंग्यांच्या व्यापारास खंड पडण्याचा प्रसंग येऊन ठेपला.

त्यावेळीं ते लोक मसाल्याचे जिन्नस मिळू शकणारीं अनेक बंदरें जवळ करण्याच्या प्रयत्नास लागले होते. त्यांत बेदनूर राज्यांतील होनावर, बसरूर, मंगळूर हीं तीन बंदरें पूर्वीं आपणाकडे

असल्याच्या सबबीवर त्यांच्यावर हक्क सांगूं लागले. त्यावेळीं आंतोनियु द मेल हे गोव्याच्या व्हिसिरैच्या जागेवर होते.

सदरील बंदरांबद्दलच्या वाटाघाटीसाठीं बेदनूरच्या राजानें मल्लाप्पा महाले यांना मुद्दाम गोव्यांत पाठविलें. बेदनूर येथून निघतांना त्यांच्या सोबत फिरंग्यांना भेट म्हणून तांदळाच्या सहा हजार मुड्या राजानें पाठविल्या होत्या. त्या घेऊन ते गोव्यांत आले आणि त्या व्हिसिरै यांना नजर केल्या.

त्यावेळीं मल्लाप्पा यांचा मुक्काम गोव्यांत तब्बल पांच महिने होता. सरकारी पाहुणे म्हणून त्यांची सर्व व्यवस्था फिरंग्यांनी चांगली ठेवली होती. त्यांनी साधक बाधक प्रश्नांची चर्चा करून आपल्या इप्सित कार्याबद्दलचा व्यवस्थित तह करून घेतला आणि फिरंगी व बेदनूर राज्य यांच्यांतील सलोखाहि वाढविला. त्या तहाप्रमाणें बसरूर येथील व दुसरा एक किल्ला बेदनूरच्या राजानें पुढें लवकरच फिरंग्यांच्या हवालीं केला. (The English Factories in India 1661—W. Foster. 1923, p. 120).

या राजकारणी कामगिरीवर गोव्यांत असतांनांच मल्लाप्पा महाले यांना ताप येऊं लागला आणि पुढें विषम स्वरूप घेऊन तो वाढत गेल्यानें मोठमोठ्या औषधोपचारांनाहि दाद न देतां त्यांचें दुखणें विकोपास गेलें. अशा रीतीनें मल्लाप्पा महाले यांनी आपल्या पूर्वज्यांच्या जन्मभूमींतच गोवें येथें देह ठेवला.

— ७८ —

वकील नारायण महाले

नारायण महाले हे मल्लाप्पा महाले यांचे कनिष्ठ बंधु होते. हेहि राजकारणांत कुशल असून मल्लाप्पाच्या बरोबरीनेंच बेदनूर दरबारांत वावरत होते. मल्लाप्पाच्या दरबार प्रवेशानंतर हेहि लवकरच दरबारांत वावरूं लागून राजकारणांत पुढें आले. मागचा पुढचा किंचित् काल वगळल्यास त्या उभय बंधूंचा काल जवळ जवळ एकच म्हणतां येईल. मल्लाप्पा हे गोव्यांत निधन पावल्यानंतर त्यांचें कार्य पुढें नारायण महाले यांनींच पुरें केलें.

ज्याप्रमाणें दिवाण रामचंद्र महाले यांनी होनावर, गंगोळी, वेंकटापूर, कासरगोड इ. ठिकाणीं देवालयें बांधून त्यांना बेदनूर संस्थानांतून उत्पन्नाचे शासनपट करून दिले त्याचप्रमाणें नारायण महाले यांनीहि अनेक देवालयें बांधून दानधर्महि केला. यांच्या कारकिर्दींत कांहीं हुशार गोमंतकीय तरुणांना बेदनूर राज्यांत नोकऱ्याहि मिळाल्या.

—७९—

दिवाण नारायण आप्पा नाडकर्णी

यांचें मूळ घराणें साष्टींतील कुडाळ येथील असून बाटाबाटीच्या प्रखर धुमाळींत तें दक्षिणेकडे कर्नाटकांत जाऊन तेथें स्थायिक झालें. त्यांचा कुलदेव श्रीमंगेश असल्यानें पूर्वजांप्रमाणेंच श्रीमंगेशावर त्यांची फार भक्ति होती. इ.स.च्या १७ व्या शतकाच्या मध्यकालांत उत्तर कर्नाटकांतील मल्लापूर येथें यांचा जन्म झाला. प्रसिद्ध संतकवयित्री लक्ष्मीबाई नाडकर्णी ही यांची पत्नी. मल्लापूर येथील हे कुलकर्णी असून बुद्धिबळाच्या खेळांत मोठे पट्टाईत होते.

सन १६६३ च्या सुमारास बेदनूर येथील राजे भद्रप्पा नाईक आणि त्यांचे बंधु सोमशेखर नाईक यांच्यांत वितुष्ट आल्यानें ते चंदावर येथील किल्ल्यांत स्वतंत्र राहूं लागले. चंदावर गांव मल्लापूरच्या अगदीं जवळच होतें. सोमशेखर यांनांहि बुद्धिबळाचा फार नाद असल्यानें सहज नारायण आप्पांकडे त्यांची मैत्री जुळली. एके दिवशीं डाव रंगांत आल्यावेळीं पाल चुकचुकली तें ऐकून नाडकर्णी उद्गारले–"वा, योग छान आहे. शुभसूचक दृष्य!"

"कां बरं? काय आहे प्रकरण?" सोमशेखरांनीं प्रश्न केला.

"आतां जी पाल चुकचुकली आहे त्यावरून आपणास राज्यपदप्राप्तीचा योग आहे असें स्पष्ट दिसत आहे. श्रीकृपेनें हा योग लवकर येवो असें इच्छितों. पण महाराज, आम्हांला विसरूं नये एवढचि विनंति आहे."

सोमशेखरांनां नाडकर्णी यांचें म्हणणें तितकेंसें पटलें नाहीं; तथापि त्यांनीं हंसत म्हटलें—"ठीक आहे. मी राजा झालों तर आतांच सांगून ठेवतों कीं, आपणाला प्रधानपद मिळाल्यावांचून राहाणार नाहीं."

कांहीं दिवस गेले व भद्राप्पा नाईक निवर्तले. त्यांना औरसपुत्र नसल्यानें सोमशेखर बेदनूरचे राजे झाले. त्या वेळीं नारायण आप्पा मुद्दाम जाऊन त्यांना भेटले आणि त्यांनीं त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें.

थोड्याच दिवसांनीं सोमशेखर यांनीं आपले दिवाण म्हणून नारायणाप्पांची नेमणूक केली. लवकरच दरबारांतून त्यांना पालखीच्या खर्चासाठीं हळदीपूर येथील कांहीं जमीन इनाम मिळाली. पुढें थोड्याच दिवसांनीं गेरसप्पा व चंदावर या दोन्हीं महालांचा कारभार राजे यांनीं नाडकर्णी यांच्या स्वाधीन केला. या उभयमहालामुळेंच पुढें त्यांच्या कुटुंबास 'उभयकर' असें उपनांव मिळालें.

न्या. मू. नारायणराव चंदावरकर हे दिवाण नारायणाप्पा यांच्याच घराण्यांतील आहेत.

देवगिरी येथील संत रमावल्लभदास यांनीं नारायणाप्पा व त्यांची पत्नी लक्ष्मीबाई ऊर्फ आवडीबाई यांना श्रीकृष्ण भक्तीची चटक लावली. या आवडीबाईचे श्रीकृष्णावर रचलेले अनेक अभंग प्रसिद्ध आहेत.

दिवाण नारायणाप्पा हे मुत्सद्दी आणि शूरहि होते. यांनीं आपल्या कारकिर्दींत बेदनूरची मुलकी व लष्करी व्यवस्था छान राखली होती. सैन्यांतील त्यांची शिस्त उल्लेखनीय होती. त्यांचें गुप्त हेरांचेंहि एक स्वतंत्र खातें होतें. यांनीं आपल्या हयातींत दानधर्महि फार केला.

यांची पत्नी लक्ष्मीबाई जन्मत:च सरळ वृत्तीची व भक्तिमार्गाकडे वळलेली होती. दक्षिणेकडील बहुतेक सर्व यात्रा तिनें केल्या. आपले पारमार्थिक गुरु रमावल्लभदास यांना मुद्दाम पाचारण करून त्यांच्या हस्तें तिनें 'श्रीकृष्णजयंति' व्रतोत्सव केला व पुढेंहि तसाच थाटांत चालू ठेवला. मल्लापूर, शिराळी, हेम्माडी, हत्यंगडी या गांवांतून तर दरसाल हा उत्सव लक्ष्मीबाई ऊर्फ आवडीबाई हिनें सुरू केलेला म्हणून अजून विशेष आपुलकीनें व थाटानें होत आहे.

आवडीबाईचें काव्य भक्तिरसानें ओथंबलेलें असून अंत:करणाचा वेध घेणारें आहे. मल्लापूर येथें हिची समाधी आहे आणि तेथेंच त्यांच्या घराण्यांतील मंडळीनें मठ बांधलेला आहे. 'आवडी मठ' या नांवानें तो अजून प्रसिद्ध आहे. (कॅनरा सारस्वत, व्हॉ. ४, नं. ४, पृ. १०२. ऑ. इ. सारस्वत व्हॉ. ५, नं. १-२ पृ. ७-८.)

सांखळी येथील सुप्रसिद्ध नाडकर्णी घराणें आणि दिवाण नारायणाप्पा नाडकर्णी यांचें घराणें या दोन्हीं घराण्यांचा जवळचा संबंध असून दोन्हीं घराण्याचा कुलपुरुष एकच आहे.

सन १९३९ सालीं आम्हीं उत्तर हिंदुस्थानच्या प्रवासांत असतांना यशवंतराव नाडकर्णी नावांचे एक निवृत्त मेजर गया येथें आम्हांला भेटले. ते यात्रेकरू होते. सेवानिवृत्तीनंतर आपलें निवासस्थान सध्या महेश्वर येथें असल्याचें त्यांनीं सांगितलें. ते सहज बोलतांना म्हणाले कीं, "आम्हीं देखिल गोव्याचेच आहोंत. कर्नाटकांत एका काळीं गाजलेले बेदनूरचे दिवाण नारायणाप्पा नाडकर्णी यांचें, सांखळीचे नाडकर्णी यांचें व आमचें स्वत:चें हीं तिन्हीं घराणीं एकाच मूळ पुरुषाचीं आहेत. इतकेंच नव्हे तर बडोदा राज्याचे माजी धर्माधिकारी मंगेशराव नाडकर्णी हे देखील आपल्यापैकींच आहेत. आमच्या मूळ घराण्यांशीं संबंध असलेलीं नाडकर्णी यांचीं आणखीहि बरींच घराणीं असूं शकतलि असा माझा कयास आहे. पण यासंबंधीं संशोधन झालें पाहिजे."

पुन्हां ते म्हणाले कीं, ".आमच्या सर्व नाडकर्णी घराण्यांचा इतिहास लिहावा असें अनेक वेळां माझ्या मनांत आलें. कारण आमच्यांत राजकारणी होऊन गेले, तसेच तरवार बहाद्दरहि झाले. मोठ मोठे हुद्देदार, वकील, डॉक्टर, कॉंट्रॅक्टर, लेखक, कवि इ. सर्व क्षेत्रांत आमचे भाईबंद चमकले. तथापि आतां मी वयपरत्वें थकलों असल्यानें मला तें अशक्यच !

—८०—

आपाजी राम वागळे

वकील आपाजी राम वागळे यांचें घराणें मूळचें गोमंतकीय असून त्यांचा कुलदेव श्रीमंगेश आहे. इ. स. च्या अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत कर्नाटकांत अंकोला येथें यांचा जन्म झाला. हे अत्यंत प्रेमळ व चतुर असल्यानें फार लोकप्रिय होते. यांची चलाख बुद्धि व प्रसन्न चेहरा पाहून म्हैसूरचे नबाब हैदर अल्लीखान यांनीं त्यांनां आपल्या दरबारांत येण्यास पाचारण केलें. हे राजकारणांत मोठे हुशार असल्यानें हैदरनें आपले राजकारणी वकील म्हणून त्यांची नेमणूक केली.

वागळे मुत्सद्दीपणांत सहसा कधीं हार जाणारे नसल्यानें शेजारी राजांच्या दरबारांत राजकारणी वाटाघाटींसाठीं हैदर आणि त्याचा मुलगा टिपू देखील वकील वागळे यांनाच पाठवीत असत.

सन १७६७ सालीं श्रीमंत माधवराव पेशवे आणि निजाम अल्ली यांनीं म्हैसूर राज्यावर एकदमच हल्ला चढविण्याचें ठरविलें. मराठ्यांचें सैन्य तर नेटानें चाल करून येऊं लागलें. मराठी सैन्याच्या समोरासमोरच्या प्रतिकाराची धमक हैदरास नसल्यानें त्याला वाटेंत अडथळे आणण्यासाठीं हैदराच्या लोकांनीं अनेक भानगडी केल्या. वाटेंतील विहीरींतून विष टाकलें, ठिकठिकाणच्या गवतास आगी लावल्या, सर्व कांहीं केलें; तथापि मराठ्यांच्या सैन्याची आगेकूच धिम्मेपणानें चालूच होती. अशा रीतीनें सैन्य गांवच्या समिजवळ येतांच हद्दीच्या रक्षणासाठीं तेथें सैन्य घेऊन सज्ज असलेला हैदरचा मेहुणा मीर अल्ली मराठी सैन्यापुढें बावरला आणि मराठ्यांना फितूर होऊन त्यानें त्यांना प्रतिकार न करतां सरळ वाट दिली. ही बातमी हैदरास समजली त्यावेळीं तो बराच दचकला.

अशा वेळीं निजाम अल्लीचें सैन्य मराठ्यांच्या सैन्यास येऊन मिळाल्यास मोठी बिकट परिस्थिति ओढवेल हें लक्षांत आणून हैदरनें मराठ्यांशीं तह करण्याचें ठरविलें या तहाच्या वाटाघाटीसाठीं हैदरनें वकील आपाजी राम वागळे यांची नेमणूक केली. वागळे यांच्या प्रेमळ व गोड वागणुकीमुळें मराठे तहाचें बोलणें करण्यास तयार झाले आणि या वाटाघाटींत वकील वागळे यांनीं आपल्या राजकारणी कुशलतेनें मराठे व हैदर यांच्यांत तह घडवून आणला.

या तहाप्रमाणें ३५ लक्ष रुपये घेऊन मराठे मागें सरकले. (म्हैसोर गॅझेट व्हॅ. १, पृ. ३८४, हैदर अल्ली व टिपू सुलतान— एल्. बी. ब्रौनिंग पृ. ४८.)

सन १७८३ सालीं टिपू व इंग्रज यांच्यांत जी लढाई चालू होती, ती थांबवून इंग्रजांशीं मैत्रीचा तह करण्यासाठीं टिपू यानें वकील वागळे यांना मुंबईच्या गव्हर्नराकडे पाठविलें होतें. (सेलेक्शन्स फ्रॉम दि लेटर्स-फॉरेस्ट, होम सिरीज व्हॅ. २ पृ. ३०१-२)हा तह ता. ११ मार्च सन १७८४ रोजीं मंगळूर येथें लिहिण्यांत आला.

म्हैसूर राज्यांतील चितळदुर्ग तालुक्यांत 'दावणगिरी' नांवाचें जें व्यापारी गांव आहे तें वकील वागळे यांना हैदरनें जहागिरी-दाखल दिलें होतें. आपल्या कर्तबगारीनें व्यापारी पेठ बनवून व इतर दृष्टीनें 'दावणगिरी' त्यांनीं पुढें विशेष नांवारूपास व भरभराटीस आणली. आजहि हें गांव महत्वाची व्यापारी पेठ म्हणून प्रसिद्ध आहे.

वकील आपाजी राम वागळे यांना औरस संतति नसल्यानें त्यांच्या मागें त्यांची सदरील जहागिरी सरकार जमा झाली.

सावंतवाडीचे राजे भोंसले सरदेसाई यांचे प्रधान जिवाजी विश्राम सबनीस व वकील आपाजी राम वागळे यांची फार दोस्ती होती. या उभय मुत्सद्यांचा राजकारणी पत्रव्यवहार पाहिला म्हणजे त्यांची राजकारणांतील चतुराई कळून येते. एकदां कांहीं कारणानें भोंसले सरदेसाई यांची जिवाजी सबनीस यांच्यावर इतराजी झाली, त्यामुळें सबनीस यांची नोकरी सुटली. ते बेकार स्थितींत घरीं असलेले ऐकून वकील वागळे यांनीं त्यांना एक कळकळीचें पत्र लिहून आपल्याकडे येण्यास कळविलें. सबनीस यांना आपल्या पत्रांतून त्यांनीं लिहिलें कीं—" आपणासारखे राजकारणी आपल्या दरबारांत असावे अशी आमच्या राजांची इच्छा आहे. आपल्याला इकडे कां आणलें नाहीं? असा प्रश्न त्यांनीं चार पांच खेपा मला केला. आपण इकडे याल तर महत्वाचें कामकाज आपणाकडें देण्याची त्यांची इच्छा आहे. हल्लीं बंकापूर तालुका व्यवस्थेसाठीं मजकडे दिला आहे..." (ऐतिहासिक लेखसंग्रह–खरे, भाग ३, लि. अं. ६३८, पृ. ११२५).

—८१—

जिवाजी राम वागळे

वकील आपाजी राम वागळे यांचेच हे सख्खे बंधु. हेहि हैदर यांच्याच दरबारांत होते. हैदरनें यांनाहि अनेक वेळां राजकारणी वकिलीच्या कामावर पाठविलें होतें. हैदरानें एकदां त्यांना गोव्यांत पोर्तुगीजांकडे पाठविलें होतें. (प्राचीप्रभा व. ७, अंक ५-६, पृ. ११७).

—८२—

नारो राम वागळे

वकील आपाजी वागळे यांचे तिसरे बंधु नारो राम. हे देखील चांगले मुत्सद्दी असून हैदर यांच्याच दरबारांत होते.

सन १७६७ सालीं पेशव्यांच्या म्हैसूरवरील स्वारीच्या प्रसंगीं वकील आपाजी राम वागळे या आपल्या बंधूसमवेत हैदरांच्या आज्ञेनें पेशव्यांकडे तहाच्या वाटाघाटीचीं बोलणीं करण्यास गेले होते. (ऐतिहासिक लेखसंग्रह सं. वा. वा. खरे, भा. ३, लि. अं. ६३८, पृ. ११२५, अं. ७२३, पृ. १२३५).

वकील आपाजी राम वागळे यांच्याप्रमाणेंच त्यांचे बंधु जिवाजी राम व नारो राम यांच्या राजकारणाबद्दलहि हैदरला चांगला विश्वास होता.

जनरल कृष्णराव राणे सरदेसाई

बक्षीबहादूर जिवबादादा केरकर, सरसुभेदार लखबादादा लाड,सरदार वागळे वगैरे गोमंतकीय मुत्सद्दी वीरांनीं शिंदेशाहींत इतिहासकालांत फार मोठा लौकीक मिळवला आधुनिक कालांत जनरल कृष्णराव राणे यांनींहि शिंदे सरकारच्या सरसेनापतिपदावरून चांगला लौकिक मिळवला.

जनरल कृष्णराव यांचा जन्म सांखळी येथील सुप्रसिद्ध राणे कुलांत झाला. सांखळीचे, सरदार बाळासाहेब राणे सरदेसाई यांचे हे सख्ये बंधु होत.

राण्यांचें मूलस्थान राजपुताना हें असून ते अस्सल राजपूतवंशी आहेत. हेरंब राणे नांवांचा एक शूर राजपूत आपल्या कांहीं लोकांसह दक्षिणेकडे येण्यास निघाला आणि कांहीं दिवसांनीं तो शृंगारपूर येथें येऊन पोंचला व तेथेंच तो स्थायिक झाला. त्यांच्याच घराण्यांतील सत्रोजीराव राणे हे इतिहास कालांत सावंतवाडी सरकारच्या सत्तर महालांत आले आणि त्यांनीं त्यांनां त्या महालाच्या देशमुखीचे अधिकार दिले. वाडकरांनां ठराविक वार्षिक खंडणी दिली कीं ते आपल्या हद्दींत स्वतंत्रच असत. युद्धजन्य परिस्थितींत आपल्या लोकांसह त्यांनीं वाडकरांच्या सहाय्यास गेलेंच पाहिजे असा मात्र करार होता.

मावाळिंगें, साखेली, केरी, गुळुलें, सांवडें, परियें, अडवै असे पुढें सत्तरीच्या देशमुखीचे सात विभाग झाले आणि त्या सर्वांवर मुख्य जबाबदार सांखळीचें घराणें झाल्यानें तेव्हांपासून तें आपलें उपनांव सरदेसाई असें वापरूं लागलें. सत्तर महालाचा सर्व कारभार त्यावेळींच नव्हे तर वाळपै तालुका निर्माण होईपर्यंत सांखळी येथूनच चाले.

सन १७८८ सालीं पेडणें, वतग्राम व सत्तर हे महाल सावंतवाडकरांकडून फिरंग्यांकडे आले व तेव्हांपासून राणेहि फिरंग्यांचे अंकित झाले.

सांखळीच्या या राणे सरदेसाई घराण्यांतील एक भाग्यवान् कन्या व जनरल कृष्णराव यांची भगिनी श्री. गजरादेवी यांचा विवाह ग्वाल्हेरचे सुप्रसिध्द अधिपति हिज हायनेस श्रीमंत माधवराव शिंदे यांच्याशीं होऊन गोमंतक आणि ग्वाल्हेर यांचा गोड संबंध जुळला. या संबंधानंतर राणी हर हायनेस श्री. गजरादेवी आपल्या जन्मभूमीच्या दर्शनार्थ सांखळी येथें येऊन परत ग्वाल्हेरला जातेवेळीं सन १९१६ सालीं आपल्या या प्रेमळ भगिनीसोबत श्री. कृष्णरावहि ग्वाल्हेरला गेले.

लग्नसमारंभापूर्वींच सांखळीच्या राणे घराण्यास ग्वाल्हेर-दरबारच्या सरदारकीचा मान मिळाला होता. राण्याचें तेजस्वी रक्त, सरदारी वृत्ति आणि लष्करी पेशाची नैसर्गिक आवड यांमुळें कृष्णरावांनीं लगेच

आपला लष्करी विद्यालयांत प्रवेश करून घेतला. हें शिक्षण संपतांच शिंदे सरकारच्या सैन्यांत लेफ्टनंटच्या जागेवर त्यांची नेमणूक झाली.

उत्साही वृत्ति व तेजस्वी कर्तबगारी यां-मुळें कॅप्टन, मेजर, कर्नल असे क्रमाक्रमानें वाढत जाऊन सन १९३८ साली ते ग्वाल्हेर सरकारच्या तिसऱ्या लान्सर्सचे कमांडर झाले.

गुणग्राही शिंदे सरकारनें त्यांना १९४० सालीं लष्कराचे ॲडज्युडंट जनरल नेमलें आणि पुढें चारच वर्षांनीं म्हणजे १९४४ मध्यें ते आर्मी कमांडरच्या हुद्यावर आले.

अशा रीतीनें शिंद्यांच्या सैन्यांत वाढत्या प्रगतीनें पंचवीस वर्षें महत्वाची कामगिरी बजावून त्यांनीं मोठा लौकिक व मान मिळवला.

दुसऱ्या जागतिक महायुध्दांत आशियांत व विशेषत: आफ्रिकेंत त्यांनीं दाखविलेल्या अपूर्व शौर्यामुळें खुष होऊन ब्रिटिश सरका-रनें त्यांना ब्रिटिश लष्करांतील मेजर जनर-लची पदवी सन्मानपूर्वक बहाल केली.

लवकरच ते जनरल होऊन ग्वाल्हेर सरकारच्या सैन्याचे सरसेनापति झाले. लष्क-रांत अशा मोठ्या हुद्यावर चढलेले हल्लीच्या कालांतील हे आपले पहिलेच गोमंतकीय होत.

सरसेनापति राणे यांच्या सैन्याची अशी व्यवस्था होती: — रिसाला विभाग(घोडदळ) -फर्स्ट लान्सर्स गुणा, सेकंड लान्सर्स-थार्टीपूर थर्ड लान्सर्स—मुरार, ट्रेनिंग कॅव्हलरी स्क्वॉड्रन इरेग्युलर फोर्स (शिलेदार). तोफखान विभाग—सिंदियाज फिल्ड बॅटरी, ट्रेनिंग सेक्शन. ग्वाल्हेर ट्रान्सपोर्ट कोअर. पायदळ विभाग (इन्फन्ट्रीज).

सैन्याचें शिक्षण व हत्यारें अद्यावत् धर्ती-चीं होतीं. शिंदे सरकारच्या सैन्याविषयीं भारतांत सर्वत्र मोठें कुतूहल होतें. कारण हें सैन्य संख्येनें मोठें तितकेंच शिक्षण व शिस्त यांतहि तें पूर्ण तरबेज होतें.

जनरल कृष्णराव राणे शूर, तसेच मुत्स-द्दीहि होते. एकदा ते श्रीमंत माधवराव शिंदे यांच्या सोबत इंग्लंडला गेले होते. त्यावेळीं शिंदे सरकार व साम्राज सरकार यांच्यांत एक मोठें गुंतागुंतीचें राजकारण चाललें होतें. शिंद्यांच्या सोबतीस त्यांचा खास पोलिटिकल सल्लागारहि होता; तेथें पि एका प्रश्नाबद्दल तिथें एक वाद उपस्थित झाला होता व तो प्रश्न कसा सोडवावा या विचारांत स्वत: महाराज व त्यांचे सल्लागार अगदीं बेजारले होते. अशा प्रसंगीं तो प्रश्न मोठ्या मुत्सद्दीपणाने कुशलतेनें सोडवून जनरल कृष्णरावांनी महाराजांना चकित करून सोडले.

जनरल राणे हे स्वभावानें फार प्रेमळ व दिलदार होते. मातृभूमि व देशबंधु यांच्या बद्दलचा त्यांचा आदर व प्रेम कौतुकास्पद होतें.

—८४—

म्हादबा देसाई हेम्माड

दक्षिण कोंकण, उत्तर कोंकण व कऱ्हाड-कोल्हापूर अशा शिलाहार राजांच्या ज्या तीन शाखा होत्या त्यांत कऱ्हाड-कोल्हापूरच्या शिलाहार घराण्याचा उदय दहाव्या शतकाच्या अखेरीस होऊन त्याची सत्ता तेराव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत चालली. तिन्हीं घराण्याच्या ध्वजावर गरुडाचें चिन्ह असे.

विक्रमांकदेवचरित् या ग्रंथांतलि माहितीवरून या घराण्याची मूळ राजधानी कऱ्हाड येथें होती असें दिसते. कोरीव लेखांत पन्हाळा, वळवडें, कोल्हापूर अशा तनि राजधान्यांचा उल्लेख मिळतो.

या घराण्याची कुलदेवी अंबाबाई. या शिलाहारांचे कोरावलेख कोल्हापूरच्या आसपास जास्त सापडले आहेत, त्यावरून कोल्हापुरासच त्यांची मुख्य राजधानी होती असें दिसतें उन्हाळ्यांत ती पन्हाळा येथें व पावसाळयांत वळवडा येथें असण्याचा संभव वाटतो.

या घराण्याची जतिग (१ला), नयिवर्मा, चंद्र, जतिग (२रा), गोंक, मारसिंह, युबल, बल्लाळ, भोज (१ला), गंडरादित्य, विजयादित्य, भोज (२रा) अशा पुरुषांची नामावलि मिळते. दुसऱ्या जतिगापासूनचेच पुरुष राज्यकर्ते झाल्याची नोंद आहे.

या वंशावळींतील राजा गंडरादित्य यांची कारकिर्द १११० ते ११४० पर्यंत होती. सन ११०८ च्या शिलाहाराच्या एका शिलालेखांत भोज व गंडरादित्य यांचा उल्लेख आहे. पण सन १११० च्या दोन शिलालेखांतून फक्त गंडरादित्यांचेंच राजा म्हणून उल्लेख मिळतो. त्यावरून भोजराजाच्यामागून त्याचा मुलगा गादीवर न येतां हा भाऊच आला असें दिसतें. गंडरादित्याचें जे शिलालेख उपलब्ध आहेत त्यावरून सन ११४० पर्यंत त्यानें राज्य केलें असें वाटतें.

या गंडरादित्य शिलाहार राजाच्या दरबारांत म्हादबा देसाई हेम्माड नांवाचा एक राजकारणी पुरुष होता. तो गोमंतकीय असून लष्करी हालचालींचा सल्लाहि उत्तम देई असा उल्लेख मिळतो.

या वेळीं चालुक्य सहावा विक्रमादित्य हा दक्षिणेंतील सम्राट होता, कोल्हापूरचे शिलाहार त्याचेच मांडलिक होते. सम्राट व गंडरादित्य यांच्यांत एका प्रश्नावरून वाद उपस्थित झाला व तो म्हादबा देसाई यानें कुशलतेनें मिटविला इतका तो राजकारणांत कुशल होता अशी नोंद आहे.

हा म्हादबा देसाई कदाचित हेमाड बार्शेचे देसाई या घराण्यांतीलहि असू शकेल असें दिसतें. तथापि विशेष माहिती मिळत नाहीं.

—८५—

सरदार शंकरराय

सरदार शंकरराय यांचें मूळ घराणें गोव्यांतील असून त्यांचें उपनांव शिर्के असें होतें. पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धांत दक्षिण कोंकणांत वासिष्ठी व मुचकुंदी या दोन नद्यांमधील प्रदेशावर त्यांची सत्ता चालत होती. हे कदंबांचे सरदार खेळणें (विशाळगड) किल्ल्यांत राहात असत, त्या किल्ल्याचे ते किल्लेदार असून तो प्रदेश त्यांची जाहागिरी होती. फेरिस्त्याच्या प्रवासवृत्तांत याचा उल्लेख आहे.

सरदार शंकररायाचे अधिराज कदंब व नंतरचे यादव यांची सत्ता मुसलमानांच्या हल्लयामुळें कधींच नष्ट झाली होती. तथापि शंकरराय यानें आपली जहागिरी स. १४७० पर्यंत मुत्सद्दीपणानें टिकविली. फेरिस्ता आपल्या प्रवासवृत्तांत म्हणतो कीं "महमद गवान याच्या हल्लयापर्यंत खेळणेचा किल्ला मुसलमानांना मिळाला नाहीं." किल्लेदार शंकरराय तीनशें जहाजांच्या तांड्यासह नेहमीं समुद्रकांठीं सज्ज राहून शत्रूवर हल्ला करी. (फेरिस्ता, व्हॉ. २, पृ. ४८३).

बुऱ्हाण-इ-म-आसीर यांतील माहितीवरून कळतें कीं, संगमेश्वर व खेळणें हे दोन्ही किल्ले एकाच सरदाराच्या स्वाधीन होते. (बु.-इ म-आसीर पृ. १०३).

सन १४५४ त बाहमनी सरदार खल्फ हसन याच्या हल्लयाच्या वेळीं शिर्के नांवाच्या अधिकाऱ्यानें मोठ्या मुत्सद्दीपणानें त्याला चकवलें. (फेरिस्ता व्हॉ. २, पृ. ४३७).

तो मलिक याच्या तावडींत सांपडला होता आणि त्यानें मुसलमानी धर्माचा स्वीकार केला नसता तर त्याची गर्दनच गेली असती. तथापि त्या प्रसंगी त्यानें मलिकशीं सख्य करून मोठ्या युक्तीनें आपला बचाव करून घेतला. त्यानें मुसलमानी धर्म स्वीकारण्याचें कबूल करून कोणत्याच हिंदूस संरक्षण दिलें जाणार नसल्याचेंहि जीव तोडून सांगितलें.

अशा रीतीनें त्या मुसलमान सरदाराचा विश्वास संपादून त्यानें खेळणें किल्ल्यावर जाण्याची त्याच्या लोकांना वाट दाखविली ती महान अवघड. आणि काठिण जागीं जमतांच बरेंच मुसलमानी सैन्य हिंदु फौजेनें कापून काढलें. (व. - इ - मा. पृ. ७४)

लगेच शिर्केनें पुढें जाऊन शंकररायास बातमी दिली. तत्क्षणींच आपल्या फौजेसह तो आला आणि त्यानें राहिलेल्या सात हजार मुसलमानी सैन्यास हां हां म्हणतां कापून काढलें. त्यांत पांचशें सय्यद मेले. (फेरिस्ता व्हॅ. २, पृ. ४३८).

शिर्के हा सरदार शंकररायांच्या सैन्यांतलि एक अधिकारी असून त्याच्या नातलगांपैकींच एक होता. तो सरदाराच्या परीवारांत वाढल्यानें त्याच्या अंगीं समयसूचकता व राजकारणी डावपेंचहि आले होते.

अशा रीतीनें शंकरराय यानें प्रबल मुसलमानांसहि कुशलतेनें खडे चारले.